




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# नेपाळच्या महापुरात 277 जणांचा मृत्यू

## 300 भारतीय बेपत्ता; ईशा फाउंडेशनच्या 77 पर्यटकांचा ठावठिकाणा लागेना!

### 21 जणांचा लागला शोध

**काठमांडू / वृत्तसंस्था-नेपाळ आणि लगतच्या तिबेट भागात आलेल्या विनाशकारी महापुरामुळे आतापर्यंत मृत्युमुखी पडलेल्यांच्या आकड्यात वाढ झाली असून आतापर्यंत २७० जणांचे मृतदेह हाती लागले आहेत. अद्याप ३०० भारतीय नागरिक बेपत्ता असून गेल्या २४ तासात फक्त २१ भारतीयांचा शोध लागला आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सुरक्षित बाहेर काढण्यात आलेले २१ नागरिक तामिळनाडूचे असून त्यांना मायदेशी परत आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. बेपत्ता असलेल्या ३०० भारतीयांमध्ये नेपाळमधील त्रिशुली जलविद्युत प्रकल्पात काम करणा-या ७३ कामगारांचा समावेश आहे. चीनच्या तिबेट सीमेवरही अनेक भारतीय अडकले आहेत. २०० हून अधिक भारतीयांनी मदतीची मागणी केली असून त्यापैकी ९५ जण सध्या दार्चेन भागात सुरक्षित आहेत.नेपाळच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संपूर्ण आपत्तीची तीव्रता अद्याप तपासली जात आहे. नेपाळ आणि तिबेट मिळून सुमारे ८०० परदेशी नागरिकांसह जवळपास १,५०० लोक बेपत्ता आहेत, तसेच हजारो कुटुंबे बेघर झाली आहेत. तेथे सध्या युद्धपातळीवर बचावकार्य राबवले जात आहे.**



बुधवारी सकाळच्या सुमारास नेपाळच्या रसुवा जिल्ह्याला पुराचा मोठा फटका बसला. तिबेटच्या सीमेला लागूनच नेपाळमधील हा भाग असून तिबेटमध्ये झालेल्या हिमस्खलनामुळे ही भीषण पूरस्थिती निर्माण झाल्याचं सांगितलं जात आहे. यामुळे भोते कोशी आणि त्रिशुली नद्यांना मोठा पूर आला आहे. या पूरस्थितीमुळे नेपाळमध्ये आत्तापर्यंत जवळपास १५०० नागरीक बेपत्ता झाल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे.

**लेंडे खोला, भोते कोशी नद्यांना मोठा पूर!-**प्रत्यक्ष घटनास्थळांचं व्हिडीओ फूटेज आणि प्रभावित क्षेत्रातून आलेल्या माहितीवरून असं दिसून येतंय की मोठ्या प्रमाणावर बर्फ आणि दगडांचा राडारोडा लेंडे खोला नदीमध्ये दाखल झाला. हीच नदी पुढे भोते कोशी नदीला जाउन मिळते. संशोधकांच्या मते अचानक झालेल्या या घडामोडींमुळे नद्यांना पूर आला असावा, अशी माहिती क्ष्वक्ष्ग्ग्र कडून बुधवारी संध्याकाळी जारी करण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.

**ईशा फाउंडेशनचे पर्यटकही बेपत्ता!-** दरम्यान, ईशा फाउंडेशनतर्फे नेपाळमध्ये पर्यटनासाठी गेलेले जवळपास ७७ जण पुरात बेपत्ता झाल्याचं वृत्त पीटीआयने दिलं आहे. याशिवाय, तमिळनाडूतून नेपाळला गेलेले ३७ पर्यटकदेखील बेपत्ता झाले आहेत. मानसरोवर यात्रेसाठी भारतातून गेलेल्या पर्यटकांचादेखील नेपाळच्या पुरात बेपत्ता झालेल्या ३०० भारतीयांमध्ये समावेश आहे. याशिवाय, अनेक भारतीय पर्यटक पुरामुळे नेपाळमध्येच ठिकठिकाणी अडकून पडले आहेत. नेपाळच्या मध्यवर्ती भागातील अनेक ठिकाणी पुराच्या पाण्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. त्यामुळे असंख्य पर्यटकांना नियोजित स्थळी पोहोचता येत (पान २ वर)

# आता रात्री 12 नंतर वापरता येणार नाही इन्स्टाग्राम-फेसबुक

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** सोशल मीडिया क्षेत्रातील दिग्गज कंपनी मेटाने सोशल मीडियामुळे लहान मुलांवर होणा-या वाईट परिणामांबाबत जागृती करण्यासाठी, १८ अब्ज डालर्सपर्यंतची रक्कम भरण्यास आणि लहान मुलांच्या इन्स्टाग्राम आणि फेसबुक वापराबाबत महत्त्वाचे बदल करण्यास सहमती दर्शवली आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्नियातील ऑकलंड येथे सुरू असलेल्या एका महत्त्वपूर्ण खटल्यादरम्यान मेटाने हा निर्णय घेतला आहे.सोशल मीडिया प्लॅटफार्मच्या वापरामुळे लोकांचा स्क्रीन टाइम वाढत आहे. या सर्वांवर निर्बंध आणण्यासाठी आता, इंस्टाग्राम आणि फेसबुक डिजिटल बेडटाइम लागू करण्यात येणार आहे.या खटल्यात मेटावर असा आरोप होता की, मेटाच्या मालकीची फेसबुक आणि इन्स्टाग्राम ही ॲप्स मुले आणि किशोरवयीन मुलांना जाणीवपूर्वक व्यसनाधीन बनवत आहेत,



ज्यामुळे तरुणांच्या संपूर्ण पिढीमध्ये चिंता आणि नैराश्याची समस्या निर्माण झाली आहे. या खटल्यातील करारानुसार मेटाला १८ वर्षांखालील मुलांकडून त्यांच्या ॲप्सच्या वापराबाबत अधिक कठोर निर्बंध लागू करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मध्यरात्रीपासून ते पहाटे ६ वाजेपर्यंत फेसबुक आणि इंस्टाग्राम १८ वर्षांखालील मुलांसाठी बंद असेल. शाळेच्या वेळेत नोटिफिकेशन्स डीफाल्ट स्वरूपात बंद राहतील आणि किशोरवयीन मुले दिवसातून केवळ दोन तास इन्स्टाग्राम आणि फेसबुक ॲप्स वापरू शकतील. पण, एखाद्या (पान २ वर)

# वैद्यकीय प्रवेशात गरीब विद्यार्थ्यांच्या जागा घटणार

## तीन वैद्यकीय महाविद्यालये खासगी विद्यापीठांच्या वाटेवर

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क सवलतीच्या जागांमध्ये यंदा घट होणार आहे. एमबीबीएसच्या दोन तर दंतवैद्यकीयच्या एका महाविद्यालयाने खासगी विद्यापीठ होण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना राज्य सरकारची कोणतीही शैक्षणिक शुल्क अथवा शिष्यवृत्तीची सवलत मिळणार नाही.यात एमबीबीएस अभ्यासक्रमाचे अहिल्यानगर येथील डॉ विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन मेडिकल कॉलेज व नागपूर येथील ए.के.पी. साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स या महाविद्यालयांचा, तर बीडीएस अभ्यासक्रमाच्या नागपूरच्या रणजित देशमुख डेंटल कॉलेजचा समावेश आहे. त्यातून ही महाविद्यालये प्रवेशाच्या पहिल्या फेरीत समाविष्ट झाली नाहीत. खासगी विद्यापीठात रूपांतरण झाल्यावर प्रवेशाच्या पुढील फेरीत ती समाविष्ट होणार आहेत. त्यामुळे आता या



| एमबीबीएस प्रवेशासाठी जागा | | |
|---|---|---|
| कॉलेज | २०२६ | २०२५ |
| सरकारी | ४,९८० | ४,९३६ |
| खासगी | ३,१४९ | ३,५९९ |
| एकूण | १०,६४६ | ८,५३५ |

महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची सवलत मिळणार नाही. त्यातून एमबीबीएसचा प्रवेश घेउ इच्छिणा-या गरीब विद्यार्थ्यांच्या जागा घटणार आहेत.

**६० टक्के जागांवर राज्याबाहेरील विद्यार्थी-** दरम्यान खासगी विद्यापीठे झालेल्या या क?लेजांतील संस्थात्मक कोट्यातील ४० टक्के जागाच आता राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असतील. तर उर्वरित ६० टक्के जागांवर राज्याबाहेरील विद्यार्थ्यांना कॉलेजला प्रवेश देता येणार आहे. खासगी विद्यापीठ होण्यापूर्वी या कॉलेजांतील संस्थात्मक कोट्यातील सर्व जागांवर राज्यातील विद्यार्थ्यांना कॉलेजला प्रवेश द्यावा लागत होता.

मुलींचे मोफत शिक्षण, विविध शिष्यवृत्ती, तसेच आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना फी माफी आदी योजनांना सहजपणे बगल देता यावी, या हेतूने नेत्यांच्या महाविद्यालयांना राज्य सरकारने खासगी विद्यापीठाचा दर्जा मिळवून दिल्याचे दिसत आहे.

# एकाच कुटुंबातील चौघांची सामूहिक आत्महत्या

## ■ धावत्या ट्रेनसमोर ऊडी मारली ■



**जळगाव / प्रतिनिधी- जळगावमध्ये एकाच कुटुंबातील चौघांनी सामूहिक आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. आई-वडीलांनी दोन मुलांना घेउन धावत्या ट्रेनसमोर उडी मारत आयुष्य संपवलं. या घटनेमुळे जळगाव हादरले. घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. चौघांचे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतले असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आहे. पोलिस सध्या या सामूहिक आत्महत्या प्रकरणाचा तपास करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, जळगावच्या अमळनेर तालुक्यातील टकरेखेडा येथे आज पहाटे ही घटना घडली. सुनील अमृत भिल आणि त्यांची बायको पार्वती सुनील भिल यांनी आपल्या दोन चिमुकल्या मुलींसह रेल्वेसमोर उडी मारली. या घटनेत गंभीर जखमी झालल्या नवरा-बायकोसह दोन मुलींचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या शरीराचे अक्षरशः तुकडे झाले. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमळनेर पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.**

# खाउन-पिउन आंदोलन करा

## नरहरी झिरवळांचा आंदोलक विद्यार्थ्यांना सल्ला

**पुणे / प्रतिनिधी-** पुण्यातील मांजरी परिसरात विविध मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि उपोषण गेल्या १४ दिवसांपासून सुरू आहे. आपल्या १४ प्रमुख मागण्यांसाठी विद्यार्थी आंदोलन करत असून, काही विद्यार्थी आमरण उपोषणाला बसले आहेत. राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि नरहरी झिरवळ यांनी आंदोलनस्थळी जाउन विद्यार्थ्यांशी चर्चा केली. यावेळी दोन्ही मंत्र्यांनी विद्यार्थ्यांना आमरण उपोषण सोडण्याची विनंती केली. मात्र, विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांबाबत लेखी शासन निर्णय (जीआर) किंवा ठोस लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला.मंत्री अशोक उईके आणि नरहरी झिरवळ आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांची भेट घेण्यासाठी आले असताना त्यांच्यात संवाद झाला. यावेळी झिरवळ यांनी विद्यार्थ्यांना खाउन-पिउन आंदोलन करा असा सल्ला दिल्याचे समोर आले. झिरवळ यांचे हे वक्तव्य ऐकल्यानंतर आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले.खाउन-पिउन आंदोलन करायचं असतं तर तुम्ही इथे आलेच



नसते, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली. या संवादामुळे आंदोलनस्थळी काही काळ वातावरण हलकेफुलके झाले. मात्र, झिरवळ यांच्या वक्तव्यावर काही विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली.आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या १४ दिवसांपासून विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी उपोषण करत आहेत. काही विद्यार्थ्यांची प्रकृतीही खालावल्याची माहिती समोर आली आहे. अशा परिस्थितीत आंदोलनाबाबत केलेल्या या वक्तव्यामुळे विद्यार्थ्यांच्या गंभीर मागण्यांची आणि त्यांच्या आंदोलनाची थट्टा केली जात असल्याची भावना काही आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

**१४ मागण्यांवर पाच तास चर्चा-** आदिवासी विद्यार्थ्यांच्या १४ प्रमुख मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळासोबत तब्बल पाच तास बैठक घेतली. बैठकीनंतर सरकार आणि विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचे मंत्री उईके यांनी सांगितले. मात्र, काही मागण्यांबाबत तांत्रिक बाबी तपासणे आवश्यक असल्याने निर्णय घेण्यासाठी त्यांनी आणखी दोन दिवसांचा वेळ मागितला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात हजारो विद्यार्थी सहभागी झाले आहेत. शिक्षण, विद्यार्थी सुविधा आणि आदिवासी विकासाशी संबंधित विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे. सलग १४ दिवस आंदोलन सुरू असूनही मागण्यांवर अंतिम निर्णय झालेला नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

# पेपरफुटीला सत्ताधारी जबाबदार; विजय वडेट्टीवार

**नागपूर / प्रतिनिधी-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असून आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा पेपर लव्ह स्टोरीमध्ये फुटलेला नाही तर यात सत्ताधा-यांचा हस्तक्षेप आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.एमपीएससीच्या वर्ग-१ आणि वर्ग-२च्या अनेक जागांवर सत्ताधा-यांचा हस्तक्षेप झाल्याचा आरोप करत वडेट्टीवार म्हणाले की, एमपीएससीला स्वच्छ करण्याची गरज आहे. आयोगाच्या अध्यक्षांची पार्श्वभूमी तपासली पाहिजे. एमपीएससीच्या परीक्षा पारदर्शक असतील तरच राज्यातील लाखो तरुणांचा आयोगावरील विश्वास कायम राहील. एमपीएससी अध्यक्षांच्या कार्यशैलीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित अध्यक्ष आरटीओ विभागातून सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांच्या प्रशासकीय पार्श्वभूमीचीही तपासणी झाली पाहिजे.



आरोग्य विभागातील वर्ग-१ पासून वर्ग-४ पर्यंतच्या अधिका-यांच्या नियुक्त्यांची जबाबदारी एमपीएससीकडे सोपवण्याची गरज काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. एमपीएससीमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ सुरू आहे. हे सगळे पेपर ऑनलाईन घेण्यापेक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्यावेत. वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या भरतीची जबाबदारी जिल्हाधिका-यांकडे दिली तरच यातील गडबड थांबू शकते, असे त्यांनी सांगितले. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरती प्रक्रियेतील कथित गैरप्रकारावरही वडेट्टीवार यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले. निवड झालेल्या उमेदवारांना (पान २ वर)

# स्विगी, झेप्टो, ब्लिंकिटसह डी-मार्टमध्ये साखर खरेदीवर निर्बंध

**मुंबई / प्रतिनिधी-** येत्या सणासुदीच्या दिवसांत प्रत्येक घरात विविध प्रकारचे गोडधोड पदार्थ आणि पारंपारिक मिठाई बनवण्यासाठी साखरेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. मात्र, यंदा सण सुरू होण्याआधीच सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एका बाजूला खुल्या बाजारात साखरेच्या किमतींमध्ये कमालीची वाढ झाली आहे, तर दुस-या बाजूला किरकोळ व्यापा-यांनी आणि मोठ्या सुपरमार्केट्सनी ग्राहकांच्या साखरेच्या खरेदीवर मर्यादा लादल्या आहेत. त्यामुळे जास्त पैसे मोजूनही ग्राहकांना हवी तेवढी साखर खरेदी करता येत नसल्याने यंदाचा सण-उत्सवाचा काळ सर्वसामान्यांच्या बजेटचे गणित पुरते बिघडवणारा ठरणार आहे.



आजकाल मोबाईलवरून सामान मागवणा-या लोकांसाठी एकाच वेळी जास्त साखर खरेदी करणे अवघड झाले आहे. स्विगी, झेप्टो आणि ब्लिंकिटसारख्या ॲप्सने साखरेच्या खरेदीवर मर्यादा घातली आहे . स्विगीच्या एका ऑर्डरमध्ये फक्त २ किलोच साखर घेता येईल. झेप्टोवर एकाच वेळी जास्त पॅकेट खरेदी करता येत नाहीत आणि अनेक ठिकाणी साखरेचा साठा संपल्याचे दिसत आहे. आणि ब्लिंकिटवरही साखरेच्या खरेदीवर मर्यादा लावली आहे.

फक्त ऑनलाइनच नाही, तर प्रत्यक्ष दुकानात जाउन खरेदी करणा-यांनाही हाच अनुभव येत आहे. डी-मार्ट आणि रिलायन्स सारख्या मोठ्या दुकानांमध्ये एका ग्राहकाला एका वेळी २ ते ३ किलोपेक्षा जास्त साखर दिली जात नाहीये.सणांच्या काळात साखरेची मागणी खूप वाढते. बाजारात साखरेची कमतरता भासू नये आणि कोणीही साखरेचा साठा करून काळाबाजार करू नये, यासाठी सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत, सरकारने परदेशातून करमुक्तद्याखर आयात करण्यास परवानगी दिली आहे. व्यापा-यांना परदेशातून आणलेल्या साखरेवर प्रक्रिया करून ती बाजारात विकण्यासाठी २ महिन्यांचा वेळ वाढवून दिला आहे.

# किडनी प्रत्यारोपणाची मागणी वाढली; 61 हजार 668 रूग्ण अद्याप प्रतीक्षेत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतात किडनी प्रत्यारोपणाची गरज आणि उपलब्ध अवयव यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत असल्याचे संसदीय स्थायी समितीच्या अहवालातून समोर आले आहे. ९ फेब्रुवारीपर्यंत देशभरात ६१,६६८ रुग्ण किडनी प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षा यादीत होते. त्याचवेळी २०२४ मध्ये झालेल्या किडनी प्रत्यारोपणांची संख्या या तुलनेत खूपच कमी आहे. त्यामुळे किडनी प्रत्यारोपणासाठी उपलब्ध अवयवांची मोठी कमतरता असल्याचे समितीने नमूद केले आहे.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण विषयक संसदीय स्थायी समितीने मोठ्या राज्यांमधील किमान तीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये किडनी प्रत्यारोपणाची सुविधा सुरू करण्याची शिफारस केली आहे. तसेच लहान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये किमान एका ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना करण्यात आली आहे. देशात २०२४ मध्ये एकूण १३,४७६ किडनी प्रत्यारोपण झाले.

यामध्ये ११,५५८ प्रत्यारोपण जिवंत दात्यांकडून, तर १,९१८ प्रत्यारोपण मृत दात्यांकडून मिळालेल्या किडनीच्या माध्यमातून झाले. मात्र, ९ फेब्रुवारीपर्यंत ६१,६६८ रुग्ण प्रतीक्षेत असल्याने मागणी आणि उपलब्धता यातील तफावत मोठी असल्याचे समितीने स्पष्ट केले. प्रत्यारोपणाच्या सुविधा देशभर समान प्रमाणात उपलब्ध नसून त्यासाठी काही मोजक्या राज्यांवर आणि महानगरांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत आहे. दिल्ली, तामिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात आणि



कर्नाटक या राज्यांमध्ये प्रत्यारोपणाची संख्या तुलनेने अधिक आहे. त्यामुळे देशातील अनेक भागांमध्ये रुग्णांना प्रत्यारोपणाच्या सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचे समितीने निदर्शनास आणले.

**मृत दात्यांकडून अवयवदानाचे प्रमाण वाढवण्याची गरज-** किडनीच्या उपलब्धतेतील तुटवड्याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारतातील मृत व्यक्तींकडून होणारे अवयवदानाचे कमी प्रमाण असल्याचे समितीने म्हटले आहे. अवयवदानाबाबत समाजातील गैरसमज, पुरेशी जनजागृती नसणे, अवयव मिळवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव आणि विविध प्रक्रियात्मक अडथळे यामुळे मृत दात्यांकडून अवयवदानाचे प्रमाण कमी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर समितीने देशभरात अवयवदानाबाबत जनजागृती आणि वर्तनात्मक बदल घडवून आणण्यासाठी व्यापक मोहीम राबवण्याची शिफारस केली आहे. रुग्णालयांमध्ये अवयवदानासाठी समन्वय यंत्रणा अधिक सक्षम करण्याबरोबरच अवयव मिळवणे आणि प्रत्यारोपणासाठी आवश्यक सुविधा वाढवण्यावरही भर देण्यात आला आहे.

**वंचित भागांवर विशेष लक्ष**

देशातील अवयव संकलन केंद्रे आणि प्रत्यारोपणाच्या पायाभूत सुविधांची संख्या वाढवण्यासाठी कालबद्ध उद्दिष्टे निश्चित करण्याची गरज समितीने व्यक्त केली आहे. विशेषतः आरोग्य सुविधांचा अभाव असलेल्या आणि डोंगराळ भागांमध्ये अवयव संकलन केंद्रे व प्रत्यारोपण सुविधा वाढवण्याचे (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संवाद

## विद्यार्थ्यांना दिला यशाचा कानमंत्र; 'जो खेळेल, तो बहरेल'चा संदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-**

'खेलो इंडिया संवाद' या विशेष कार्यक्रमासाठी अमरावती जिल्ह्यातून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाची निवड करण्यात आली होती. या कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशभरातील युवा खेळाडू आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधत क्रीडा क्षेत्रातील भारताची वाटचाल, युवा खेळाडूंसाठीच्या संधी आणि आगामी ऑलिम्पिकचे नियोजन याबाबत मार्गदर्शन केले.




भारताचे ऑलिम्पिकमधील प्रतिनिधित्व आणखी व्यापक करण्याची गरज व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३६ च्या ऑलिम्पिकमध्ये भारताने सर्वच क्रीडा प्रकारांमध्ये दमदार सहभाग नोंदवावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच देशभरातील युवा खेळाडूंमधील सुप्त क्रीडा प्रतिभा शोधून त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी टॅलेंट हंटचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

युवा खेळाडूंना प्रोत्साहन देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जो खेळेल, तो बहरेल' हा प्रेरणादायी संदेश दिला. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी पंतप्रधानांनी सर्वांना राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या विशेष संवाद कार्यक्रमाला देशभरातील १,५०० हून अधिक शैक्षणिक संस्था व्हर्च्युअली जोडल्या गेल्या होत्या. अमरावती जिल्ह्यातून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे या ऐतिहासिक संवादाचा भाग होण्याची संधी मिळाली. महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन ऐकले. पंतप्रधानांसोबत थेट संवाद साधण्याची मिळालेली संधी विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रेरणादायी ठरली. युवा शक्तीला क्रीडा शक्तीशी जोडत विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचा संदेश या संवादातून विद्यार्थ्यांना मिळाला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासोबतच देशासाठी योगदान देण्याची नवी प्रेरणा निर्माण झाली.

# लोकनेते पु.ना. उपाख्य नानासाहेब देशमुख यांचा पुण्यस्मरण सोहळा थाटात

## -नारायण विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन
## -गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व रोख बक्षिसांनी गौरव

**आसेगाव पूर्णा / प्रतिनिधीः-**

आसेगाव पूर्णा येथून जवळच असलेल्या टाकरखेडा पूर्णा येथील नारायण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पीपल्स वेल्फेअर सोसायटी, अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्व. पु.ना. उपाख्य नानासाहेब देशमुख यांचा १३वा पुण्यस्मरण सोहळा गुरुवारी (२७ ऑगस्ट) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



पुण्यस्मरण दिनानिमित्त विद्यालयात वक्तृत्व, रांगोळी, निबंध, चित्रकला तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते स्व. नानासाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी शाळा सल्लागार समितीचे पदाधिकारी मोहन कराळे, हिवरा पूर्णा ग्रामपंचायतीचे सरपंच शरद वाटाणे, रूपराव नवले, सुधीर प्रजापती आदी मान्यवर उपस्थित होते. विविध स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

मार्शल आर्ट, कराटे व वुशू खेळाचे मार्गदर्शक मुकेश बांगर यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. चित्रकला, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन श्रद्धा ठाकरे, गावंडे व आचल प्रजापती यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य शरद नवले होते. प्रा. राजेश देशमुख, प्रा. गजानन सांगोले, प्रा. केशव वाटाणे, एस.आर. देशमुख यांच्यासह उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांनी स्व. नानासाहेब देशमुख यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका स्वाती शिरभाते यांनी केले, तर सहाय्यक शिक्षक पंकज पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जी.बी. वानखडे, संदीप देवडे, सुशील वानखडे, सरिता लव्हाळे, वनिता अमझरे आदींनी सहकार्य केले. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# १ व १० वरिल उर्वरित

## आता रात्री १२ नंतर वापरता

पालकाने हे नियंत्रण बंद केल्यास ही अट लागू होणार नाही. तसेच, किशोरवयीन मुलांच्या पोस्ट्सवरील लाईक्सची संख्या डीफाल्ट स्वरूपात लपवली जाईल.

हा करार अशा प्रकारे तयार करण्यात आला आहे की, जर मेटाचे स्पर्धक असलेल्या युट्यूब आणि टिकटाक या कंपन्यांनी या अटी मान्य केल्या, तर त्यातील नियम अधिक कठोर होतील. यामध्ये १८ वर्षांखालील मुलांसाठी रात्री १० ते सकाळी ७ या वेळेत सेवा बंद (ब्लॅकआउट) राहील आणि प्रत्येक ॲपचा वापर दिवसाला जास्तीत जास्त एका तासापर्यंत मर्यादित केला जाईल. जर या दोन कंपन्यांनीही हीच नवीन धोरणे स्वीकारली आणि तितकीच रक्कम भरली, तर मेटाला अतिरिक्त ५.३ अब्ज डॉलर्स भरावे लागतील.

मेटाने अनेक वर्षांपासून असा युक्तिवाद केला आहे की, जरी त्यांनी मुलांसाठी अधिक कठोर नियंत्रणे लागू केली, तरी मुले त्यांचे ॲप सोडून इतर ॲप्सकडे वळतील. मेटाने युट्यूब आणि टिकटाक यांना उद्देशून एक खुले पत्र जारी केले असून, त्यांना या नियमांचे पालन करण्यास सहमती दर्शवण्याचे आवाहन केले आहे.

**लाईक्स आणि रिॲक्शन्सची संख्या नाहीशी-** रात्री आणि शाळेच्या वेळेत नोटिफिकेशन्ससुद्धा कमी केली जातील. मेटाने एक चाचणी सुरू केली जाणार आहे. सोशल मीडियावर मुलांची सक्रियता कमी करण्यासाठी, अल्पवयीन मुलांच्या पोस्टवरील लाईक्स आणि रिॲक्शन्सची संख्या नाहीशी केली जाईल. या वापरकर्त्यांसाठी कास्मेटिक-सर्जरी फिल्टर्सवर बंदी घातली जाईल, वय-खात्री प्रणाली आणि पालक नियंत्रणे अधिक मजबूत केली जातील.

**मेटा अब्जावधी डालर्सचे देयक भरेल**

मेटा सुरु वातीला अंदाजे १२.७ अब्ज डालर्सचे देयक भरेल अशी अपेक्षा आहे, आणि टिकटाक व यूट्यूबसारखे इतर प्लॅटफार्म अशाच प्रकारची रणनीती अवलंबून आर्थिक योगदान देतात की नाही यावर अवलंबून, ही एकूण रक्कम १७.१ अब्ज डालर्सपर्यंत पोहोचू शकते. ही एक मोठी रक्कम असली तरी ती मेटाच्या घोषित महसुलापेक्षा खूपच कमी आहे, ज्याने २०२५ मध्ये अंदाजे २०१ अब्ज डालर्स महसुलाचा अंदाज वर्तवला होता.

## नेपाळच्या महापुरात

नसल्याचं चित्र ठिकठिकाणी दिसून येत आहे.

**नेपाळ पुराच्या पार्श्वभूमीवर केंद्राचे राज्यांना निर्देश-**नेपाळमधील पूरस्थितीमध्ये जवळपास ३०० हून अधिक भारतीय बेपत्ता झाल्याची अधिकृत माहिती नेपाळमधील प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारनेदेखील पावलं उचलण्यास सुरु वात केली आहे. केंद्र सरकारने सर्वा राज्य सरकारांना यासंदर्भात निर्देश दिले आहेत. आपापल्या राज्यांमधील किती आणि कोणते पर्यटक नेपाळमधील पुरामध्ये बेपत्ता झाले आहेत, याची माहिती गोळा करू न ती केंद्र सरकारला पाठवण्याचे आदेश राज्य सरकारांना देण्यात आले आहेत. या माहितीमध्ये संबंधित व्यक्तीचं नाव, संपर्क क्रमांक आणि इतर आवश्यक माहितीचा समावेश आहे.

**नेपाळमध्ये आणखी एक पूर येउ शकतो!-**दरम्यान, तज्ज्ञांनी नेपाळमध्ये आणखी एक पूर येउ शकतो अशी धक्कादायक शक्यता वर्तवली आहे. लेंडे खोला नदीत झालेल्या हिमस्खलनामुळेच हा महापूर आल्याचा प्राथमिक अंदाज असला,अद्याप पुराचं नेमकं कारण अस्पष्ट आहे. नेपाळ-चीन सीमेवर अजूनही एका ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहून आलेला बर्फ अडकलेला असून तो बर्फ तिथून मोकळा झाल्यास आणखी एका पुराचा सामना नेपाळला करावा लागू शकतो असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. त्यामुळेच नेपाळच्या जिलाँग बंदर व आसपासच्या परिसरातून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती क्ष्क्ष्ग्र्न पर्यावरणीय धोका व वातावरणातील बदल विभागाचे प्रमुख क्वांगॉंग झँग यांनी निवेदनामध्ये दिली आहे.

## पेपरफुटीला सत्ताधारी

नियुक्ती न देणे, त्यानंतर न्यायालयीन प्रक्रिया सुरू होणे आणि पदोन्नतीच्या प्रक्रियेत निर्माण झालेला गोंधळ यामुळे अनेक पदे रिक्त राहिली आहेत. या संपूर्ण प्रकरणात एमपीएससीमधील संबंधित अधिका-याला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जीआर रद्द केला असला तरी विद्यार्थ्यांच्या अनेक मागण्या अद्याप प्रलंबित आहेत. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची भेट घेउन त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची जबाबदारी सत्ताधा-यांची आहे. आमच्या सरकारच्या काळात आम्ही आंदोलनाच्या ठिकाणी जाउन विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेत होतो. आता प्रश्न विचारणारे लोकच सरकारला सहन होत नाहीत. प्रश्न सोडवण्याची हिंमत नाही आणि म्हणून आदिवासी विद्यार्थ्यांना वा-यावर सोडले आहे, अशी टीका त्यांनी केली. मागील वर्षी आदिवासी विभागाच्या तरतुदीपैकी केवळ सुमारे २९ टक्के निधी खर्च झाला.आदिवासींसाठी मंजूर केलेला निधी दुसरीकडे वळवण्याचा अधिकार सरकारला आहे का? असा सवाल केला.

## किडनी प्रत्यारोपणाची मागणी वाढली;

आवाहन करण्यात आले आहे. २०१९ ते २०२३ या कालावधीतील आकडेवारीतही एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. या काळात जिवंत अवयवदात्यांमध्ये महिलांचे प्रमाण ६३.८ टक्के, तर प्रत्यारोपण घेणा-या रु ग्णांमध्ये पुरु षांचे प्रमाण ६९.८ टक्के होते. या फरकाची कारणे शोधण्यासाठी सखोल अभ्यास करण्याची मागणी समितीने केली आहे. सामाजिक-आर्थिक परिस्थिती, सांस्कृतिक घटक, आर्थिक अडचणी किंवा लिंगाशी संबंधित अडथळ्यांमुळे हा फरक निर्माण होतो का, याचा अभ्यास करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

असे आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार भांबोरा येथील चरणदास वासुदेवराव इखे हे आपली पत्नी व मुलगा यांना घेऊन बैलबंडीने सकाळी ८ वा.त्यांच्या भांबोरा येथील शेत शिवारात असलेल्या शेतात गेले होते.चरणदास इखे यांनी आपल्या स्वतःच्या शेताच्या धुऱ्याला लागून असलेले शेत लागवडीने घेतले होते. दरम्यान चरणदास यांची पत्नी व मुलगा त्यांच्या स्वतःच्या शेतात होते.ते मात्र लागवडीने घेतलेल्या शेतात पऱ्हाटी निंदन करीत होते.निंदन करीत असतांना अचानक वाघ तेथे कुठून आला हे कोणाला माहित नसतांना त्या वाघाने चरणदास यांच्यावर हल्ला चढवून चक्क गळा पकडून त्यांना जवळपास दोनशे फुटापर्यंत फरफटत नेले.स्वतःच्या शेतात असलेला मुलगा आपले वडील चरणदास यांना न्याहारी(नाश्ता)साठी बोलाविण्याकरिता गेला असता त्याला निंदन करण्याच्या विळ्याला रक्त आढळून आले व फरफटत नेल्याच्या खुणा दिसल्या.त्यावरून त्याने प्रचंड आरडाओरड सुरू केली.आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी त्याला प्रतिसाद देऊन त्यांनी सुद्धा आरडाओरड सुरू केली.हा आवाज ऐकून वाघाने बाजूला असलेल्या नाल्यात चरणदास यांना सोडून पळ काढला.पण चरणदास इखे हे मृत्युमुखी पडले होते. त्यावेळी मृतकाचा मुलगा व आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी त्यांचा मृतदेह नाल्यातून वर काढला व या घटनेबाबतची माहिती मोर्शी पोलिसांना दूरध्वनीवरून देण्यात आली.या गंभीर घटनेची दखल घेत ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली एक पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले.वनपरिक्षेत्र कार्यालयातील भुजाडे,तहसीलदार सागर ढवळे,तिवसा मतदारसंघाचे आमदार यांच्या पत्नी आरती वानखडे,पोलीस पाटील मीनाक्षी विनोदराव साबळे यांनी घटनास्थळी धाव घेतली.मोर्शी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तसेच वनपरिक्षेत्र कार्यालयाचे कर्मचारी यांनी मृतकाचा पंचनामा आटोपून प्रेत शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रवाना केले.

## विद्यार्थ्यांच्या नावाने बनावट

नाव फरहान अली सुभान अली (वय २४) असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी हा उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यातील रहिवासी असून गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळताच त्याने मोबाईल बंद करून गुजरातमधील अहमदाबाद येथे पलायन केले होते.

तांत्रिक तपासातून आरोपीचा ठावठिकाणा मिळाल्यानंतर यवतमाळ पोलिसांचे पथक गुजरातला रवाना झाले. अहमदाबाद येथून आरोपीला २५ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाच्या आदेशानुसार दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाल्यानंतर त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## भगव्या दुपट्ट्यावरील आक्षेपार्ह

पोलिसांनी आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

काही वेळ चाललेल्या घोषणाबाजीनंतर बाजार समिती प्रशासनाने हस्तक्षेप केला. यावेळी सभापती सुनील गावंडे,उपसभापती राजेंद्र कराळे,सचिव नरेंद्र आगरकर यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला.अखेर वादग्रस्त विधान करणाऱ्या संचालकाने उपस्थितसमोर माफी मागितली . त्यानंतरच आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी माजी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट, नगर परिषद गटनेता प्रदिप मलिये,तालुकाप्रमुख गणेश लाजुरकर ,मनोज पाटील गव्हाणे, शहर अध्यक्ष महेंद्र भांडे , तुषार चौधरी, अतुल सगणे, आशिष धानोरकर, योगेश बुंदे, विनय गावंडे,शाम साखरे,संजय राणे , नागेश कांबे,किशोर दुतोंडे, सौरभ मलिये,राहुल भुंबर, शरद आठवले,कमलेश वानखडे गणेश धुरटे, निरज नागे, योगेश मोपारी, सागर विल्हेकर, शरद अरबट, गजानन अरबट, रवि पवार,,वैभव भांडे, संदिप राजगुरे,वैभव काळे शुभम साखरे आकाश नागपुरे गोकुळ चांदुरकर,विलास साखरे, सागर फलके, विनोद,पाचकवडे,सागर गेठे,अक्षय आठवले विनोद गेठे,प्रकाश राऊत, अनिकेत कोळमकर, दिपक कावनपुरे, आकाश कराळे, राहुल सांगोले, शरद साखरे, विनोद सोनटक्के, मंगेश बोरकर, गोपाल झापे, स्वप्नील मात्रे, श्रीजीत सुरजुसे, विठु नागे, राम गावंडे, महादेव रहाटे, गणेश गावंडे,आकाश नारोळकर, स्वप्निल घोगरे, संकेत तारळ,आतिष गव्हाणे, राजाभाऊ शेजव, परेश कडु आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## राजकमल चौकातील अनधिकृत

लोंबकळणाऱ्या केबल्स काढण्याची मागणी केली होती.

त्यानुसार, गुरुवार, दि.२७ ऑगस्ट २०२६ रोजी शहरातील प्रमुख चौक असलेल्या राजकमल चौकात मनपाच्या पथकाने कारवाई करत लोंबकळणाऱ्या अनधिकृत केबल्स काढल्या. तसेच वापरात नसलेल्या अनावश्यक डेड केबल्सही कापून हटविण्यात आल्या.

शहरातील विविध भागांत अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्स तसेच लोंबकळत असलेल्या केबल्स संबंधित केबल ऑपरेटर्सनी तातडीने स्वतःहून काढून घ्याव्यात, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे. अन्यथा महानगरपालिकेकडून नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या कारवाईदरम्यान स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, गटनेता नाना आमले, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, उपअभियंता शरद तिनखेडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, स्वच्छता निरीक्षक प्रशांत गावनेर यांच्यासह मनपा कर्मचारी उपस्थित होते.

## हिवरखेड नगर परिषदेच्या सभेत

गट आमनेसामने आल्यानंतर हाणामारी झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेनंतर जखमी नगरसेवकांसह इतर जखमींचे वैद्यकीय परीक्षण करण्यात आले आहे. जखमींचे मेडिकल रिपोर्ट आणि संबंधितांचे जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वृत्त लिहीपर्यंत पोलिस ठाण्यात गुन्ह्याची अधिकृत नोंद झालेली नव्हती. मासिक सभेत जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये झालेला वाद थेट हाणामारीपर्यंत पोहोचल्याने हिवरखेडच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आता पोलिस तपासात या 'राड्या'मागचे नेमके कारण आणि दोषी कोण, हे स्पष्ट होणार आहे.

**'रॉडने मारहाण केली'; शिंदे सेना गटाचा आरोप**

शिंदे सेना गटनेते तथा नगरसेवक रवी राणा घुंगड यांनी या घटनेबाबत गंभीर आरोप केले. 'नगर परिषदेत भाजपची एकहाती सत्ता असून दादागिरीच्या माध्यमातून जनतेचा आणि विरोधकांचा आवाज दाबला जात आहे. आम्ही जनतेच्या विकासासाठी सभेत प्रश्न उपस्थित केले. त्यातूनच शिंदे सेनेचे नगरसेवक ऋषिकेश पंचबुद्धे यांना रॉडने जोरदार मारहाण करण्यात आली. त्यात ते जखमी झाले असून माझ्या पाठीवरही मार लागला,' असा आरोप घुंगड यांनी केला.

**'परवानगी न घेता शूटिंग सुरू' - नगराध्यक्ष** नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे यांनी मात्र वेगळी बाजू मांडली. 'मी सभेची अध्यक्ष असताना माझी परवानगी न घेता ऋषिकेश पंचबुद्धे यांनी जाणीवपूर्वक व्हिडिओ शूटिंग सुरू केली. मनाई केल्यानंतरही त्यांनी शूटिंग सुरूच ठेवल्याने विवाद झाला. काही वेळाने सभा पूर्ववत सुरू झाली. नगरपरिषदेसमोर हाणामारीचा कोणता प्रकार झाला, याबाबत मला माहिती नाही,' असे दुतोंडे यांनी सांगितले.

**भाजप गटाकडूनही मारहाणीचे आरोप-** दरम्यान, भाजपचे बांधकाम सभापती अजित खा जमीर खान यांनाही मारहाण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच नगराध्यक्ष सुलभा दुतोंडे यांचे भाचे विशाल कुलट यांच्या हाताला दुखापत झाली असून, त्यांच्या डोक्याला आणि पोटाला धारदार शस्त्राने मारहाण झाल्याचे सांगण्यात येत आहे. माजी सरपंच संदीप इंगळे यांनी ही माहिती दिली.

## अटीशर्तींशिवाय २ लाखांची

तालुक्यातील बिकट परिस्थिती पाहता तिवसा तालुका तातडीने कोरडा दुष्काळ म्हणून घोषित करण्याची आक्रमक मागणीही यावेळी करण्यात आली.

तिवसा पेट्रोल पंप चौकात शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सरकार विरोधी नारेबाजी केली. त्यांनतर तहसील कार्यालयाच्या पुढे घोषणाबाजी करत फसवी कर्जमाफी देत सरकार कसे असंवेदनशील आहे. यासंदर्भात सर्वपक्षीय नेत्यांनी आपले भाषण केले. त्यानंतर तहसीलदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले.

अशा बिकट परिस्थितीत सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे दिलासा मिळेल, अशी आशा होती. मात्र, वन टाईम सेटलमेंट पद्धती लागू करून फक्त मुद्दल सरकारने द्यायचे आणि व्याज बँकांनी माफ करायचे, या धोरणामुळे शेतकऱ्यांची पत धोक्यात आली आहे. बँकांच्या या तडजोडीमुळे भविष्यात गृहकर्ज, व्यवसाय कर्ज किंवा इतर कर्जे मिळणे बंद होईल. सरकारने अशा प्रकारे पावले उचलल्यास शेतकऱ्यांनी आत्महत्या करायच्या का? असा जळजळीत सवाल निवेदनाद्वारे विचारण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कोणताही नियम किंवा अटींचा फास न आवळता तात्काळ कमी न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सर्वपक्षीय नेत्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी प्रशांत कांबळे, अनिल थुल, वैभव वानखडे, श्रीराम देशमुख, प्रकाश सोनोने, सागर भवते, विश्वजीत बाकडे, रितेश पांडव, सिद्धेश्वर जाधव, अमोल पन्नासे, स्वप्नील गंधे, वैभव काकडे, योगेश वानखडे, अनंत शेंद्रे, मनोज दिगांबरे, संजय ठाकरे, अमोल बेलसरे, नवीन कोचर, आशिष ढोले, मिलिंद खाकसे यांच्यासह शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

## दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना

येतील, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी यांनी आज जिल्हा स्त्री रूग्णालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी आग लागलेल्या अतिदक्षता विभागाची पाहणी केली. आमदार प्रताप अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी आदी उपस्थित होते.

श्रीमती बोर्डीकर यांनी सांगीतले, जिल्हा स्त्री रूग्णालयातील आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी आरोग्य आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सर्व बाबींची सखोल चौकशी करून अहवाल देणार आहे. चौकशीत कोणत्याही व्यक्तीने दुर्लक्ष केल्याचे सिद्ध झाल्यास त्यांच्याविरूद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये, यासाठी राज्यातील सर्व रूग्णालात उपाययोजना करण्यात येतील. रूग्णालायातील बालके इतर रूग्णालयात हलविण्यात आली आहेत. त्यांच्यावर दर्जेदार उपचार करण्यात येतील. तसेच आगीच्या घटनेवेळी कर्मचाऱ्यांनी वेळेचे भान राखत बचाव केला. याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. आगीच्यावेळी गांभीर्याने घटनेचा सामना केल्याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी त्यांनी जिल्हा स्त्री रूग्णालयात तातडीने उभारण्यात आलेल्या अतिदक्षता कक्षाला भेट देऊन पाहणी केली.

## डफरीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर

समाजमन अजूनही सुन्न असून डफरीनच्या कामकाजावर सुद्धा त्याचा परिणाम जाणवत आहे. झालेली घटना अत्यंत दुःखद व दुर्दैवी असली तरी अन्य रुग्णांवर व आरोग्यसेवेवर त्याचा परिणाम होऊ नये, तसेच डफरीन रुग्णालयातील आरोग्य सेवा सुरळीत चालण्याला घेऊन आमदार सुलभा खोडके व विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) येथे भेट देऊन आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. डफरीनमध्ये एकूण तीन नवजात शिशू अतिदक्षता कक्ष आहे. त्यापैकी एक एनआयसीयु जळाले असल्याने आता अतिरिक्त दोन एनआयसीयू तात्काळ सुरु करण्याचे नियोजन करण्याबाबत सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने सुचना करण्यात आल्यात.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील एनआयसीयु अग्निकांडानंतर तेथे उपचार घेणाऱ्या नवजात बाळांना खाजगी इस्पितळात हलविण्यात आले आहे. तसेच सद्यापरिस्थितीत रुग्णालयातील नवजात बाळांना अतिदक्षतेच्या सुविधेअभावी बाहेर पाठविण्यात येत असल्याचा प्रकार समोर आल्याने आमदार -संजय खोडके व आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी डफरीन प्रशासनाशी चर्चा केली. गेल्या वर्षभरापूर्वीच कार्यान्वित झालेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नूतन इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर नवजात बालकांच्या अतिदक्षतेच्या उपचारासाठी तीन एनआयसीयू कक्ष स्थापित करण्यात आले आहे. या तीन कक्षांमधील जळालेल्या कक्षात १० नवजात बालकांवर उपचार करण्याची क्षमता होती. त्याला आता आग लागण्याने उर्वरित १२ मिनीबेड व १७ मिनिबेड एनआयसीयु तातडीने कार्यान्वित करण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आल्या. डफरीन रुग्णालयातील नवजात बाळांना अतिदक्षतेच्या उपचारासाठी बाहेर पाठवू नये, म्हणून अतिरिक्त दोन एनआयसीयू कक्ष लवकरात लवकर सर्व अद्यावत संसाधने व दक्षतापूर्वकरित्या सज्ज करण्याबाबत सुद्धा यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आमदार महोदयांनी डफरीन मधील जळालेल्या एनआयसीयु कक्षाचे अत्यंत बारकाईने अवलोकन केले. आगीचे स्वरूप अत्यंत भीषण व गंभीर असल्यामुळे आगीचे मूळ कारण अद्यापपर्यंत समजू शकत नसले तरी घटनेत जिवीतास धोका पोहोचविणे हे अत्यंत दुःखद आहे. त्यामुळे पुढे अशा प्रकारच्या घटना घडू नये , यासाठी डफरीन रुग्णालयातील विद्युतीकरण, उपकरणे याबाबत असलेल्या तांत्रिक उणिवा लगेच दूर करून फायर ऑडिट, रुग्णांची सुरक्षितता, अग्निशमन व्यवस्था, आवश्यक वैद्यकीय सुविधा तसेच आपत्कालीन व्यवस्था तातडीने अद्यावत करण्याच्या सूचना आमदार संजय खोडके यांनी केल्यात.

डफरीन रुग्णालयातील अग्निकांडाच्या घटनेनंतर सद्या तेथील आरोग्य सेवा प्रभावित व विस्कळीत झाली असल्याच्या खोट्या अफवा पसरविल्यात जात आहे. परंतु डफरीनची आरोग्य सेवा सध्या सुरळीत सुरू असून रुग्णांना आवश्यक उपचार व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीद्वारे गैरसमज निर्माण करू नयेत, असे आवाहन आमदार संजय खोडके यांनी केले.

यावेळी आमदार महोदयांनी डफरीन रुग्णालयातील वैद्यकीय स्टाफ, आरोग्य सेवक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांचे मनोधैर्य वाढविले. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. अशा संवेदनशील प्रसंगी सर्वांनी संयम राखून आरोग्य प्रशासनाला सहकार्य करावे. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आणि आरोग्य सेवा सुरळीत ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार सुलभा खोडके यांनी केले.

यावेळी आरोग्य सेवा उपसंचालक अकोला सुशील कुमार वाकचौरे, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावतीचे जिल्हा शल्यचिकित्सक तथा डफरीन रुग्णालय अमरावतीचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक - डॉ. विनोद पवार, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावतीचे वैद्यकीय अधीक्षक - डॉ. अमोल नरोटे, नवजात शिशु तज्ज्ञ - डॉ. विजया बोरा, एन. आय. सी. यु. इन्चार्ज - डॉ. प्रिती इंगळे, बालरोग तज्ज्ञ - डॉ. निलेश पाचबुद्धे,विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय बायो मेडिकल इंजिनियर - अमोल वाडेकर,जिल्हा स्त्री रुग्णालय प्रशासकीय अधिकारी - संदीप गोपाळराव तारगे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे - उपअभियंता एन. प्रकाश रेड्डी , सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत शाखा उपअभियंता -विनोद गहुकर, शाखा अभियंता- शंतनू गुल्हाने, मनपा मुख्य अग्नीशमन अधिकारी- दिनेश हंबर्डे, अजय पंधरे,आदींसह आरोग्य सेवेतील प्रशासकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य कर्मचारी आदी उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## बापाचे छत्र हरविलेल्या मुलींना १ लाखांची आर्थिक मदत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

माजी खासदार तथा माजी मंत्री मा. अनंतरावजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत भाजपा नेते नकुलदादा देशमुख व भाजपा नेत्या मा. सौ. अमृताताई देशमुख यांनी मांगूळ झनक येथे दुःखद प्रसंगाने खचलेल्या एका कुटुंबाला माणुसकीचा आधार दिला.



काही दिवसांपूर्वी मांगूळ झनक येथे वीज पडून स्व. गजानन सुरुशे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या दोन मुलींवरील वडिलांचे छत्र हरपले. घरातील आजीही अर्धांगवायूमुळे अंथरुणाला खिळलेली असल्याने या कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. अशा कठीण प्रसंगी भाजपा रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख नकुलदादा देशमुख व भाजपा नेत्या अमृताताई देशमुख यांनी पुढाकार घेत दोन्ही मुलींना ? १ लक्ष रुपयांची आर्थिक मदत देत त्यांच्या कुटुंबाला आधार दिला. केवळ आर्थिक मदत करून न थांबता, या दोन्ही मुलींचे इयत्ता १२ वीपर्यंतचे शिक्षण तसेच रिसोड येथे त्यांच्या राहण्याची व्यवस्था स्वतः करण्याची जबाबदारी घेण्याचे आश्वासन माजी मंत्री अनंतरावजी देशमुख, ॲड. नकुलदादा देशमुख व सौ. अमृताताई देशमुख यांनी त्यांच्या पालककर्त्यांना दिले.

शेतकरी असो, सर्वसामान्य कुटुंब असो किंवा अचानक आलेले नैसर्गिक संकट— अडचणीच्या काळात मदतीचा हात पुढे करण्याची भूमिका अनंतराव देशमुख यांच्या कुटुंबीयांकडून सातत्याने घेतली जात असल्याची चर्चा मतदारसंघात होत आहे. मागील वर्षी अवास्तव खर्च टाळत मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये २ लक्ष ५०००० रुपये देणे ते गरजू नागरिकांच्या पाठीशी उभे राहण्यापर्यंत विविध माध्यमांतून सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी सदैव तत्पर असल्याची भावना जनतेतुन व्यक्त होत आहे.

### राजकारणापलीकडे माणुसकीची जपणूक

राजकारण हे केवळ पद, सत्ता आणि निवडणुकांपुरते मर्यादित न राहता संकटाच्या वेळी सामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचे या उपक्रमातून दिसून आले. बापाचे छत्र हरवलेल्या दोन मुलींच्या शिक्षणाची आणि निवासाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या भवितव्याला दिलेला विश्वासाचा हात असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दुःखाच्या प्रसंगी प्रसिद्धीपेक्षा माणुसकीला प्राधान्य देत गरजूंच्या मदतीला धावून जाणाऱ्या माजी मंत्री अनंतराव देशमुख, भाजपा नेते नकुलदादा देशमुख, भाजपा नेत्या अमृताताई देशमुख यांच्या या संवेदनशील भूमिकेचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत असून, 'संकटात जो आपल्या माणसासारखा उभा राहतो, तोच खरा लोकांचा आधार', अशी भावना जनतेतून व्यक्त होत आहे. यावेळी सुभाषराव खरात, प्रभाकरराव तहकीक, डॉ. भाग्यवंत , भुषण दांदडे, केशवराव बाजड, पंजाबराव घोटे, सतीश झनक, दत्तराव दांदडे, राजू जोशी, अनिल कोरडे, सतीष काळे, संजय दांदडे, रामकिसन घोटे आदींची उपस्थिती होती.

### संकटात धावून जाणाऱ्याची परंपरा कायम

*याच दुर्घटनेत वीज पडून जखमी झालेल्या विशाल नंदकिशोर लेमाडे व रवि कोरडे यांनाही माजी खासदार अनंतराव देशमुख, भाजपा नेते नकुलदादा देशमुख, भाजपा नेत्या अमृताताई देशमुख यांनी आर्थिक मदत देण्यात आली. तसेच काही महिन्यांपूर्वी मांगूळ झनक येथील शेतकरी शगजानन खिल्लारी यांच्या सोयाबीनच्या सुडीला आग लागून मोठे नुकसान झाले होते. त्या वेळीही भाजपा नेते नकुलदादा देशमुख व भाजपा नेत्या अमृताताई देशमुख यांनी तातडीने पुढाकार घेत खिल्लारी यांना आर्थिक मदत केली होती.तसेच काही दिवसापूर्वी मांगूळ झनक चे भाजपा बुथ प्रमुख गणेश काळे यांचा अपघात झाला होता त्यात त्यांना गंभीर दुखापत झाली होती त्यांनाही आर्थिक मदत करण्यात आली.*

## PIB च्या आकांक्षीत जिल्हा पत्रकार अभ्यास दौऱ्यात; मुंबईतील ASCI च्या कार्यपद्धतीची घेतली माहिती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पत्र सूचना कार्यालय (PIB), मुंबईच्या वतीने आकांक्षीत जिल्ह्यातील पत्रकारांसाठी आयोजित मुंबई-दिल्ली अभ्यास दौऱ्याला चर्चगेट येथील क्षेत्रीय कार्यालयापासून सुरुवात झाली.



या दौऱ्यात वाशिम जिल्ह्यातून सुनील कांबळे, प्रमोद लक्रस आणि दत्ता महाले, धाराशिवमधून देविदास पाठक, अविनाश पोफळे, शिवराम कांबळे आणि नंदुरबारमधून योगेंद्र दोरकर, निलेश पवार, गौतम बैसाने हे पत्रकार सहभागी झाले. गडचिरोली जिल्ह्यातील पत्रकारांची रेल्वे उशिराने पोहोचल्याने ते पहिल्या सत्रात उपस्थित राहू शकले नाहीत.

यावेळी महाराष्ट्र-गोवा क्षेत्रीय प्रचार कार्यालयाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा, उपसंचालक जयदेवी पुजारी-स्वामी आणि प्रसार माध्यम अधिकारी श्रीयांका चटर्जी यांनी सर्व पत्रकारांचे स्वागत केले. महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी या अभ्यास दौऱ्यामागील हेतू आणि पुढील दिशा स्पष्ट करत मार्गदर्शन केले. या संपूर्ण दौऱ्याची जबाबदारी उपसंचालक जयदेवी पुजारी-स्वामी आणि श्रीयांका चटर्जी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

### ASCI ला भेट - जाहिरात मानक परिषदेची माहिती

PIB मधील कार्यक्रमानंतर पत्रकारांच्या चमूने मरीन ड्राईव्ह, वरळी मार्गे ASCI अर्थात The Advertising Standards Council of India (भारतीय जाहिरात मानक परिषद) कार्यालयाला भेट दिली.

येथे ASCI च्या सहेली सिन्हा यांनी पत्रकारांना संस्थेच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. टीव्ही, वृत्तपत्र, सोशल मीडिया, यूट्यूब, इंस्टाग्रामवरील जाहिराती या सत्य, सभ्य आणि कायदेशीर असाव्यात, जाहिरातींमध्ये खोटेपणा व फसवणूक होऊ नये यासाठी जाहिरातदार, जाहिरात एजन्सी आणि मीडियांनी एकत्र येऊन ही स्वयं-नियामक संस्था स्थापन केल्याचे त्यांनी सांगितले.

### ASCI प्रत्येक जाहिरात ४ मुख्य तत्त्वांवर तपासते

**१. सत्यता :** जाहिरात खोटी किंवा दिशाभूल करणारी नसावी. उदा. ७ दिवसात केस येतील असा दावा. **२. सभ्यता :** जाहिरातीत अश्लील, आक्षेपार्ह मजकूर नसावा. **३. सुरक्षितता :** हेल्मेट न घालता बाईक चालवणे अशा धोकादायक कृत्यांना प्रोत्साहन नसावे. **४. स्पर्धकांची बदनामी नाही :** स्वतःचे उत्पादन चांगले दाखवताना दुसऱ्याला वाईट दाखवू नये.

## एकल महिलांच्या सुरक्षेबाबत आढावा



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून आज नगरपालिकेत एकल महिलांच्या संरक्षण आणि कल्याणाबाबत माहिती घेण्यासाठी आलेल्या सर्व महिलांची नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांनी आस्थेने भेट घेतली. या सदिच्छा भेटीदरम्यान त्यांनी उपस्थित सर्व महिलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व संरक्षणाबाबतच्या विविध योजनांवर सविस्तर चर्चा केली.

सध्या सुरू असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिन' योजनेचा व महिला सुरक्षेचा आढावा घेत नगराध्यक्ष खुरसडे यांनी उपस्थित सर्व महिलांना आश्वस्त केले की, 'नगरपालिका आणि प्रशासन एकल व गरजू महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. महिलांचे रक्षण आणि सन्मान हीच आमची पहिली प्राथमिकता आहे.'

रक्षाबंधनाच्या या पावन पर्वावर नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांनी सर्व लाडक्या बहिणींना शुभेच्छा देत भावना व्यक्त केल्या. 'रक्षाबंधन हा केवळ धागा बांधण्याचा सण नसून, बहिणीच्या सुरक्षेचे आणि विश्वासाचे वचन देण्याचा दिवस आहे. एक भाऊ म्हणून माझ्या सर्व बहिणींच्या पाठीशी मी नेहमी खंबीरपणे उभा राहीन. राखी पौर्णिमेनिमित्त माझ्या सर्व लाडक्या बहिणींना हार्दिक शुभेच्छा!'

## इटलीत आर्किटेक्चर एमएसमध्ये साक्षी बिडकरची गुणवत्ता यादीत बाजी; शिक्षक आमदार किरण सरनाईक यांच्या हस्ते सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

इटली देशात आर्किटेक्चर विषयातील एमएस अभ्यासक्रमात गुणवत्ता यादीत स्थान पटकावून अकोल्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढविणाऱ्या साक्षी शत्रुघ्न बिडकर हिचे अकोल्यात प्रथम आगमनानिमित्त जल्लोषात स्वागत करण्यात आले. शिक्षक आमदार किरण सरनाईक यांच्या हस्ते साक्षीचा सत्कार करण्यात आला.



अखिल महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांची कन्या साक्षी बिडकर हिने इटली येथे आर्किटेक्चर विषयातील एमएस अभ्यासक्रमात उल्लेखनीय यश मिळविले. गुणवत्ता यादीत स्थान मिळवित तिने आपल्या कुटुंबासह अकोला जिल्ह्याचेही नाव उज्ज्वल केले आहे. साक्षी अकोल्यात दाखल होताच तिच्या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव झाला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षक आमदार किरण सरनाईक यांच्या हस्ते तिचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. परदेशात शिक्षण घेत असताना मिळविलेल्या या यशाबद्दल विविध शिक्षक संघटना आणि मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी साक्षीचे कौतुक केले. यावेळी विदर्भ मुख्याध्यापक संघाचे सचिव दिनेश तायडे, विदर्भ मार्गदर्शक बळीराम झांबरे, शारीरिक शिक्षण संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र काळे, सचिव राजेंद्र जलम, जिल्हाध्यक्ष विलास कुमकर, सचिव दिनकर गायकवाड, कार्याध्यक्ष विजय ठोकळ, महानगराध्यक्ष माधव मुंशी, दीपक बिडकर, शहराध्यक्ष माधव मुळशी, जिल्हा उपाध्यक्ष आनंद साधू, सोनवणे, बाळकृष्ण गावंडे, राजेश पातोडे, नितीन नानोटे, संघटक निरंजन बंद, सहसचिव कल्पना धोत्रे, विदर्भ संघटक नीलिमा वैराळे, महिला प्रतिनिधी कुसुम हरणे, जिल्हा महिला अध्यक्ष रसिका वाजगे, माजी उपशिक्षणाधिकारी प्रकाश अंधारे, डॉ. पेटकर, यादव वाघमारे, माजी सचिव प्रेमकुमार सानप यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. शिक्षक, मुख्याध्यापक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सत्कार सोहळ्यामुळे साक्षीच्या यशाचे विशेष कौतुक झाले.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील शिक्षणात गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या साक्षीचे यश अकोल्यातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे.

## क्षयरोग, एड्स तपासणी शिबीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. २७ ऑगस्ट प्राथमिक आरोग्य केंद्र किन्हीराजा येथे संशयित क्षयरुग्नाचे तपासणी शिबिर घेण्यात आले.यामध्ये डिजिटल एक्स रे मशीनद्वारे संशयित क्षय रुग्णांचे एक्स रे काढण्यात आले. वैद्यकिय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर उखळे यांचे मार्गदर्शनाखाली क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ५७ संशयीतांचे एक्स रे काढले. यावेळी उपस्थित प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, फार्मसी ऑफिसर,सर्व आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक, वाहनचालक,आशा कार्यकर्ती, परिचर उपस्थित होते.यावेळी ४५ संशयीतांचे स्पुटम गोळा करण्यात आले.लिंक वर्कर प्रशांत सूर्य, बंडू सुर्वे यांनी ४० व्यक्तींची एच आय व्हि तपासणी केली.तसेच आरोग्य उपकेंद्र डव्हा अंतर्गत मौजे कुरळा येथे हॅन्ड हेल्ड एक्स रे मशीनद्वारे टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी ७२ संशयीताचे एक्स रे काढले यावेळी उपस्थित समुदाय आरोग्य अधिकारी डॉ वृषाली राणे व नरेंद्र अटक, ज्योती गवई, मनीष जाधव, आकाश केंद्रे, गणेश राऊत आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या.

## कारंज्यात ईद-ए-मिलादुन्नबीचा जल्लोष; 'मरहबा'च्या जयघोषात निघाला भव्य जुलूस

### हजारो मुस्लिम बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग



■ प्रतिनिधी | कारंजा ■

पैगंबर हजरत मोहम्मद मुस्तफा स.अ. यांच्या जन्मदिनानिमित्त १२ रबीउल अव्वल अर्थात २६ ऑगस्ट रोजी कारंजा शहरात ईद-ए-मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातून भव्य जुलूस-ए-मोहम्मदी काढण्यात आला. 'मरहबा या मुस्तफा'च्या जयघोषाने आणि धार्मिक वातावरणाने शहर दुमदुमून गेले. या मिरवणुकीत हजारो मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जामा मस्जिद येथून जुलूस-ए-मोहम्मदीला सुरुवात झाली. आकर्षक विद्युत रोषणाई केलेल्या गाड्या, हिरव्या पताका, शुभेच्छांचे फलक आणि धार्मिक संदेशांनी सजलेल्या वाहनांनी मिरवणुकीचे विशेष आकर्षण वाढविले. बालकांपासून युवक आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. मदरशातील विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले, तर पगडी व सदरा परिधान केलेल्या मुस्लिम बांधवांनी शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभाग घेतला. जुलूसने सराफा लाईन, मेन रोड, दिल्ली वेश, इंदिरा गांधी चौक, नेहरू चौक, स्टोअर लाईन, टिळक चौक, अमर चौक, दरोगा मस्जिद चौक, भाजी बाजार, जिजामाता चौक, अस्ताना, पोलीस स्टेशन, नगर परिषद, जे.सी. हायस्कूल, चव्हरे लाईन, जे.डी. हायस्कूल, बीबी साहबपुरा, काजीपुरा, महात्मा फुले चौक, जुना शासकीय रुग्णालय, नगिना मस्जिद व सराफा बाजार असा मार्गक्रमण करीत पुन्हा जामा मस्जिद गाठली.

## राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत अधिकाधिक गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे आहे.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला



अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshostav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत दि. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात.

## पित्याला यकृतदान करून निकिता ठरली वाशिमची अवयवदानाची प्रेरणादूत

### महाराष्ट्र दिनी वडिलांना दिली 'संजीवनी'; अवयवदान जनजागृतीसाठी सन्मानाची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील २८ वर्षीय निकिता संजीव नांदगावकर हिने आपल्या वडिलांचे प्राण वाचविण्यासाठी स्वतःच्या यकृताचा अंशदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या दिवशी पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात तिच्या यकृताचा अंश वडील संजीव नांदगावकर यांच्या यकृत प्रत्यारोपणासाठी देण्यात आला. निकिताच्या या धाडसी निर्णयामुळे ती वाशिम जिल्ह्यातील अवयवदानाची प्रेरणादूत ठरली आहे. जिल्हा परिषदेत औषध



निर्माण अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले ६३ वर्षीय संजीव नांदगावकर यांना काही काळापासून पोटाचा त्रास जाणवत होता. विविध ठिकाणी उपचार घेतल्यानंतर पुण्यातील तपासणीत त्यांना जुनाट हिपॅटायटिस-बीचा संसर्ग असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे यकृत निकामी होत असल्याने डॉक्टरांनी यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला.

वडिलांना यकृताची गरज असल्याचे समजताच निकिताने स्वतःचे यकृत अंशदान करण्याचा निर्णय घेतला. आवश्यक सर्व वैद्यकीय तपासण्या पूर्ण करून तिने वडिलांसाठी यकृतदान केले. दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली.

शस्त्रक्रियेनंतर निकिता सुमारे पंधरा दिवस रुग्णालयात होती, तर संजीव नांदगावकर महिनाभर उपचाराखाली होते.

## माता पालक शिक्षक संघाची कार्यकारणी गठीत



■ प्रतिनिधी | रिसोड ■

भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे माता पालक शिक्षक संघाची कार्यकारणी गठीत करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या मंजूषा सु.देशमुख , व प्रमुख अतिथी पर्यवेक्षक सुनील डहाळके यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारणी गठित करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक सुनील डाहळके यांनी केले . माता पालक कार्यकारणी गठीत करण्याचा उद्देश आपल्या प्रास्ताविकेतून स्पष्ट केला. प्रथमतः सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्वानुमते पदसिद्ध अध्यक्षा मंजुषा देशमुख यांची निवड करण्यात आली. त्यानंतर कार्यकर्णी गठित करण्यात आली. शिक्षकांमधून सचिन महाजन सर यांची उपाध्यक्ष तर पालकांमधून उपाध्यक्षा रवीना सचिन बाजड तर. माता पालकांमधून सहसचिव गोदावरी गजानन बाजड . तर शिक्षकांमधून सचिव प्रा.विजया कौटकर यांची निवड करण्यात आली. सचिन पायघन यांच्यासह इतर सर्व मान्यवरांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, शिस्त, परीक्षा आणि शाळेच्या पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

## रानफुलांच्या पाकळ्या, कडधान्यं अनब टाकाऊ वस्तूंपासून पर्यावरणपूरक राख्या

### वाशीमच्या चेतन सेवांकूरमधील अंध कलाकारांचा अनोखा स्वावलंबनाचा उपक्रम; स्थानिक ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रक्षाबंधनाचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असताना बाजारपेठेत विविध प्रकारच्या राख्या दाखल झाल्या आहेत. मात्र, वाशीमच्या केकत उमरा येथील चेतन सेवांकूर आश्रमातील अंध कलाकारांनी आपल्या कल्पकतेतून साकारलेल्या पर्यावरणपूरक राख्या यंदा विशेष आकर्षण ठरत आहेत. रानफुलांच्या पाकळ्या, कडधान्ये आणि टाकाऊ वस्तूंचा कल्पक वापर करून या राख्या तयार करण्यात आल्या आहेत.



श्रावणात बहरणाऱ्या रानझेंडू, तेरडा, कास, चाफा आणि शेवंती यांसारख्या विविध फुलांच्या पाकळ्यांचा वापर करून राख्यांना नैसर्गिक आणि आकर्षक रूप देण्यात आले आहे. यासोबतच कागद, धागे तसेच विविध टाकाऊ वस्तूंपासून फॅन्सी आणि कलाकुसरीच्या राख्याही तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या राख्या आकर्षक असण्यासोबतच पर्यावरणपूरकही ठरत आहेत. केकत उमरा येथील चेतन सेवांकूर आश्रमात डझनभर अंध मुलांचे वास्तव्य आहे. येथील अंध कलाकार विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये गीतगायन करून उदरनिर्वाह करतात. मात्र, पावसाळ्यात संगीताचे कार्यक्रम कमी होत असल्याने त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. ही बाब लक्षात घेऊन यंदा स्थानिक महिला बचत गटाच्या सहकार्याने अंध कलाकारांनी राखी निर्मितीचा उपक्रम हाती घेतला.

आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देत या अंध कलाकारांनी एकापेक्षा एक सुंदर राख्या तयार केल्या आहेत. विशेष म्हणजे या राख्यांच्या विक्रीसाठी चेतन सेवांकूरच्या प्रांगणात विशेष स्टॉल उभारण्यात आला आहे. स्थानिक महिला आणि नागरिकांकडून या राख्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ग्राहकांकडून राख्यांची खरेदीही केली जात आहे.

या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासोबतच अंध कलाकारांना त्यांच्या कलागुणांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळाली आहे. दिव्यांग व्यक्तींमध्येही कला, कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वावलंबी होण्याची क्षमता आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित होत आहे.

चेतन सेवांकूरचे कार्यवाहक पांडुरंग उचितकर, चेतन उचितकर, धिरज चोरपगार, कोमल खांडेकर, अश्विनी पवार तसेच अन्य अंध कलाकारांनी या उपक्रमात सहभाग घेतला. स्थानिक बचत गटातील माधुरी नेतन्सकर यांच्यासह अन्य महिलांनीही उपक्रमाला सहकार्य करत राख्यांची खरेदी केली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७१ ■ शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## खबरदार... वृद्धेचे घर पाडाल तर... खासदार आले आडवे

# घरकुल द्यायचे की घर पाडायचे, थारमध्ये खासदारांचा प्रशासनाला दणका

### -आधी शासकीय आदेश दाखवा म्हणत प्रशासनाला धरले धारेवर

**आष्टी-शहीद जनमाध्यम :** थार येथील अनुसया घोरपडे यांच्या घरावरील कथित अतिक्रमण हटविण्याची कारवाई अखेर गुरुवारी, २७ ऑगस्ट रोजी तूर्तास थांबविण्यात आली. कारवाईसाठी प्रशासनाचा फौजफाटा आणि पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात असतानाच खासदार अमर काळे यांनी घटनास्थळी धाव घेत प्रशासनाला थेट जाब विचारला. 'कारवाईचा शासकीय आदेश दाखवा' असा सवाल करीत त्यांनी गटविकास अधिकारी पोकळे यांना धारेवर धरले. खासदारांच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.

विशेष म्हणजे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुल मिळावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगण्यात येते. अतिक्रमित जागेवर वास्तव्यास असलेल्या पात्र व्यक्तीलाही केवळ अतिक्रमणाच्या कारणावरून घरकुलापासून वंचित ठेवू नये, तसेच घरकुलासाठी अर्ज केलेल्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल द्यावे, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडल्याचे सांगितले जाते. मात्र, दुसरीकडे मुख्यमंत्र्यांचे माजी वैयक्तिक सहाय्यक राहिलेले आमदार सुमित वानखेडे यांच्या आदेशानंतर वृद्ध महिलेच्या घरावर अतिक्रमण कारवाईची प्रक्रिया सुरू झाल्याने या प्रकरणाला वेगळेच वळण मिळाले आहे.



गुरुवारी अनुसया घोरपडे यांच्या घरावर कारवाई करण्यासाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा पोहोचला होता. वृद्ध महिलेच्या निवाऱ्यावर कारवाई होणार असल्याची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. दरम्यान, या कारवाईची माहिती खासदार अमर काळे यांना मिळताच त्यांनी तातडीने थार गाठले आणि कारवाई थांबविण्यास सांगितले.

खासदार काळे यांनी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईमागील नेमका आदेश कोणता, तो कोणी काढला आणि कोणत्या शासन निर्णयाच्या आधारे कारवाई सुरू करण्यात आली, अशी थेट विचारणा केली. संबंधित आदेशाची प्रत दाखविण्याची मागणी त्यांनी केली. रहिवासी घरावर कारवाई करताना प्रशासनाने कायदेशीर प्रक्रिया आणि शासनाचे नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. विशेषतः पावसाळ्यात रहिवासी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईबाबत कोणते नियम आहेत, याचा स्पष्ट खुलासा प्रशासनाने करावा, अशी भूमिका खासदार काळे यांनी मांडली. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खासदारांच्या हस्तक्षेपानंतर अनुसया घोरपडे यांच्या घरावरील कारवाई तूर्तास थांबविण्यात आली. त्यामुळे घोरपडे कुटुंबाला दिलासा मिळाला आहे. मात्र, कारवाईचा आदेश नेमका कोणी दिला, संबंधित कुटुंबाला पूर्वसूचना देण्यात आली होती का, अतिक्रमण निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली होती का, यासह अनेक प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. यावेळी उपसरपंच संदीप परतेती, ग्रामपंचायत सदस्य देविदास कोडापे, अनुसया घोरपडे यांच्यासह विस्तार अधिकारी प्रदीप चव्हाण, कालोकर, राठोड, ग्रामपंचायत अधिकारी प्रीतम लोहे आणि साहूर येथील पत्रकार कृष्णा हरले उपस्थित होते. सरपंच संगीता कदम मात्र उपस्थित नव्हत्या. कारवाईच्या पार्श्वभूमीवर आष्टी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले.

### आदेश दाखवा, मगच कारवाई करा

नागरिकांच्या घरावर अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाई करताना प्रशासनाने पारदर्शकता आणि कायदेशीर प्रक्रिया पाळणे गरजेचे आहे. कागदोपत्री आदेश, पूर्वसूचना आणि नियमांची पूर्तता न करता कारवाई केली जात असेल तर त्याचा जाब विचारला जाईल, असा स्पष्ट संदेश खासदार अमर काळे यांच्या हस्तक्षेपातून प्रशासनाला मिळाला आहे. त्यामुळे या कारवाईमागील आदेश आणि कागदपत्रांची सत्यता काय, याकडे आता थारवासीयांचे लक्ष लागले आहे.

## ग्रामीण रस्ते, तीर्थ व यात्रास्थळांची कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करा - पालकमंत्री

### विविध विकास कामे व ग्रामीण रस्त्यांचा आढावा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा नियोजन समिती मधून मंजूर विविध ग्रामीण रस्ते, तीर्थक्षेत्र, यात्रास्थळांची कामे विहित कालावधीत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करावी. यासाठी बांधकाम विभागाच्या संबंधित अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करावी, अशा सुचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सन २०२४-२५, २०२५-२६ मधील विविध विकास कामे, ग्रामीण रस्ते, तीर्थक्षेत्र व यात्रास्थळाच्या विकास कामांच्या आढावा बैठकीत केल्यात.

जिल्हाधिकारी कार्यालयात इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण, ग्रामीण रस्ते विकास व मजबुतकीरण आणि क वर्ग तीर्थक्षेत्र व यात्रास्थळ विकास कार्यक्रमाचा आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. त्यावेळी त्यांनी या सुचना केल्या. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, सुनील गफाट, बांधकाम विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता आदी उपस्थित होते. विविध बांधकामे हाती घेतांना लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेल्या कामांना प्राधान्य देऊन अशा कामांचा प्राधान्याने समावेश करण्यात यावा. बांधकामे सुरु असतांना अधिका-यांनी कामांची पाहणी करुन गुणवत्ता चांगली असल्याची खात्री करावी. शाळा, अंगणवाडीच्या कामांमध्ये प्रथम वाटर रुफींग व कलरींगच्या कामाला प्राधान्य द्यावे, अशा सुचनाही यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या. सन २०२५-२६ मध्ये इतर जिल्हा मार्ग रस्ते विकास व मजबुतीकरणाची ५८ कामे हाती घेण्यात आली असून ३० कामे पूर्ण झाली आहे. तर ९ कामे प्रगतीपथावर असून १७ कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. दोन कामांचा करारनामा करण्यात आला आहे. ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत ११९ कामे हाती घेण्यात आली असून ३१ कामे पूर्ण झालेली आहे. यापैकी ४९ कामे प्रगतीपथावर असून २९ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला. तर ९ कामांचा करारनामा करण्यात आला असून १ काम निविदा स्तरावर आहे. जिल्ह्यात आतापर्यंत क वर्ग तीर्थक्षेत्र, यात्रास्थळ विकास कार्यक्रमांतर्गत ३७ कामे हाती घेण्यात आली असून २ कामे पूर्ण झालेली आहे. यातील १२ कामे प्रगतीत असून ११ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहेत तर ११ कामांचा करार करण्यात आला आहे. एक काम निविदा स्तरावर असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.



## नेपाळमध्ये अडकलेल्या जिल्ह्यातील नागरिक-पर्यटकांची माहिती प्रशासनाला देण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** नेपाळमधील रासुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पुरामुळे अनेक नागरिक व पर्यटक अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अडकलेल्या नागरिक व पर्यटकांची माहिती प्रशासनाला देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

जिल्ह्यातील कोणताही नागरिक अथवा पर्यटक नेपाळमध्ये अडकला असल्यास संबंधित व्यक्तीने किंवा त्यांच्या नातेवाईकांनी संबंधित व्यक्तीचे अचूक नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण तसेच प्रवासासंबंधी उपलब्ध माहिती प्रशासनाकडे तातडीने नोंदवावी. माहिती नोंदविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या https://geospatial.mahaseoc.in/Sahayata_gulf या लिंकवर माहिती भरताना संबंधित व्यक्तीचे अचूक नाव, संपर्क क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण आणि प्रवासाची माहिती नमूद करावी.

नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित यंत्रणांशी आवश्यक समन्वय साधण्यात येत असून, नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे संपर्क साधता येईल. संपर्क क्रमांक ०७१५२-२४३४४६, २९९०१०, ९१७५१२१०७७ आहेत. तसेच पोलीस नियंत्रण कक्ष, वर्धा येथे ०७१५२-२३२५२०, ८८८८३३८३५४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## बोरी बा-हा शिवारात वाघाची दहशत; ट्रॅप कॅमेऱ्यांनी ठेवणार नजर

### सहा गावांना वनविभागाचा सतर्कतेचा इशारा

**विरुळ (आकाजी) जनमाध्यम :** बोरी बा-हा शिवारात पट्टेदार वाघाचा मुक्तसंचार सुरू असून, मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभागाने परिसरातील सहा गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. बुधवारी मनोहर मानकर यांच्या मालकीची जनावरे गुराखी नाना लोखंडे चराईसाठी घेऊन गेले असता वाघाने एका कालवडीवर हल्ला केला. सुदैवाने गुराखी बचावला.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली. यावेळी परिसरात वाघाचे पगमार्क आढळून आले. आर्वीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश गवारले, क्षेत्रसहायक एस. पी. डेहनकर यांच्यासह पवार, काळे, खवसे, लांडगे, नरांजे व माने यांनी पाहणी करून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विविध ठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावले. बोरी बा-हा, रसुलाबादसह परिसरातील सहा गावांतील नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी शेतात एकटे जाऊ नये, लहान मुलांना शेतात सोबत नेऊ नये. दुपारी दोननंतर तसेच सायंकाळच्या वेळी जंगल परिसरात जाणे टाळावे, असे आवाहन वनविभागाने केले आहे. वाघाच्या प्रत्येक हालचालीवर वनविभागाचे पथक लक्ष ठेवून आहे.

## वर्ध्याच्या क्रीडा संकुलात रंगणार टेबल टेनिसचा महासंग्राम

### २ ते ६ सप्टेंबर रंगणार चुरशीचे सामने, ७०० खेळाडूंची नोंदणी

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील टेबल टेनिसपटूंच्या कौशल्याचा थरार आता प्रथमच वर्धेकरांना अनुभवता येणार आहे. चौथी महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धा २ ते ६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत वर्धेतील स्थानिक क्रीडा संकुलाच्या बॅडमिंटन हॉलमध्ये रंगणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धेचे यजमानपद प्रथमच वर्धेला मिळाल्याने क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून सुमारे एक हजाराहून अधिक खेळाडू सहभागी होण्याची शक्यता असून आतापर्यंत सुमारे ७०० खेळाडूंनी नोंदणी केली आहे. वर्धा जिल्ह्यातील जवळपास ५० खेळाडूंनीही स्पर्धेसाठी नोंदणी केली आहे. जिल्ह्यातील खेळाडूंना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा अनुभव मिळावा, तसेच वर्ध्यातील क्रीडा क्षेत्राला चालना मिळावी, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे स्पर्धेला सहकार्य लाभत आहे. वर्धेत राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यापूर्वी तज्ज्ञांनी क्रीडा संकुलाची पाहणी करून खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध होऊ शकतील का, याची पडताळणी केली. त्यानंतर स्पर्धेच्या आयोजनाला हिरवी झेंडी मिळाली. स्पर्धेच्या उद्घाटनासाठी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्र्यांना निमंत्रण देण्यात आले असून त्यांच्या उपस्थितीबाबतचा अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे. मात्र, ते उद्घाटनाला उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजक अटल पांडे यांनी व्यक्त केला.

पत्रपरिषदेला डॉ. प्रवीण धाकटे, ओम तिवारी, अश्विन रामटेके, मोहनकुमार शहा, ओम गोडे, आदिती भोयर आणि मनिष रामटेके उपस्थित होते.

## शनिवारी जिल्हास्तरीय गुंतवणुक परिषदेचे आयोजन

### उद्योग मंत्र्यांसह पालकमंत्री उपस्थित राहणार

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासोबतच गुंतवणूकदार व व्यवसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी दि.२९ ऑगस्ट रोजी उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, लोकप्रतिनिधी तसेच जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला जिल्ह्यातील सर्व ओद्योगिक संघटना, नामांकित उद्योजक, औद्योगिक समूह, सनदी लेखापाल तसेच उद्योग व व्यवसायाशी संबंधित विविध शासकीय विभागांचे प्रतिनिधींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दिनांक २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता आशिर्वाद सेलिब्रेशन, साटोडा चौक, नागपूर तुळजापूर हायवे, वर्धा येथे आयोजित गुंतवणुक परिषदेचा उद्देश जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार व व्यवसायांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच जिल्ह्यांना विकासाचे केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या व राज्याच्या विकासाला चालना देणे हा आहे. या परिषदेमध्ये जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्रांबाबत चर्चासत्र, गुंतवणुकीच्या संधी, क्षमता असलेल्या विविध क्षेत्रांमधील गुंतवणूक व व्यवसायाच्या संधी याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्याचा कार्यक्रम, उद्योजकांचे अनुभव कथन आदी उपक्रमांचा समावेश राहणार आहे.

परिषदेच्या अनुषंगाने प्रातिनिधिक स्वरूपात जिल्ह्यातील उत्पादनांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये निर्यातक्षम उत्पादने, भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादने, एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत उत्पादने तसेच विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचा समावेश राहणार आहे.



जिल्ह्यातील सर्व ओद्योगिक संघटना, नामांकित उद्योजक, औद्योगिक समूह, सनदी लेखापाल तसेच उद्योग व व्यवसायाशी संबंधित विविध शासकीय विभागांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत. जिल्ह्यातील होतकरू व इच्छुक उद्योजक, औद्योगिक संघटना, ओद्योगिक समूहातील उद्योग घटक तसेच उद्योग-व्यवसायाशी संबंधित संस्थांनी जिल्ह्यात उद्योग क्षेत्रात गुंतवणूक करताना येणाऱ्या अडचणी, उपलब्ध संधी व संभाव्य गुंतवणूक याबाबत माहिती व चर्चेसाठी जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल हजारे यांनी केले आहे.

## आरक्षणाच्या व्हिडिओने पेटवला वाद;

# कराळेंना अखेर कारागृहाची वाट

### विशिष्ट समाजाविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा आरोप; अमरावतीतून एलसीबीने घेतले ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** सोशल मीडियावर एका विशिष्ट समाजाविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य असलेला व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते नितेश बालकृष्ण कराळे यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कराळे यांना अमरावती येथून ताब्यात घेत अटक केली. गुरुवारी त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलिस कोठडीऐवजी न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली.

नितेश कराळे हे आपल्या खास शैलीतील व्हिडिओंसाठी सोशल मीडियावर परिचित आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावर ३१ जुलै रोजी त्यांनी तयार केलेला एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये एका विशिष्ट समाजाविषयी कथित आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्याची तक्रार शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली. या तक्रारीवरून १९ ऑगस्ट रोजी कराळे यांच्याविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, त्यानंतर कराळे यांनी प्रसारित केलेल्या आणखी एका व्हिडिओमध्ये देशाच्या न्यायव्यवस्थेबाबत कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचे समोर आले. या प्रकरणातही त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही प्रकरणे दाखल झाल्यानंतर कराळे पोलिसांच्या हाती लागत नव्हते.

### अमरावतीतून मध्यरात्री ताब्यात

कराळे यांच्या शोधासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. स्थानिक गुन्हे शाखेची तीन पथके त्यांच्या शोधासाठी वेगवेगळ्या दिशेने रवाना करण्यात आली होती.

अखेर गुरुवारी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजता एलसीबीच्या पथकाने अमरावती येथील तपोवन परिसरातून कराळे यांना ताब्यात घेतले.

पोलिसांचे पथक कराळे यांना घेऊन पहाटे सुमारे ३.३० वाजता वर्ध्यात पोहोचले. त्यानंतर त्यांना शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

### पोलिस कोठडीची मागणी फेटाळली

कराळे यांची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर गुरुवारी सायंकाळी त्यांना वर्धा न्यायालयात हजर करण्यात आले. तपासासाठी पोलिसांनी त्यांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती.

मात्र, न्यायालयाने ही मागणी मान्य न करता कराळे यांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचे आदेश दिले. न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली.

## अतिक्रमण, कथित भ्रष्टाचार अन् स्मशानभूमी; पिपरी-कारला ग्रामसभा ठरली वादळी

### तिरडी थेट ग्रामपंचायत कार्यालयासमोर ग्रामस्थ आक्रमक

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरालगतची राजकीयदृष्ट्या महत्त्वाची पिपरी-कारला ग्रामपंचायतीची ग्रामसभा गुरुवारी विविध गंभीर प्रश्नांवरून चांगलीच वादळी ठरली. अतिक्रमण, कथित भ्रष्टाचार, विकासकामांतील अनियमितता, स्मशानभूमीची दुरवस्था आणि रखडलेल्या सुविधांवरून ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाला थेट जाब विचारला. काही मुद्द्यांवर ग्रामस्थ आणि प्रशासनामध्ये सकारात्मक चर्चा झाली असली, तरी अनेक प्रश्नांवर संतप्त वातावरण पाहायला मिळाले.

कोरम पूर्ण न झाल्याने यापूर्वी रद्द झालेली ग्रामसभा गुरुवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास घेण्यात आली. सरपंच वैशाली अजय गौळकार, उपसरपंच गजानन वानखेडे, वर्धा पंचायत समितीचे ग्रामविस्तार अधिकारी देवतळे यांच्या उपस्थितीत ग्रामसभा सुरू झाली. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामसभेत प्रभाग क्रमांक २ मधील स्मशानभूमीचा प्रश्न ऐरणीवर आला. अंत्यसंस्कारासाठी वापरण्यात येणारी प्रतीकात्मक तिरडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवून ग्रामस्थांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. स्मशानभूमीत मूलभूत सुविधांचा अभाव असून तेथे जाणारा मार्गही खराब असल्याने अंत्यसंस्काराच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ३ मध्ये उभारण्यात आलेली नवीन स्मशानभूमी अद्याप सुरू का करण्यात आली नाही, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. ही स्मशानभूमी तातडीने नागरिकांच्या वापरासाठी खुली करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली.

**वॉटर एटीएम बंद; अतिक्रमणाचा मुद्दाही तापला-** ग्रामपंचायत हद्दीत बसविण्यात आलेले वॉटर एटीएम अद्याप सुरू नसल्याने त्यावरही ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरले. काही भागांत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून त्या ठिकाणी कथितरीत्या अवैध व्यवसाय सुरू असल्याचा आरोप ग्रामसभेत करण्यात आला. या अतिक्रमणांवर प्रशासन काय कारवाई करणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

**पिपरी-कारला नावाचा आग्रह-** पिपरी-मेघे ग्रामपंचायतीच्या हद्दीत कारला गट ग्रामपंचायतीचा परिसरही समाविष्ट असल्याने भविष्यात ग्रामपंचायतीचा उल्लेख 'पिपरी-कारला ग्रामपंचायत' असा करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. याशिवाय रस्ते, विकासकामे आणि त्यातील कथित अनियमिततेबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित करत संबंधित कामांची माहिती व उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी केली. त्यामुळे पिपरी-कारला ग्रामसभा प्रशासनासाठी चांगलीच डोकेदुखी ठरली.


### जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अशोक मारोतराव करमनकर यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा देवळी, प.ह.कं. २१, ता. देवळी जि. वर्धा

नगर परिषद देवळी च्या हद्दितील शेत सर्वे कं. ३१३/३ मधील प्लॉट कं. ५ ज्याची एकूण आराजी १२८५.८२ चौ. फुट म्हणजेच ११९.५० चौ. मी. (विकिपत्राप्रमाणे) आराजी २५७१.६४ चौ. फुट म्हणजेच २३९.०० चौ. मी. (सातबाराप्रमाणे) असुन त्याची

चतुःर्सिमा :-

पुर्वेसः प्लॉट कं. ४, पश्चिमेसः प्लॉट कं. ६, उत्तरेसः ६ मिटर रूंदीचा रोड दक्षिणेसः याच प्लॉट चा उरलेला भाग वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १६,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्त्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नेपाळमध्ये अडकलेल्या प्रवाशांचा परतीचा प्रवास सुरू

## मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने काठमांडू-जनकपूर प्रवासासाठी चार मिनी बसची व्यवस्था



**मुंबई/प्रतिनिधी :**नेपाळमधील काठमांडू येथे अडकलेल्या नागपूरसह महाराष्ट्रातील १०६ प्रवाशांचा सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे काठमांडूहून जनकपूरपर्यंत प्रवासासाठी चार मिनी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रवाशांना २८ ऑगस्ट रोजी बिहारमधील दानापूर येथून संघमित्रा एक्सप्रेसने महाराष्ट्रात परतायचे नियोजित होते. मात्र, नेपाळमधील सद्यस्थितीमुळे काठमांडूहून मोठ्या बसने पुढील प्रवास करणे शक्य नसल्याने दानापूरपर्यंत वेळेत पोहोचण्याची अडचण निर्माण झाली होती.

प्रवाशांची ही अडचण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास येताच त्यांनी प्रवासी योगेश गावंडे यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी केंद्रीय परराष्ट्र मंत्रालय, नेपाळमधील स्थानिक प्रशासन आणि नेपाळचे खासदार संदीप राणा यांच्याशी समन्वय साधला. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारानंतर खासदार संदीप राणा यांनी काठमांडूहून जनकपूरपर्यंत चार मिनी बसची व्यवस्था केली. त्यानुसार सर्व १०६ प्रवासी काठमांडूहून जनकपूरच्या दिशेने रवाना झाले आहेत. प्रवासी उद्या सकाळी जनकपूरमार्गे भारत-नेपाळ सीमेवर पोहोचणार असून, तेथून त्यांना बिहारमधील दानापूरपर्यंत नेण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. दानापूर येथून रेल्वेने महाराष्ट्रात परतण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, सर्व प्रवासी सुरक्षितपणे महाराष्ट्रात परत येईपर्यंत मुख्यमंत्री फडणवीस त्यांच्या संपर्कात राहून आवश्यक समन्वय साधत आहेत. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या तातडीच्या मदतीबद्दल योगेश गावंडे आणि



सहप्रवाशांनी कृतज्ञता व्यक्त केली असून मुख्यमंत्र्यांनी स्वतः संपर्क साधून अडचण जाणून घेतली आणि तातडीने प्रवासाची व्यवस्था केल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

### महाराष्ट्रातील नागरिकांची माहिती संकलनासाठी ऑनलाइन फॉर्म

नेपाळमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील व शहरी भागातील पर्यटक आणि नागरिक नेपाळमध्ये अडकले असण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अडकलेल्या नागरिकांचा अचूक तपशील तात्काळ ऑनलाइन फार्मच्या माध्यमातून उपलब्ध करून घेण्याच्या सूचना राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व जिल्हाधिका-यांना दिल्या आहेत.महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत (एसडीएमए) अडकलेल्या नागरिकांची माहिती संकलित करण्यासाठी एक https://geospatial.mahaseoc.in/Sahayata_gulf विशेष ऑनलाइन फॉर्म तयार करण्यात आला आहे. आपल्या जिल्ह्यातील तसेच त्या जिल्ह्यातील अडकलेल्या नागरिकांची माहिती संबंधित लिंकवरून तात्काळ भरून डेटाबेसमध्ये अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# नागपूर जिल्ह्यातील नागरिक सुरक्षित

■ नागरिकांच्या परतीच्या प्रवासासाठी नियोजन ■ नागरिक नेपाळ-भारत सीमेच्या दिशेने रवाना

**नागपूर/प्रतिनिधी :**नागपूर जिल्ह्यातील श्री स्वामी महाराज यांच्या समूहासोबत नेपाळमध्ये गेलेले ११० नागरिक सुरक्षित असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे. २२ ऑगस्ट २०२६ रोजी नेपाळमधील काठमांडू येथे पर्यटन/धार्मिक भेटीच्या अनुषंगाने गेलेल्या नागरिकांमध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे.

नेपाळमध्ये २६ ऑगस्ट २०२६ रोजीच्या महापूराच्या घटनेचा या समूहातील नागरिकांवर कोणताही परिणाम झाला नसल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिले आहे.

नागरिकांशी सातत्याने संपर्क असून त्यांच्या सद्यस्थितीबाबत नियमितपणे माहिती घेतली जात आहे.नागपूर जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सद्यस्थितीत हे सर्व नागरिक काठमांडू येथील माहेश्वरी समाज येथे सुरक्षितपणे वास्तव्यास असून, नेपाळ प्रशासनाकडून देखील त्यांना आवश्यक ती मदत व सहकार्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या नागरिकांच्या परतीच्या प्रवासासाठी नियोजित बसऐवजी नेपाळ प्रशासनाच्या सहकार्याने पर्यायी बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार हे नागरिक २७ ऑगस्ट २०२६ रोजी काठमांडू येथून जनकपूर, नेपाळ-भारत सीमेच्या दिशेने रवाना झाले असून, २८ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटेपर्यंत जनकपूर येथे पोहोचण्याचे नियोजन आहे. त्यानंतर जनकपूर येथून भारतात प्रवेश करून पुढे पटना येथे पोहोचण्याचे नियोजन आहे.पटना येथून दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी दानापूर रेल्वे स्थानकावरून नागपूरकडे येण्यासाठी त्यांची रेल्वेगाडी नियोजित आहे. त्यानुसार या सर्व नागरिकांना सुरक्षितपणे नागपूर येथे परत आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे.नागरिकांच्या नागपूर येथील नातेवाईकांशीही जिल्हा प्रशासनाचा संपर्क असून, त्यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार समूहातील सर्व नागरिक सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी संपर्क क्र. ७७७५९३८५९१ व अंकुश लुडेकर, रा. प्रेमनगर, इतवारी, नागपूर व आशितोष चौधरी, रा. मानेवाडा, नागपूर हे दोन नातेवाईक जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहेत.

नेपाळमधील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्ह्यातील ११० नागरिक सध्या पूर्णपणे सुरक्षित असून जिल्हा प्रशासन त्यांच्या संपर्कात आहे. त्यांच्या परतीच्या प्रवासाबाबतही जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक ते समन्वय व देखरेख ठेवण्यात येत आहे.

# सर्वांना विश्वासात घेउनच पंढरपूरचा विकास आराखडा निश्चित करणार- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**पंढरपूरच्या विकास आराखड्यात वारकरी, भाविक, स्थानिक नागरिक, व्यापारी, मठाधिपती तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचना आणि मागण्यांचा समावेश करून सर्वांना विश्वासात घेतच आराखडा अंतिम करण्यात येईल. पंढरपूरचा विकास हा पुढील ५० वर्षांचा विचार करून भाविकांच्या सोयी-सुविधांसह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने केला जात आहे, दरवर्षी पंढरपूरला येणा-या भाविकांची संख्या वाढत असल्याने संपूर्ण शहराचा एकात्मिक आणि दीर्घकालीन विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर मंदिर समितीचे उपजिल्हाधिकारी तथा व्यवस्थापक राजेंद्र शेळके, सोलापूरचे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सोलापूरचे विधी अधिकारी राजेश अंदाने, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे,पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वीर रामकृष्ण महाराज, अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, मुकुंद बडवे, वैभव बडवे, गणेश लंके, प्राजक्त बेणारे,चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमध्ये भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यातील गर्दीचे व्यवस्थापन अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. त्यासाठी पारंपरिक पद्धतींबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध डिजिटल टूल्सचा वापर करण्यात येईल. भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत दर्शन व प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी एकात्मिक नियोजनावर भर दिला जाईल.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य

## आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके

**मुंबई/प्रतिनिधी :**आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी आता नियमित शिक्षण, अध्ययन-अध्यापन आणि आपल्या उज्ज्वल भवितव्याकडे लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी माध्यमांशी संवाद साधताना केले. आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके म्हणाले, शासकीय वसतिगृहांच्या प्रवेशाच्या वयोमर्यादेपासून ते वसतिगृहांची जागा, जात वैधता प्रमाणपत्र, आरोग्य सुविधा, पेसा अंतर्गत नोकरभरती आणि भोजन व्यवस्थेपर्यंत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात ४९० शासकीय वसतिगृहे सुरू आहेत. वसतिगृह प्रवेशासाठी वयोमर्यादा निश्चित करण्याच्या उद्देशाने ५ ऑगस्टला शासन निर्णय काढून ती २६ वर्षे करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या भावना आणि सूचनांचा विचार करून १४ ऑगस्टला वयोमर्यादा ३० वर्षे करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर ५ आणि १४ ऑगस्टचा शासन निर्णय २५ ऑगस्टला रद्द करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्याचे मंत्री वुईके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके म्हणाले, पुणे येथे विद्यार्थ्यांसोबत झालेल्या प्रदीर्घ चर्चेत विविध प्रश्न मांडण्यात आले. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंशी चर्चा करून विद्यापीठ परिसरात आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह उभारण्याची ग्वाही देण्यात आली आहे. येत्या काळात पुणे विद्यापीठ परिसरात हे वसतिगृह उभारण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. जात वैधता प्रमाणपत्राबाबतही संबंधित सर्व विभागांना लेखी सूचना देण्यात आल्या असून, वैधता प्रमाणपत्राशिवाय पदवी न देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही गांभीर्याने घेण्यात आला आहे. साप किंवा विंचू चावण्याच्या घटनांसंदर्भात संबंधित परिसरातील वैद्यकीय महाविद्यालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना आवश्यक दक्षता व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगले शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. पेसाअंतर्गत नोकरभरतीसंदर्भात सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत. छोट्या संवर्गातील अनुसूचित जमातीच्या बिंदूनामावलीतील स्थानाबाबत समिती गठित करण्यात आली असून, हा प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

# गणेश मंडळांनी प्रसादाची शुद्धता जपावी

## अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राचा राज्य उत्सव असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सामध्ये मंडळामार्फत देण्यात येणा-या प्रसादासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांची माहिती करून घ्यावी. भाविकांना शुद्ध व भेसळमुक्त प्रसाद मिळण्यासाठी आवश्यक किमान निकषांचे पालन होण गरजेचे असून यासाठी मंडळांनी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करावा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सव-२०२६ निमित्त कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतील गणेशोत्सव मंडळांनी उत्सवाला दिलेले व्यापक स्वरूप कौतुकास्पद आहे. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून मांडलेला सामाजिक अभिसरण आणि प्रबोधनाचा विचार राज्यभर पुढे नेणे गरजेचे आहे. गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्सवाची परंपरा जपताना



शिस्त आणि पावित्र्य जपण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकासह प्रशासन, मंडळे आणि विविध संघटनांवर असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणून गणेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तम पद्धतीने साजरा होण्यासाठी प्रशासन, गणेशोत्सव मंडळे आणि समन्वय समित्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे. आयोजनातील त्रुटी दूर करून मंडळांच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवासाठी गेल्या अनेक वर्षांत संरचित व्यवस्था निर्माण झाली आहे. मात्र, दरवर्षी निर्माण होणा-या नव्या अडचणी ओळखून त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. गणेशोत्सव मंडळांच्या परवानग्यांचे प्रश्न प्रलंबित राहू नयेत. जुन्या मंडळांच्या बहुतांश परवानग्या नियमित स्वरूपाच्या असल्याने प्रशासनाने सक्रिय पुढाकार घेउन त्या जलदगतीने द्याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.विविध महानगरपालिका क्षेत्रांतील गणेशमूर्तींच्या आगमनाचे आणि विसर्जनाचे मार्ग सुस्थितीत ठेवावेत. या मार्गांवर खड्डे राहणार नाहीत आणि रात्री पुरेशी प्रकाशव्यवस्था उपलब्ध असेल, याची विशेष काळजी घ्यावी. बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम, १४३ नुसार ट्रस्टच्या नावावर असलेल्या कार्यालयांसाठी मालमत्ता करमाफीची तरतूद आहे.

# अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना 23 कोटींची मदत जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :**जून आणि जुलै २०२६ या कालावधीत राज्यातील विविध भागांत झालेली अतिवृष्टी, पूर परिस्थिती, चक्रीवादळ आणि गारपीटीमुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते. या बाधित शेतक-यांना तातडीने दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रुपयांचा निधी मंजूर केला असून, तो थेट शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केले की, 'शेतक-यांना मिळणारा हा मदतीचा निधी त्यांच्या कोणत्याही जुन्या कर्ज खात्यात अथवा वसुलीसाठी वळती करून घेतला जाउ नये, अशा कडक सूचना सर्व बँकांना देण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांना दिले आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे अमरावती, पुणे, नागपूर आणि कोकण विभागातील तब्बल १७,२४५ बाधित शेतक-यांना दिलासा मिळणार आहे.मदत व पुनर्वसन विभागाने २७ ऑगस्ट २०२६ रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सर्व बाधित शेतक-यांना 'डीबीटी' प्रणालीद्वारे मदत दिली जाणार आहे.विभागावार मदतीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. राज्यभरातील एकूण ११,२०७.७९ हेक्टर क्षेत्रातील पिकांच्या नुकसानीसाठी १७ हजार २४५ शेतक-यांना २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रूपयांची ही मदत मंजूर करण्यात आली आहे. अमरावती विभागात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा या जिल्ह्यातील ९६८३ बाधित शेतक-यांना (१३ कोटी ८० लाख रुपये), पुणे विभागात पुणे व सातारा या जिल्हयांचा समावेश असून ६,८८५ बाधित शेतकरी यांच्यासाठी ९ कोटी १३ लाख रूपये मंजूर,नागपूर विभागात वर्धा जिल्ह्यांचा समावेश आहे ६६१ बाधित शेतकरी यांच्यासाठी (३८ लाख ८७ हजार रुपये) कोकण विभागात सिंधुदुर्ग जिल्हयातील १६ बाधित शेतक-यांसाठी (४१ हजार रुपये) मंजूर करण्यात आले आहेत.

# औंढा नागनाथसह नागपूरच्या कल्याणेश्वर मंदिर विकास आराखड्याला शिखर समितीची मंजूरी

**मुंबई/प्रतिनिधी :**औंढा नागनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक महत्त?वाचे क्षेत्र आहे. या मंदिरावरील पुरातन शिल्पकलेचे जतन करत नैसर्गिक रंगांचा वापर करुन त्याचे संवर्धन करण्यात यावे. तलाव आणि मंदिर परिसरात वापरले जाणारे दगड आणि इतर साहित्य त्याचप्रमाणे एकूणच सर्व कामे दर्जेदार असावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत श्री क्षेत्र औंढा नागनाथ तसेच नागपूर येथील कल्याणेश्वर मंदिराच्या सुधारित तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली. तसेच पुण्याजवळ आंबेगाव येथील शिवसृष्टी थीम पार्कच्या चौथ्या टप्प्याच्या कामासाठी ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार संतोष बांगर, प्रवीण दटके, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत औंढा नागनाथ मंदिराच्या १९३ कोटी ५५ लाख २० हजार ४७४ रुपयांच्या तर, कल्याणेश्वर मंदिराच्या ७२.४९ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली. आंबेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित शिवसृष्टी ऐतिहासिक थीम पार्क प्रकल्पाच्या प्रगतीचा यावेळी आढावा घेण्यात आला. यातील चौथ्या टप्प्यासाठीच्या कामासाठी ५० कोटींच्या निधीलाही मंजूरी देण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औंढा नागनाथ मंदिर परिसराचा विकास करताना मंदिराचे वैभव जपण्याचे निर्देश दिले. तर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जतन आणि संवर्धनाबरोबरच भाविकांसाठी चांगल्या सोयी-सुविधा निर्माण करण्याची सूचना केली.

औंढा नागनाथ मंदिराच्या संवर्धन आणि जीर्णोद्धाराचे काम पुरातत्व आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाणार असून यामध्ये मंदिराच्या आवारातील नंदी मंडप, ओवरी आणि दर्शन बारी या मंदिराच्या आवारातील वास्तूंचे संवर्धन केले जाणार आहे. यासह हरीहर तलाव आणि परिसरातील मंदिरांचे संवर्धन आणि जीर्णोद्धार केला जाणार आहे. मंदिर परिसरासाठी बाह्य विद्युतीकरण, सीसीटीव्ही, रोषणाई आणि उद्यान विकास देखील केला जाणार आहे. भक्त निवासाची नव्याने उभारणी केली जाणार असून २५०० क्षमतेचा प्रतीक्षा कक्ष असणार आहे. भाविकांना कमी वेळेत दर्शन मिळवे, यादृष्टीने याचे नियोजन केले जाणार असून दर्शन रांगेत भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. याचबरोबर मंदिराचे वैभव कायम राखून मोठी झाडे लावणे, परिसराला दगडी बांधकामासारखा साज देणे, परिसरात सापडलेल्या जुन्या मूर्त्या भाविकांना पाहता याव्यात यासाठी म्युझियम तयार करणे, भाविकांना माहिती देण्यासाठी माहिती केंद्र उभारणे आदी कामे केली जाणार असल्याची माहिती हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांनी सादरीकरणाद्वारे दिली. कल्याणेश्वर मंदिर परिसरात पार्किंगची व्यवस्था वाढवावीनागपूर येथील ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या कल्याणेश्वर मंदिर महाल परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याचा आढावा घेताना आवश्यकता विचारात घेउन पार्किंगची व्यवस्था वाढविण्यात यावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. तथापि, अशा परिसरात यांत्रिक पार्किंगचा वापर व्यवहार्य ठरत नसल्याने साध्या पार्किंगची व्यवस्था असावी, असे ते म्हणाले. नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यावेळी यापूर्वी शिखर समितीच्या बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांनुसार मंदिर विकास आराखड्यात करण्यात आलेल्या बदलांची माहिती दिली. त्यानुसार बेसमेंटमधील यांत्रिक वाहनतळ वगळून त्याठिकाणी दोन तळघरांचा समावेश करण्यात आला आहे.

# मोमोज खाल्ल्याने 16 जणांना विषबाधा

**मुंबई :** कुर्ला पश्चिमेकडील सुंदरबाग परिसरात मोमोज खाल्ल्यानंतर १६ जणांना फूड पॉइझनिंगचा त्रास झाल्याची घटना समोर आली आहे.



उलट्या, जुलाब, ताप, पोटदुखी आणि चक्कर येण्याचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांना कुर्ला येथील भाभा रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले. यापैकी १४ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, दोघांवर बाह्य रुग्ण विभागात (ओपीडी) उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य समितीचे अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांनी भाभा रुग्णालयाला भेट देउन रुग्णांची विचारपूस केली. तसेच डॉक्टर आणि रुग्णालय प्रशासनाकडून रुग्णांची प्रकृती व सुरू असलेल्या उपचारांची माहिती घेतली

# दूध 9 रूपयांनी महागणार!

**मुंबई /प्रतिनिधी-**दुधाळ जनावरांच्या वाढत्या किमती तसेच पशुखाद्याच्या दरात झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर मुंबई दुग्ध उत्पादक संघाने दुधाच्या घाउक दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार



दुधाचा सध्याचा घाउक दर प्रतिलिटर ९३ रुपयांवरून १०२ रुपये करण्यात येणार आहे. मुंबईत हे नवे दर १ सप्टेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत लागू राहणार आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष चंद्रकुमार सिंग यांनी दिली. जोगेश्वरी येथील दिवाण सेंटर सभागृहात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत दुधाळ जनावरांच्या वाढत्या किमतींबरोबरच दाणा, तूरचुणी, चणाचुणी आदी पशुखाद्यांच्या दरात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच चारा, पेंड आदींच्या किमतीतही वाढ झाल्याने दूध उत्पादकांवर आर्थिक भार पडत असल्याचे सांगण्यात आले. या वाढत्या उत्पादन खर्चाचा विचार करून हा दर प्रतिलिटर ९ रुपयांनी वाढवून १०२ रुपये करण्यात आला असून, दूध उत्पादकांना वाढत्या खर्चातून दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुंबई दुग्ध उत्पादक संघाकडून स्पष्ट करण्यात आले.

# मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात शासन सकारात्मक

**मुंबई :** राज्य शासन मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक असून सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील मराठा समाजाच्या संबंधी प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.मराठा समाजाशी संबंधित



विविध विषयांबाबत आढावा बैठक उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीस पर्यटन मंत्री शंभुराज देसाई, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मंत्री विखे-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सोयीसुविधा व सवलती मराठा समाजातील विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा निर्णय घेतला असून सर्व विभागांनी याबाबत कार्यवाही सुरू केली आहे. यापुढे संबंधित विभागांनी ही प्रक्रिया अधिक गतिमान करून तातडीने क्षेत्रीय कार्यालयांना उचित निर्देश द्यावेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मराठा आरक्षण कक्षास सादर करावा. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेतील प्रलंबित निधी तातडीने देण्यात यावा. मराठा समाजाशी संबंधित विषयांचा मराठा आरक्षण कक्षाशी समन्वय ठेवण्यासाठी सर्व विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावा, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.कुणबी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा घेत प्रमाणपत्रे विहित मुदतीत देण्यात यावीत असे निर्देश देत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी या कामकाजाचा आढावा घ्यावा असे मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत सांगितले. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, अण्णासाहेब पाटील महामंडळाला शासनाने जुलैअखेरपर्यंत ४५० कोटी रुपये वितरीत केले असून हा निधी तातडीने लाभार्थ्यांना वितरीत करावा.

# तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती मिळणार

**मुंबई :**भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्-या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्-तक्षय हे माता व नवजात शिशू मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून ॲनिमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र



रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्-तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.तीव्र रक्-तक्षयावर आयर्न सुक्रोज तसेच फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. एचएमआयएस अहवालानुसार चालू वर्षात (२०२६-२७ जुलैअखेर) नोंद झालेल्या एकूण मातांपैकी तपासणीअंती २३५२४ गरोदर मातांची तीव्र रक्-तक्षय असलेल्-या अतिजोखमीच्-या माता म्हणून निदान झाले आहे. त्यापैकी २१३३७ मातांना आयर्न सुक्रोज किंवा फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) द्वारे उपचार देण्यात आले असून उपचाराचे प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचले आहे. गरोदरपणातील तीव्र रक्तक्षयामुळे माता आणि गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमार्फत तपासणी-निदान-उपचार-पुनर्तपासणीही साखळी अधिक परिणामकारक करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

# अंडीच्या दरात 35 ते 40 टक्क्यांची वाढ

**नवी दिल्ली :**साखर आणि इतर जीवनावश्यक अन्नधान्याच्या वाढत्या महागाईनंतर आता सामान्य नागरिकांच्या रोजच्या आहारातील प्रथिनांचा मुख्य स्त्रोत असलेली अंडीही महागली आहेत. गेल्या एका वर्षात अंड्यांच्या दरात तब्बल ३५ ते ४० टक्क्यांची मोठी वाढ नोंदवली गेली आहे. नॅशनल एग को-ऑर्डिनेशन कमिटीच्या आकडेवारीनुसार, पोल्ट्री फार्ममधून निघणा-या एका अंड्याची मूळ किंमत सुमारे ७ रुपयांवर पोहोचली असून, किरकोळ बाजारात ग्राहकांना एका अंड्यासाठी ८.५० ते ९ रुपये मोजावे लागत आहेत. या भाववाढीमागे पोल्ट्री फीडच्या (कोंबड्यांच्या खाद्याच्या) वाढत्या खर्चाचा मोठा वाटा असून, पेट्रोलमधील इथेनाल मिश्रणासाठी मक्याची वाढलेली मागणी हे यामागील प्रमुख कारण ठरत आहे.केंद्र सरकारच्या पेट्रोलमध्ये इथेन?ल ब्लेंडिंग वाढवण्याच्या धोरणामुळे अन्नधान्याचा वापर वाढला आहे, ज्यामध्ये मका हा प्राथमिक कच्चा माल बनला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६



च्या इथेन?ल सप्लाय वर्षात इथेन?ल उत्पादनासाठी सुमारे १२५.७८ लाख टन मका वापरला जाण्याचा अंदाज आहे. आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ नुसार, मक्यावर आधारित इथेन?लच्या दरांमध्ये दरवर्षी सरासरी ११.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. मक्याला मिळणा-या चांगल्या भावामुळे पोल्ट्री उद्योगाला आवश्यक असलेल्या मक्याच्या पुरवठ्यावर आणि किमतींवर थेट ताण आला आहे. कुक्कुटपालन व्यवसायात पोल्ट्री फीड हा सर्वात मोठा उत्पादन खर्च मानला जातो. मका आणि सोयाबीन हे या खाद्यातील मुख्य घटक आहेत. देशांतर्गत मागणी प्रचंड वाढल्यामुळे भारताला २०२४ मध्ये म्यानमार आणि युक्रेनसारख्या देशांमधून तब्बल ८.९ लाख टन मका आयात करावा लागला. देशात २०२४-२५ दरम्यान ४.३४ कोटी टन मका उत्पादन होउनही, इथेन?ल प्रकल्प आणि पोल्ट्री अशा दोन्ही क्षेत्रांतून आलेल्या वाढत्या मागणीमुळे पुरवठ्याची टंचाई निर्माण झाली आणि पोल्ट्री फीडचे दर भडकले.वर्षाच्या इतर महिन्यांच्या तुलनेत हिवाळ्यात देशभरात अंड्यांची मागणी लक्षणीयरीत्या वाढते. सध्याच्या स्थितीत मक्याचे दर आणि पोल्ट्री फीडचा खर्च चढाच राहिल्यास, आगामी हिवाळ्यात वाढत्या मागणीमुळे अंड्यांच्या किमतींवर आणखी दबाव येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## व्यवस्थेची विश्वासार्हता?

देशातील स्पर्धा परीक्षांकडे आज केवळ नोकरी किंवा प्रवेशाचे साधन म्हणून पाहता येणार नाही. त्या लाखो तरुणांच्या आयुष्याचा निर्णायक टप्पा आहेत. एका प्रश्नपत्रिकेच्या काही तासांत अनेक वर्षांची मेहनत,पालकांचा पैसा, त्याग आणि भविष्याची स्वप्ने पणाला लागलेली असतात. म्हणूनच पेपरफुटी, गैरप्रकार, निकालातील विलंब,परीक्षा केंद्रांवरील गोंधळ किंवा प्रश्नपत्रिकेच्या सुरक्षेवरील संशय ही केवळ प्रशासकीय चूक राहत नाही; ती गुणवत्तेवरील आणि व्यवस्थेवरील विश्वासाला तडा देणारी बाब ठरते.राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएच्या कार्यपद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेला 'यूपीएससीसारखी व्यवस्था का उभी करता येत नाही?'हा प्रश्न म्हणूनच महत्त्वाचा आहे.न्यायालयाने केवळ दोष दाखवण्याऐवजी सुधारणा संस्थात्मक करण्याची गरज अधोरेखित केली. एनटीएने राधाकृष्णन समिती आणि नंदन नीलेकणी समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी काय पावले उचलली, याचा तपशीलही मागवण्यात आला. याचा अर्थ स्पष्ट आहे, तात्पुरत्या मलमपट्टीपेक्षा कायमस्वरूपी उपचाराची वेळ आली आहे. एनटीएने अवघ्या काही वर्षांत राष्ट्रीय पातळीवरील शेकडो परीक्षा घेतल्या आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार आठ वर्षांत २७० हून अधिक परीक्षा आणि सुमारे ६.६ कोटी विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर परीक्षा घेणाऱ्या संस्थेवर मोठी जबाबदारी असते. मात्र मोठेपणा हा विश्वासार्हतेचा पर्याय नाही. प्रश्न असा आहे की, एखादी चूक झाल्यानंतर संस्था तिच्यातून काय शिकते आणि पुढील वेळी तीच त्रुटी पुन्हा होऊ नये यासाठी काय बदल करते? यूपीएससीचे उदाहरण यासाठी महत्त्वाचे ठरते. यूपीएससीची ताकद केवळ तिच्या प्रतिष्ठेत नाही;ती दीर्घकाळात निर्माण झालेल्या संस्थात्मक अनुभवात आहे. तंत्रज्ञान बदलले,परीक्षा पद्धती बदलल्या,तरी प्रक्रियेतील शिस्त, गोपनीयता आणि उत्तरदायित्वाची चौकट टिकून राहिली.एनटीएला यूपीएससीची नक्कल करायची नाही; पण अशीच संस्थात्मक स्मरणशक्ती निर्माण करायची आहे.परीक्षा सुरक्षित करण्यासाठी प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून तिच्या छपाई,वाहतूक, साठवणूक,केंद्रापर्यंत पोहोच आणि परीक्षा सुरू होईपर्यंत अनेक सुरक्षा-कडे असणे आवश्यक आहे. नीटसारख्या परीक्षेबाबत न्यायालयातही प्रश्न उपस्थित झाले. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा केंद्रापर्यंत ती सुरक्षित पोहोचवण्यासाठी अत्यंत गोपनीय व्यवस्था केली जाते, असे सरकारकडून सांगण्यात आले; मात्र न्यायालयाने सुरक्षित कार्यालयीन व्यवस्था, गोपनीयता, सायबर सुरक्षा आणि संचालनाच्या पद्धतींकडे अधिक लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. म्हणजेच 'फुलप्रूफ' असल्याचा दावा पुरेसा नाही; प्रत्येक पायरीची प्रत्यक्ष पडताळणी आवश्यक आहे. तंत्रज्ञान हा या सुधारणेचा महत्त्वाचा भाग आहे, पण तो एकमेव उत्तर नाही.यंदा नागरी सेवा पूर्वपरीक्षेत प्रथमच उमेदवारांची प्रत्यक्ष ओळख पटवण्यासाठी रिअल टाइम चेहरा प्रमाणीकरणासारख्या उपायांचा वापर करण्यात आला. डिजिटल साधने फसवणूक रोखू शकतात; परंतु तंत्रज्ञानाला प्रशिक्षित मनुष्यबळ, सुरक्षित पायाभूत सुविधा आणि स्पष्ट जवाबदारीची जोड नसेल तर त्याचा उपयोग मर्यादित राहतो. यूजीसी नेटच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झाल्याचा दावा आणि त्यातून चुकीची माहिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त झाल्याने आणखी एक धडा मिळतो, तंत्रज्ञान वापरण्यापेक्षा त्याची तपासणी व्यवस्था अधिक मजबूत असणे गरजेचे आहे. एनटीएतील मनुष्यबळाचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. ताज्या वादांनंतर मोठ्या प्रमाणावर विषयतज्ज्ञ बदलण्यात आले, नव्या नियुक्त्या झाल्या आणि संस्थेतील कायमस्वरूपी पदांची संख्या मर्यादित असल्याचेही समोर आले. परीक्षा घेण्याचा अनुभव हा फाईलसोबत हस्तांतरित होत नाही. तो माणसांमध्ये आणि प्रक्रियेत साठतो. त्यामुळे वारंवार अधिकारी किंवा तज्ज्ञ बदलले तर संस्थात्मक स्मरणशक्ती कमकुवत होऊ शकते. 'नवी टीम, नवी ऊर्जा' चांगली; पण तिच्यासोबत जुना अनुभवही जपला पाहिजे. परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याच्या दिशेने एसएससीकडून वस्तुनिष्ठ प्रश्नांसोबत वर्णनात्मक प्रश्नांचा समावेश करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हा सकारात्मक बदल आहे.एसएससीच्या काही परीक्षांमध्ये वर्णनात्मक प्रश्नांचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवण्याचा विचारही याच दिशेने आहे. त्यामुळे उमेदवाराची केवळ वस्तुनिष्ठ उत्तरे नव्हे, तर मांडणी आणि लेखनकौशल्यही तपासले जाईल. मात्र प्रश्नांचा प्रकार बदलणे पुरेसे नाही. प्रश्नपत्रिका कोण तयार करते, तिची छपाई कुठे होते, सुरक्षा कशी राखली जाते, केंद्रावर वितरण कसे होते आणि निकाल किती पारदर्शकपणे जाहीर होतो, हे अधिक मूलभूत प्रश्न आहेत. झारखंडमध्ये परीक्षांवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊन २२ परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागणे, विविध न्यायालयांमध्ये परीक्षा प्रक्रियेविरोधात याचिका दाखल होणे, नीट आणि यूजीसी-नेटसारख्या परीक्षांवर संशय निर्माण होणे-या घटना वेगवेगळ्या असल्या तरी संदेश एकच आहे, विद्यार्थ्यांचा विश्वास ढासळत आहे. आता सरकारने प्रत्येक परीक्षा संस्थेचे स्वतंत्र सुरक्षा लेखापरीक्षण, सायबर सुरक्षा तपासणी, प्रश्नपत्रिका व्यवस्थेचे बहुस्तरीय संरक्षण, प्रशिक्षित मनुष्यबळ, पारदर्शक केंद्रनियुक्ती आणि स्पष्ट उत्तरदायित्व निश्चित केले पाहिजे. गैरप्रकार झाल्यावर दोषी शोधणे आवश्यकच; पण 'ही चूक घडली कशी?' हा प्रश्न त्याहून महत्त्वाचा आहे.विद्यार्थ्यांना दयेची नाही,न्याय्य संधीची गरज आहे. त्यांना 'व्यवस्था सुरक्षित आहे'असे सांगण्यापेक्षा ती सुरक्षित करून दाखवावी लागेल. कारण परीक्षेतील एक चूक एखाद्या विद्यार्थ्यांचे वर्ष हिरावून घेते; पण वारंवार होणाऱ्या चुका संपूर्ण पिढीचा व्यवस्थेवरील विश्वास हिरावून घेतात.परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या भवितव्याची कसोटी आहे; पण आज खरी कसोटी परीक्षा संस्थांची आहे.देशाला फक्त फुलप्रूफ व्यवस्था नको,तर चूक मान्य करणारी,त्यातून शिकणारी आणि तीच चूक पुन्हा होऊ न देणारी व्यवस्था हवी.विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना प्रश्नपत्रिकेच्या कागदाइतकी नाजूक व्यवस्था नको; त्यांच्या मेहनतीइतकीच भक्कम व्यवस्था हवी. कारण भवितव्य घडवणाऱ्या तरुणांची परीक्षा घेण्यापूर्वी, परीक्षा व्यवस्थेने स्वतःच्या विश्वासार्हतेची परीक्षा उत्तीर्ण होणे हीच खरी गरज आहे.

# कर्जमुक्ती हे शेतकऱ्यांवरचे उपकार नव्हेत!

भारतीय अर्थव्यवस्थेत जेव्हा-जेव्हा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा किंवा कर्जमुक्तीचा मुद्दा ऐरणीवर येतो, तेव्हा त्याला 'मोफतची खैरात', 'राजकीय लोकानुनय' किंवा 'बँकिंग व्यवस्थेवरचा ताण' अशा नकारात्मक चौकटीत पाहिले जाते. परंतु, देशातील कॉर्पोरेट जगताला ज्या आर्थिक सिद्धांतांच्या आधारे नफा कमवण्याचे आणि स्वतःच्या मालाची किंमत ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे, त्याच चष्म्यातून कधी कृषी क्षेत्राच्या ताळेबंदाचे मूल्यमापन झाले आहे का? बाजारातील आर्थिक निकष जर सर्वांसाठी समान असतील, तर शेतकऱ्याला मिळणारी कर्जमुक्ती हा सरकारच्या औदार्याचा भाग नसून, सदोष बाजार व्यवस्थेमुळे झालेल्या नुकसानीची ती केवळ कायदेशीर भरपाई ठरते. अर्थात, ते शेतकऱ्यांवरील उपकार नव्हेत तर तो त्यांचा अधिकार आहे.

**उद्योगांचे 'किंमत निश्चिती' मॉडेल आणि शेती**

मुक्त बाजारपेठेत कोणत्याही खासगी उत्पादन कंपनीचे आर्थिक गणित पाहिले तर ते 'कॉस्ट-प्लस प्रायसिंग' या तत्त्वावर चालते. कोणतीही कंपनी उत्पादनाची अंतिम किंमत (MRP) ठरवताना कच्चा माल, मजुरी, वाहतूक आणि प्रक्रिया खर्चासोबतच 'ROCE' (Return on Capital Employed) म्हणजेच लावलेल्या एकूण स्थिर व फिरत्या भांडवलावर किमान १० ते २० टक्के परतावा गृहीत धरते.

विशेषतः शेतीशी थेट संबंधित असणाऱ्या मोठ्या खाद्यतेल उत्पादक कंपन्यांची आर्थिक आकडेवारी याचे उत्तम उदाहरण आहे. 'फॉर्च्युन ऑईल' (अदानी विल्मर) सारख्या अग्रगण्य अ‍ॅग्रो-बिझनेस कंपनीचा वार्षिक भांडवली परतावा (ROCE) जवळपास २०.९ टक्के आहे, तर 'गोदरेज ?ग्रोव्हेट' सारख्या कृषी व तेल क्षेत्रातील मोठ्या कंपनीचा वार्षिक ROCE १९.२ टक्क्यांच्या घरात आहे. या कॉर्पोरेट कंपन्या बाजारातील कच्च्या मालाचे दर आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींनुसार आपल्या तेलाची किंमत (MRP) वाढवून स्वतःचा नफा सुरक्षित ठेवतात. याउलट, या कंपन्यांना



**देशाची धोरणे शेतीकडे व्यवसाय वा उद्योग म्हणून पाहत नाहीत, तोपर्यंत शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी सरकारला कर्जमाफीच्या रूपानेच फेडावी लागेल.**

सोयाबीनसारखा कच्चा माल पुरवणारा मूळ उत्पादक (शेतकरी) मात्र स्वतःच्या मालाचा भाव ठरवण्याच्या अधिकारापासून पूर्णपणे वंचित आहे.

**सोयाबीनचे 'औद्योगिक' अर्थशास्त्र: एक प्रात्यक्षिक**

शेतकऱ्याला उद्योजकाचा दर्जा देऊन, १ हेक्टर (अडीच एकर) जमिनीवर, ४ महिन्यांच्या सोयाबीन पिकाचे आर्थिक मूल्यमापन खासगी कंपनीच्या धर्तीवर केले, तर येणारे आकडे चक्रावून टाकणारे आहेत. या गणितात आपण कॉर्पोरेट क्षेत्राच्या २० टक्के परताव्याच्या तुलनेत केवळ किमान १० टक्के ROC आणि कुटुंबाच्या श्रमाचे न्याय्य मूल्य गृहीत धरले आहे:

– शेतकरी कुटुंबाचे मासिक वेतन: १५,००० रुपये (चार महिन्यांचा पीक कालावधी – ६०,००० रुपये)

– मजुरांचे मासिक वेतन: १५,००० रुपये (४ महिने ६०,००० रुपये)

– कच्चा माल व मशागत खर्च: २५,००० रुपये (बियाणे, खते, कीटकनाशके व ट्रॅक्टर)

– स्थिर भांडवल (जमिनीचे बाजारमूल्य): २५,००,००० रुपये (२५ लाख रुपये प्रति हेक्टर)

– सरासरी प्रगत उत्पादन: २५ क्विंटल (प्रति हेक्टर)

या निकषांवर आधारित कोष्टक खालीलप्रमाणे मांडता येईल:

खर्चाचा घटक (प्रति हेक्टर)

चार महिन्यांचा प्रमाणशीर ROCE धरल्यास

१. शेतकरी कुटुंब वेतन (४ महिने) – ६०,००० रुपये

२. मजुरी खर्च ६०,००० रुपये

३. कच्चा माल व मशागत २५,००० रुपये

४. १० टक्के भांडवली परतावा (ROCE)

८३,३३३ रुपये (चार महिने प्रमाणशीर परतावा)

एकूण उत्पादन खर्च (Total Cost) २,२८,३३३ रुपये

प्रति क्विंटल न्याय्य भाव (MRP) ९,१३३ रुपये/क्विंटल

**वास्तव आणि विरोधाभास**

वरील ताळेबंदावरून हे स्पष्ट होते की, औद्योगिक नियम शेतीला लावले तर सोयाबीनला प्रति क्विंटल किमान ९,१३३ रुपये ते १५,८०० रुपये च्या दरम्यान भाव मिळायला हवा. तरच शेतकरी आपल्या स्थिर भांडवलावर (जमीन) योग्य परतावा मिळवून एका मॅन्युफॅक्चररप्रमाणे सन्मानाने जगू शकेल. परंतु, आजचे वास्तव काय आहे? चालू हंगामात देशातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये (APMC) सोयाबीनला केवळ ३,८०० ते ४,५०० रुपये प्रति क्विंटलचा भाव मिळत आहे. हा भाव शेतकऱ्याचा निव्वळ उत्पादन खर्च (C2) तर सोडाच, पण वर नमूद केलेल्या हक्काच्या भावाच्या निम्म्याहूनही कमी आहे.

जेव्हा बँकिंग क्षेत्रातील कॉर्पोरेट क्षेत्राची आकडेवारी पाहिली जाते, तेव्हा हा विरोधाभास अधिक तीव्र होतो. राज्यसभेतील अधिकृत माहितीनुसार (२०२१ ते २०२६ या ५ वर्षांत), बँकांनी मोठ्या उद्योगधंद्यांचे तब्बल ३ लाख २० हजार ४८१ कोटी रुपयांचे कर्ज राईट-ऑफ (Write-off) म्हणजेच बुडीत खात्यात टाकून एका अर्थाने माफ केले आहे. या तुलनेत कृषी क्षेत्राचे केवळ १ लाख १८ हजार ९८४ कोटी रुपयांचे कर्ज राईट-ऑफ झाले आहे. म्हणजेच, उद्योगांना दिलेली सवलत शेती क्षेत्राच्या तुलनेत तब्बल २.७ पटीने जास्त आहे. कॉर्पोरेटचे अब्जावधींचे कर्ज बुडीत खात्यात टाकणे ही 'आर्थिक शिस्त किंवा उद्योगांचे पुनरुज्जीवन' ठरते, मग शेतकऱ्यांच्या कर्जमाफीलाच 'खैरात' का संबोधले जावे?

**अंतिम सूत्र**


शेतकऱ्याला वारंवार कर्जमाफीची भीक नको आहे, तर त्याला कायमच्या कर्जमुक्तीची आणि आर्थिक स्वातंत्र्याची गरज आहे. स्वामीनाथन आयोगाने सुचवलेला C2 50% (सर्वसमावेशक खर्च अधिक ५० टक्के नफा) हा फॉर्म्युला प्रत्यक्षात याच औद्योगिक तत्त्वाचा पुरस्कार करतो. जोपर्यंत देशाची धोरणे शेतीकडे एक व्यवसाय किंवा उद्योग म्हणून पाहत नाहीत आणि शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर भाव सुनिश्चित करत नाहीत, तोपर्यंत शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी सरकारला कर्जमाफीच्या रूपानेच फेडावी लागेल. म्हणूनच, जोपर्यंत बाजारात न्याय मिळत नाही, तोपर्यंत कर्जमुक्ती हे शेतकऱ्यांवर केलेले उपकार असूच शकत नाहीत- तो त्यांचा हक्काचा अधिकार आहे!

**सूरज खेर**

# एआयमुळे वस्त्र-फॅशन व्यापारात क्रांती

**आज एआय भारतीय वस्त्र आणि फॅशनउद्योगात नवी क्रांती घडवत आहे. पूर्वी ग्राहक दुकानात येत असे, अनेक कपडे पाहत असे, ट्रायल रूममध्ये जाऊन कपडे घालून पाहत असे आणि मग खरेदीचा निर्णय घेत असे. आता एआयच्या मदतीने ग्राहकांची पसंत, वर्तन, बजेट आणि खरेदीच्या इतिहासाचा अभ्यास करून योग्य कपडे आधीच सुचवता येतात. यामुळे ग्राहकांचा वेळ वाचतो आणि विक्रेत्यांची विक्री वाढते.**

भारत हा जगातील सर्वात मोठ्या ग्राहक बाजारपेठांपैकी एक आहे. कपडे, फॅशन, जीवनशैली आणि वैयक्तिक आवडी यामध्ये भारतीय ग्राहकांची विविधता विलक्षण आहे. प्रत्येक प्रदेश, वयोगट, उत्पन्न गट आणि संस्कृतीनुसार पेहरावाची पसंती बदलते. अशा विशाल आणि गुंतागुंतीच्या बाजारपेठेत ग्राहकांना योग्य उत्पादने सुचवणे, त्यांचा अनुभव सुधारणे आणि विक्री वाढवणे हे किरकोळ विक्रेत्यांसाठी मोठे आव्हान असते. आज कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय या आव्हानांचे समाधान देत असून भारतीय वस्त्र आणि फॅशन उद्योगात नवी क्रांती घडवत आहे. पूर्वी ग्राहक दुकानात येत असे, अनेक कपडे पाहत असे, ट्रायल रूममध्ये जाऊन कपडे घालून पाहत असे आणि मग खरेदीचा निर्णय घेत असे. आता एआयच्या मदतीने ग्राहकांची पसंत, वर्तन, बजेट आणि खरेदीच्या इतिहासाचा अभ्यास करून योग्य कपडे आधीच सुचवता येतात. यामुळे ग्राहकांचा वेळ वाचतो आणि विक्रेत्यांची विक्री वाढते. एआयचा सर्वात मोठा उपयोग म्हणजे वैयक्तिकृत शिफारशी. प्रत्येक ग्राहकाची आवड वेगळी असते. काहींना पारंपरिक पोशाख आवडतात तर काहींना आधुनिक फॅशन. काही ग्राहकांना चमकदार रंग आवडतात तर काहींना साधे आणि सौम्य रंग पसंत पडतात. एआय ग्राहकांच्या पूर्वीच्या खरेदी, वेबसाइटवरील शोध, क्लिक, सामाजिक माध्यमांवरील आवडी आणि इतर माहितीचा अभ्यास करून त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे कपडे सुचवते. त्यामुळे ग्राहकाला हजारो पर्यायांमधून शोध घेण्याची गरज




राहत नाही. आज अनेक भारतीय ग्राहक ऑनलाइन खरेदी करतात. परंतु ऑनलाइन खरेदीतील सर्वात मोठी समस्या म्हणजे एखादा पेहराव प्रत्यक्षात कसा दिसेल याची खात्री नसणे.

**अचूक निवडीसाठी एआय**

एआय आधारित व्हच्युअल ट्राय-ऑन तंत्रज्ञान या समस्येचे निराकरण करत आहे. ग्राहकाचा फोटो किंवा शरीराची मोजमापे वापरून एआय त्या व्यक्तीच्या अंगावर विशिष्ट कापड कसे दिसेल याचे वास्तवदर्शी चित्र तयार करते. ग्राहकाला ट्रायल रूममध्ये जाण्याची गरज नसते. घरबसल्या तो विविध रंग, डिझाइन आणि आकार पाहू शकतो. यामुळे कपडे परत करण्याचे प्रमाणही कमी होते. आज ऑनलाइन फॅशन उद्योगाला सर्वाधिक खर्च कपडे परत स्वीकारण्यासाठी येतो. एआय ग्राहकाला अधिक अचूक निवड करण्यास मदत करते आणि विक्रेत्यांचे नुकसान कमी करते. भारतातील ग्राहक किंमतीबाबत अत्यंत संवेदनशील असतात. त्यामुळे बजेट आधारित शिफारशी हे एआयचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ग्राहकाने आपले बजेट सांगितल्यास एआय त्यानुसार सर्वोत्तम पर्याय सुचवते. उदाहरणार्थ, एखाद्या ग्राहकाचे बजेट दोन हजार रुपये असेल तर एआय त्याला त्या मर्यादित शर्ट, पँट, बूट आणि अ‍ॅसेसरीजचे संपूर्ण संयोजन सुचवू शकते. यामुळे ग्राहकाला अधिक मूल्य मिळते आणि विक्रेत्याला अधिक उत्पादने विकण्याची संधी मिळते. एआय ग्राहकांच्या वर्तनाचा अभ्यास करण्यामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते. ग्राहक कोणत्या उत्पादनांकडे जास्त वेळ पाहतो, कोणत्या वस्तू खरेदी करतो, कोणत्या टप्प्यावर खरेदी प्रक्रिया सोडून देतो, कोणत्या रंगांना प्राधान्य देतो याचा सखोल अभ्यास एआय करते. या माहितीच्या आधारे विक्रेते आपली उत्पादने, जाहिराती आणि विपणन धोरणे अधिक प्रभावी बनवू शकतात.

**ग्राहकांचे समाधान**

समजा, एखाद्या शहरात तरुण ग्राहक मोठ्या प्रमाणावर सैल आणि आरामदायी कपड्यांना पसंती देत आहेत. एआय ही प्रवृत्ती ओळखून त्या भागातील दुकानांमध्ये अशा उत्पादनांचा साठा वाढवण्याची सूचना करू शकते. यामुळे विक्री वाढते आणि अनावश्यक साठा कमी होतो. फॅशन ट्रेंडचा अंदाज घेण्यासाठीही एआय उपयुक्त ठरत आहे. सामाजिक माध्यमे, ऑनलाइन शोध, सेलिब्रिटींची फॅशन, चित्रपट आणि ग्राहकांच्या प्रतिक्रिया यांचे विश्लेषण करून पुढील काही महिन्यांमध्ये कोणती शैली लोकप्रिय होईल याचा अंदाज एआय लावू शकते. त्यामुळे उत्पादक आणि विक्रेते योग्य वेळी योग्य उत्पादने बाजारात आणू शकतात. एआयचा आणखी एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे ग्राहक सेवा. चॅटबॉट आणि व्हच्युअल सहाय्यक चोवीस तास ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात. ग्राहकाला कोणता आकार योग्य आहे, उत्पादन कधी उपलब्ध होईल, ऑर्डरची स्थिती काय आहे किंवा कोणते पर्याय उपलब्ध आहेत याची माहिती त्वरित मिळू शकते. यामुळे ग्राहक समाधान वाढते. भारतीय किरकोळ व्यापारात सणासदीच्या काळात विक्री मोठ्या प्रमाणात वाढते. दिवाळी, लग्नसमारंभ, ईद, नवरात्री किंवा पोंगलसारख्या प्रसंगी ग्राहकांच्या मागणीत अचानक वाढ होते. एआय विक्रीच्या ऐतिहासिक आकडेवारीचा अभ्यास करून भविष्यातील मागणीचा अंदाज लावू शकते. त्यामुळे योग्य प्रमाणात मालसाठा ठेवणे शक्य होते आणि वस्तूंची कमतरता किंवा अतिरिक्त साठा टाळता येतो.

**सुरक्षितता महत्त्वाचा मुद्दा**

तथापि, एआयचा वापर वाढत असताना डेटा गोपनीयता आणि सुरक्षितता हा महत्वाचा मुद्दा आहे. निवडीच्या प्रक्रियेत ग्राहकांच्या खरेदीच्या सवयी, फोटो, शारीरिक मोजमापे आणि वैयक्तिक माहिती यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. ही माहिती सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक आहे. ग्राहकांची स्पष्ट संमती घेणे, माहिती एन्क्रिप्ट करणे आणि आवश्यक तेवढाच डेटा वापरणे ही विक्रेत्यांची जबाबदारी आहे. भारतात डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीमुळे कंपन्यांना अधिक जबाबदारीने ग्राहक डेटा हाताळावा लागणार आहे. ग्राहकांचाही विश्वास जिंकण्यासाठी पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे. ग्राहकांचा डेटा केवळ त्यांना चांगला अनुभव देण्यासाठी वापरला जात आहे याची खात्री देणे गरजेचे आहे. भविष्यात एआय आणि संवर्धित वास्तव तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्राहक संपूर्ण कपड्यांचा संग्रह आभासी स्वरूपात पाहू शकतील. एखादा ग्राहक आपल्या मोबाइलवर स्वतःचा डिजिटल अवतार तयार करून त्यावर विविध कपडे, दागिने, बूट आणि अ‍ॅसेसरीज पाहू शकेल. वैयक्तिक फॅशन सल्लागाराप्रमाणे एआय त्याला रंगसंगती, शैली आणि प्रसंगानुसार योग्य पर्याय सुचवेल. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि फॅशन किरकोळ व्यापार यांचा संगम हा पुढील दशकातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या करिअर क्षेत्रांपैकी एक ठरणार आहे. आज जगभरातील मोठे फॅशन ब्रँड्स, ई-कॉमर्स कंपन्या आणि रिटेल साखळ्या ग्राहकांच्या वर्तनाचे विश्लेषण, वैयक्तिकृत शिफारसी, मागणीचे अंदाज, व्हर्च्युअल ट्राय-ऑनसाठी एआय तज्ज्ञांची नियुक्ती करत आहेत. त्यामुळे व्यवस्थापन, फॅशन डिझाईन, संगणकशास्त्र आणि डेटा विश्लेषण या क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत.

व्यवस्थापन शाखेतील विद्यार्थ्यांनी आता ग्राहक विश्लेषण, डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया, डिजिटल विपणन, ई-कॉमर्स, ग्राहक अनुभव व्यवस्थापन आणि एआय साधनांचा वापर यामध्ये प्रावीण्य मिळवणे आवश्यक आहे. फॅशन डिझाईनच्या विद्यार्थ्यांनी केवळ सर्जनशीलतेवर भर न देता एआय-आधारित डिझाईन साथने, थ्री-डी मॉडेलिंग, डिजिटल फॅशन, आभासी वस्त्रप्रदर्शन, ट्रेंड विश्लेषण आणि ग्राहक मानसशास्त्र यांचाही अभ्यास करायला हवा. डेटा सायन्स आणि मशीन लर्निंगचे मूलभूत ज्ञान त्यांना स्पर्धेसाठी तयार करेल. याशिवाय विद्यार्थ्यांनी प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग, जनरेटिव्ह एआय, ग्राहक डेटा गोपनीयता, सायबर सुरक्षा, संवर्धित वास्तव (एआर), आभासी वास्तव (व्हीआर) आणि व्यावसायिक विश्लेषण यांसारख्या उदयोन्मुख कौशल्यांकडे लक्ष द्यावे. भविष्यात तोच यशस्वी फॅशन व्यावसायिक ठरेल, जो फॅशनची जाण, ग्राहकांचे मानसशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची ताकद यांचा प्रभावी संगम घडवू शकेल. भारतीय किरकोळ व्यापारासाठी ही केवळ तांत्रिक सुधारणा नाही, तर व्यवसाय करण्याची नवी पद्धत आहे. ग्राहकांना अधिक चांगला अनुभव, अधिक अचूक शिफारसी आणि अधिक सोयिस्कर खरेदी प्रक्रिया मिळत आहे. दुसरीकडे, विक्रेत्यांना विक्री वाढवणे, खर्च कमी करणे, साठा व्यवस्थापन सुधारणे आणि ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध निर्माण करणे शक्य होत आहे.

**माहिती-विश्लेषणावर फॅशन व्यवसाय**

एके काळी विक्री करणाऱ्या व्यक्तीचा अनुभव आणि अंदाज यावर अवलंबून असलेला फॅशन व्यवसाय आता माहिती आणि बुद्धिमान विश्लेषणावर आधारित होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारतीय वस्त्र व फॅशन उद्योगासाठी केवळ एक तंत्रज्ञान नसून ग्राहककेंद्रित, वेगवान आणि अधिक परिणामकारक भविष्याची गुरुकिल्ली ठरत आहे. योग्य वापर, मजबूत डेटा सुरक्षा आणि ग्राहकांचा विश्वास यांचा समतोल राखला तर एआय भारतीय किरकोळ व्यापाराला जागतिक स्तरावर नवी ओळख देऊ शकते.

**डॉ. दीपक शिकारपूर**

## प्रश्नपत्रिका फुटीला आळा घालणे गरजेचे

सध्या विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. गेल्या काही वर्षांत राज्यात अनेक स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना घडल्या आहेत. या प्रकारामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरते, तो नाउमेद होतो आहे.स्पर्धा परीक्षेची तयारी करताना विद्यार्थी अनेक महिने, तर काही वेळा अनेक वर्षे मेहनत घेतात. त्यासाठी त्यांचा वेळ, पैसा आणि मानसिक श्रम खर्च होतात. मात्र प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे परीक्षा रद्द झाली किंवा निकाल लांबला, तर विद्यार्थ्यांना मोठा मानसिक धक्का बसतो. त्यांच्या भविष्यातील संधींवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. पालकही भरडले जातात हे नाकारता येत नाही.

प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर केवळ परीक्षा रद्द करून पुन्हा परीक्षा घेणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांच्या हातात पडण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कडक आणि सुरक्षित व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच गैरप्रकार करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे.

**– विश्वनाथ पंडित**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# डासांची उत्पत्ती रोखा, अन्यथा डेंग्यू-मलेरियाचा धोका वाढणार!- डॉ.तन्वीर शेख

## यवतमाळ जिल्ह्यात हत्तीरोगाचे ६३८ रुग्ण डेंग्यूचे १०, मलेरियाचे १२ तर चिकनगुनियाचे २ रुग्ण पॉझिटिव्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ : पावसाळ्यात साचणारे पाणी आणि त्यातून होणारी डासांची उत्पत्ती यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया तसेच हत्तीरोगाचा धोका वाढतो. त्यामुळे डासांची उत्पत्ती होऊन ते प्रौढ होण्याची वाट न पाहता त्यांच्या अळ्या नष्ट करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशी माहिती डॉ.तन्वीर शेख मलेरिया विभागाकडून देण्यात आली.**



डेंग्यूच्या प्रसारासाठी प्रामुख्याने Aedes (एडीस) डास कारणीभूत ठरतो. या डासाची मादी रक्तपान करते, तर नर डास रक्तपान करत नाही. एडीस डास स्वच्छ साचलेल्या पाण्यात अंडी घालतो. त्यामुळे घरातील प्लास्टिकची भांडी, डबे, कुंड्या, टाक्या किंवा इतर ठिकाणी साचलेले पाणी हे डासांच्या उत्पत्तीचे केंद्र बनू शकते. दरम्यान, Culex (क्युलेक्स) डासामुळे हत्तीरोगाचा प्रसार होतो. हत्तीरोगाचा संसर्ग सुरुवातीच्या टप्प्यात आढळल्यास उपचार व प्रतिबंधात्मक उपायांनी त्याचा प्रसार रोखता येतो. मात्र आजार बळावल्यानंतर उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक व व्यवस्थापनात्मक उपायांवर भर द्यावा लागतो. हा आजार टप्प्याटप्प्याने वाढत असल्याने सुरुवातीपासूनच काळजी घेणे महत्त्वाचे आहे. जिल्ह्यातील तपासण्यांमधून ही बाबी समोर आली की मलेरिया विभागाच्या माहितीनुसार, जिल्ह्यात आतापर्यंत ३ लाख ५७ हजार ५६१ रक्त नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये मलेरियाचे १२ रुग्णbआढळले आहेत. डेंग्यूसाठी ७ हजार ८७३ नमुने तपासण्यात आले असून १० रुग्ण पॉझिटिव्ह आढळले. चिकनगुनियासाठी ५७९ नमुने तपासण्यात आले असून २ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले आहेत. तसेच ट्रॅक टायफससाठी १ हजार ३२८ नमुने तपासण्यात आले असून २ रुग्ण आढळले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये हत्तीरोगाचे एकूण ६३८ रुग्ण असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. यवतमाळ, कळंब, घाटंजी, राळेगाव, वणी, मारेगाव, पांढरकवडा, जरी-जामणी या भागांत हत्तीरोगाचे रुग्ण आढळून येत आहेत.

### ‘कोरडा दिवस’ ठरतोय डासांविरोधातील प्रभावी अस्त्र

**डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी महिन्यातून किमान एक दिवस कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या दिवशी घरातील सर्व पाण्याची भांडी स्वच्छ करून साचलेले पाणी पूर्णपणे काढून टाकावे आणि भांडी कोरडी करावीत. कारण डासांची अंडी व अळ्या नष्ट करण्यासाठी साचलेले पाणी हटविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यवतमाळ शहरातील विविध प्रभागांमध्ये आशा वर्कर व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. घरातील तसेच परिसरातील साचलेले पाणी, सांडपाणी, नाल्या आणि गटारी यांची पाहणी करून डासांची उत्पत्ती होणार नाही यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.**

**“ डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना आवश्यकतेनुसार फॉगिंग मशीन वापरणे, मच्छरदाणीचा वापर, ओडोमॉससारख्या डास प्रतिबंधकांचा वापर, घराभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे, नाल्या वाहत्या ठेवणे तसेच पाईप, नाले, गटारे व संडासाच्या पाइपची नियमित स्वच्छता करणे आवश्यक आहे.**

**डासांचा प्रौढ होण्यापूर्वीच अळ्यांचा नायनाट करणे हीच डेंग्यू-मलेरिया विरोधातील खरी प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे. त्यामुळे ‘एक दिवस कोरडा’ नव्हे, तर प्रत्येक दिवस डासमुक्त ठेवण्याची जबाबदारी नागरिक आणि प्रशासनाने संयुक्तपणे स्वीकारणे गरजेचे आहे.**

# तेजस्विनी ई-रिक्षा योजनेवर संशयाचे सावट..! लाभार्थींच्या हक्काचा निधी कुठे गेला?

## महिला सक्षमीकरणाच्या योजनेतच गैरव्यवहाराचे आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ‘तेजस्विनी ई-रिक्षा’ योजनेच्या व्यवहारावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ई-रिक्षांची खरेदी, किंमत, वितरण प्रक्रिया तसेच लाभार्थी महिलांना प्रत्यक्ष मिळालेला लाभ याबाबत गंभीर आरोप होत असल्याने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. शासनाच्या निधीतून ई-रिक्षा उपलब्ध करून महिलांना रोजगाराचे साधन देणे अपेक्षित असताना, काही ठिकाणी लाभार्थी महिलांकडून ई-रिक्षा परत घेऊन त्याबदल्यात ठरावीक रक्कम देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. हा प्रकार खरा असल्यास योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला गेल्याचे स्पष्ट होणार आहे. योजनेत खरेदी करण्यात आलेल्या ई-रिक्षांची बाजारातील वास्तविक किंमत आणि शासनाच्या नोंदीतील किंमत यामध्ये तफावत आहे का, याची चौकशी होणे गरजेचे आहे. ई-रिक्षा कोणत्या कंपनीकडून खरेदी करण्यात आल्या, निविदा प्रक्रिया झाली का, वाहननिहाय किती रक्कम अदा करण्यात आली, यासह देयकांची संपूर्ण माहिती सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.

**लाभार्थींची प्रत्यक्ष पडताळणी आवश्यक**

ज्या महिलांच्या नावावर ई-रिक्षा मंजूर झाल्या, त्या महिलांना प्रत्यक्ष वाहन मिळाले का? त्या स्वतः ई-रिक्षा चालवून उत्पन्न मिळवत आहेत का? की वाहने इतरांकडे हस्तांतरित झाली? या प्रश्नांची लाभार्थी निहाय पडताळणी करण्याची गरज आहे. वाहनांची नोंदणी, विमा, बॅटरी क्षमता, गुणवत्ता व देखभालीची स्थितीही तपासण्याची मागणी आहे.

# महागावात अवैध देशी दारू वाहतुकीवर छापा

## ६.२० लाखांचा मुद्देमाल जप्त, चारचाकी वाहनासह तीन हजार देशी दारूच्या बाटल्या जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २७ :** महागाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील धनोडा येथे अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत टाटा टियागो ईव्ही चारचाकी वाहनासह एकूण ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



यवतमाळ जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेला प्रभावी कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार २५ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरखेड उपविभागात बंदोबस्त तसेच गुन्हेगारांचा शोध घेत असताना महागाव पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. यावेळी गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, टाटा टियागो ईव्ही क्रमांक MH-२९-CB-२६२३ या वाहनातून विनापरवाना देशी दारूची वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी धनोडा येथील जयस्वाल यांच्या दुकानासमोर सापळा रचला. संशयित वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये १० पोत्यांमध्ये देशी दारूच्या एकूण ३० पेट्या आढळून आल्या. प्रत्येक पेटीत ९० मिली क्षमतेच्या १०० बाटल्या याप्रमाणे एकूण ३ हजार देशी दारूच्या बाटल्या आढळल्या. या दारूची किंमत १ लाख २० हजार रुपये, तर वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या चारचाकी वाहनासह एकूण ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी मनोज परसराम कदम (वय ४०), रा. गणपती चौक, वॉर्ड क्रमांक १६, महागाव याच्याविरुद्ध महागाव पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स.पो.नि. धिरज बांडे, पोउपनि. अमोल राठोड यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. अवैध दारू वाहतुकीविरोधात करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# कवडशी शाळेतील २ वर्ग खोल्या मंजूर करून बांधकाम करण्यात यावे, विजय पिदुरकर यांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**वणी :** वणी तालुक्यातील कवडशी येथे दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी शाळा सुरू असताना व-हांड्याची भिंत अचानक कोसळली सुदैवाने यामध्ये कोणत्याही विद्यार्थ्याला नुकसान झाले नाही. त्यामुळे माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पिदुरकर यांनी नेतृत्वात शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, गावकरी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प.यवतमाळ यांना निवेदन देऊन धोकादायक वर्ग खोल्या पाडण्यात याव्यात तसेच २ नवीन वर्ग खोल्या संमग्र शिक्षा, जिल्हा नियोजन, खनिज विकास निधी योजनेतून मंजूर करून तात्काळ बांधकाम करण्यात यावे. कवडशी हे गाव खान बाधित क्षेत्रात येत असून बेलोरा, नायगाव, मुंगोली, कोळसा खाणी पासून ५ कि.मी.चे आत येत असून या कोळसा खाणी कडून वर्षाला करोडो रुपये जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त खनिज विकास निधी जिल्हा खणिकर्म अधिकारी यवतमाळ यांचे कडे वेकोली कोळसा खाणी कडून निधी जमा केला जातो.यापैकी नुकसानग्रस्त बाधित गावांना भरपाई साठी ५०% टक्के निधी मिळत नसेल तर हि मोठी शोकांतिका आहे. असे निवेदनात नमूद केले आहे.

व-हांडा पडल्याच्या घटनेमुळे शाळा सध्या ग्रामपंचायत कार्यालयात भरविण्यात येत आहे. सध्या तात्पुरते शेड उभारण्याकरिता विभागा कडून विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी महादेव दातारकर, वंदना काकडे,संध्या डूमणे,छाया चिडे,चंद्रकला भेंडाळे,सुलोचना बुच्चे,यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. या निवेदनावर मुख्य कार्यकारी अधिकारी हे काय कारवाई करणार याकडे कवडशी येथील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# थोडक्यात

## तप-आराधनेतून जिनशासनाची शान; ३१ व ११ उपवासाची भक्तीमय साधना

**यवतमाळ :** बोरा स्थानक येथे ज्ञानगच्छाधिपती, श्रुतधर पंडितरत्न प.



पू. श्री प्रकाशचंद्रजी म.सा. यांच्या आज्ञानुवर्ती प. पू. महासती श्री प्रेक्षाजी म.सा. ठाणा-४ यांच्या पावन सानिध्यात तप-आराधनेची पवित्र धारा प्रवाहित होत आहे. या तप-आराधनेत सुश्राविका सौ. जिनलबेन भूषणभाई सेठ यांनी ३१ उपवास, तर सुश्रावक श्री कुणालभाई दिनेशभाई सेठ यांनी ११ उपवास पूर्ण करून जिनशासनाच्या साधना परंपरेत भक्ती व त्यागाचा आदर्श निर्माण केला आहे. या महान तपस्वींचे पच्चक्खाण शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी प्रवचनानंतर होणार आहे. या मंगलप्रसंगी तपस्वी आत्मांच्या तपश्चर्येची भावपूर्ण अनुमोदना करण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
विशेषतः समाजातील युवक-युवतींनी या गौरवशाली प्रसंगी आवर्जून उपस्थित राहून तपस्वींचे दर्शन-वंदन व अनुमोदना घ्यावी, असे नम्र आवाहन करण्यात आले आहे. तपस्वी जिनलबेन सेठ व कुणालभाई सेठ यांच्या तपश्चर्येला कोटी कोटी अनुमोदना!




## रोलर रिले चॅम्पियनशिपमध्ये यशवंत मराठेची सुवर्ण झेप!

### आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड बुकमध्ये नोंद गोवा येथील ओपन इंटरनॅशनल स्पर्धेसाठी निवड

**यवतमाळ :** संभाजीनगर येथे आयोजित ४७ व्या ऑल इंडिया रोलर रिले चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत यवतमाळ जिल्ह्यातील स्केटर्सनी दमदार कामगिरी करत विविध गटांत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई केली. रोलर रिले फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत १०० मीटर, रिले-१ आणि रिले-२ या प्रकारांचा समावेश होता. महाराष्ट्र संघात यवतमाळ जिल्ह्यातील सुमारे २४ स्केटर्सची निवड झाली होती. त्यापैकी तिवसाळा येथील श्री गजानन महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेचा विद्यार्थी यशवंत मराठे याने इनलाईन स्केट प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण व रौप्य पदक पटकावले. यशवंतच्या या उत्कृष्ट कामगिरीची नोंद रॉयल युरो बुक, अमेरिकन बुक, वर्ल्ड रेकॉर्ड युनियन आणि सुपर स्पोर्ट्स या चार आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड बुकमध्ये झाल्याचे सांगण्यात आले. त्याच्या या यशामुळे आगामी ओपन इंटरनॅशनल गोवा स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.
यशवंतने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक प्रविण दिघाडे, संस्थापक अध्यक्ष वामनराव राठोड, मुख्याध्यापक योगेश राठोड, प्राथमिक मुख्याध्यापक सचिन नगराळे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिले. आश्रमशाळेच्या वतीने वामनराव राठोड यांनी यशवंतचा प्रमाणपत्र देऊन गुणगौरव केला. त्याच्या यशामुळे घाटंजी तालुक्यासह यवतमाळच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

## ईद मिलादुन्नबी निमित्त दावते इस्लामी हिंदच्या सामाजिक विभाग GNRF फळ वाटप

**उमरखेड़ :** पैगंबर-ए-इस्लाम हजरत मोहम्मद मुस्तफा यांच्या पवित्र



जन्मदिनानिमित्त ईद मिलादुन्नबी च्या पार्श्वभूमीवर दावते इस्लामी हिंदच्या सामाजिक विभाग GNRF (गरीब नवाज रिलीफ फाउंडेशन) तर्फे देशभर विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून उमरखेड़ GNRF टीमच्या वतीने ईद-ए-मिलादुन्नबी रॅलीमध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी व लहान मुलांसाठी फळे व खाद्यपदार्थांचे पॅकेट वितरित करण्यात आले.यावेळी दावते इस्लामी उमरखेड़ चे अमजद अत्तारी यांनी सांगितले की, संस्थेच्या वतीने देशातील विविध विभागामध्ये ईद-ए-मिलाद निमित्त रॅलीमध्ये फळे व खाद्यपदार्थांचे पॅकेट वितरित केले जात आहेत. तसेच नागरिकांच्या सेवेसाठी मोफत वैद्यकीय शिबिरे आणि रक्तदान शिबिरे यांसारखे सामाजिक उपक्रमही राबविण्यात येत आहेत.याशिवाय पैगंबर-ए-इस्लाम यांच्या न्याय, प्रेम, दया आणि मानवतेच्या संदेशाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने विविध शहरांमध्ये मोठे होर्डिंग्ज व बॅनर्स लावण्यात येत आहेत
हा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी अमजद अत्तारी,नजीब अत्तारी, सय्यद अनसार, जुनैद रजा,शेख अमान अत्तारी, जीशान सिद्दिकी, अरसलान खान, शेख आफताब, शेख, शेख कलीम, अब्दुल रहमान, शेख अयान, यांच्यासह GNRF स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

# विद्यार्थ्यांच्या आक्रमक आंदोलनाची दखल..! १४ ऑगस्टचा जीआर रद्द, नव्या निर्णयाची ग्वाही

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** विविध मागण्यांसाठी राज्यभर सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर मोठे यश मिळाले आहे. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेऊन १४ ऑगस्टचा वादग्रस्त शासन निर्णय रद्द करण्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत आवश्यक सुधारणांसह लवकरच नवीन शासन निर्णय जारी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



पुण्यात आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळासोबत सुमारे साडेतीन तास चर्चा करून डॉ. उईके यांनी त्यांच्या विविध मागण्या जाणून घेतल्या. यापूर्वी यवतमाळ २२ ऑगस्ट रोजी नागपूर व चंद्रपूर येथेही त्यांनी आंदोलकांशी चर्चा केली होती. दरम्यान, २६ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर १४ ऑगस्टचा जीआर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. शासकीय वसतिगृहांमध्ये दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि नवीन सुसज्ज वसतिगृहांचे बांधकाम वेगाने पूर्ण करण्यासही शासनाने मान्यता दिली आहे. तसेच जात प्रमाणपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्याची मागणी तत्त्वतः मान्य करण्यात आली आहे. डीबीटी योजना रद्द करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेतला जाईल, असे मंत्र्यांनी सांगितले. पेसा क्षेत्रातील १७ संवर्गांपैकी ९ संवर्गांची भरती सुरू असून उर्वरित संवर्गांबाबतही शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाच्या निर्णयामुळे आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, आता उर्वरित मागण्यांच्या अंमलबजावणीची प्रतीक्षा आहे.

# मुकुटबन मध्ये अकीदतीने निघाला जुलूस-ए-मोहम्मदी, अमन, एकतेचा संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**मुकुटबन, दि. २७ :** मिलाद-उन्नबीच्या पवित्र पर्वानिमित्त मुकुटबन येथे जुलूस-ए-मोहम्मदी उत्साहपूर्ण आणि भक्तिभावाच्या वातावरणात काढण्यात आला. नुरानी जामा मस्जिद परिसरातून सुरू झालेल्या या जुलूसातून शांतता, अमन, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला.



जुलूसने माता मंदिर, गादेवार चौक, ग्रामपंचायत मार्ग, बसस्थानक चौक आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केले. धार्मिक घोषणा देत मुस्लिम बांधवांनी उत्साह व्यक्त केला. जुलूसमध्ये युवकांसह ज्येष्ठ नागरिक आणि बालकांचीही मोठी उपस्थिती होती. नुरानी जामा मस्जिद कमिटीच्या वतीने उपसरपंच अनिल कुंटावार, माजी सरपंच शंकर लाकडे, हाजी इकबालभाई, बापूराव जित्रावार, सय्यद अजीज, सय्यद रफीकभाई, अब्दुल मजीद, सय्यद इब्राहिम, हाफिज इश्तियाक आलम, मौलाना हमीद आलम यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. उपसरपंच अनिल कुंटावार यांच्या निवासस्थानी जुलूसमधील सहभागींसाठी नाश्ता, चहा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या वतीनेही जुलूसचे स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी सामाजिक सलोखा, शांतता आणि बंधुभाव कायम राखण्याचे आवाहन केले. सायंकाळी नुरानी जामा मस्जिद कमिटीच्या वतीने लंगरचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ठाणेदार सतीश जाधव, पीएसआय सुदाम आसोरे यांच्यासह पोलीस कर्मचारी तैनात होते.

# शेतातील पराटी झाडे उपटून फेकल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २७ :** महागावः तालुक्यातील माळवाकद येथिल हनुमान मंदिराच्या शेत-शिवारातील मागील काही दिवसापासून कापूस पिकाची उभी झाडे अज्ञात व्यक्तीने उपटून फेकल्याचा प्रकार वारंवार समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मेहनतीने वाढवलेल्या कापूस पिकाचे नुकसान झाल्याने संबंधित शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्येही चिंता व्यक्त केली जात असून, अशा प्रकारे शेतीचे नुकसान करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी उपस्थित वसंत चव्हाण, नामदेव जाधव, योगेश कदम, विठ्ठल नांदे, लखन आगोसे,आकाश पवार, अर्जुन चव्हाण या शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. या घटनेचा शोध घेत महागांव पोलीस स्टेशनचे राजीव शर्मा, व फोपसे यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेताची पाहणी करून संशयित गुन्हेगारांना शिक्षा देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करू असे सांगितले . शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जनसामान्य जनतेतून होतांना दिसत आहे. गावातील जवळपास सर्वेच लोक शेतकरी असतांना आज कास्तकारांची अवस्था अतिशय बिकट असतांनी सुद्धा असे कृत्य घडत असेल तर हे अतिशय निंदनीय आहे असे मत लोकसेवक डॉ.गोपाल डि.राठोड यांनी मांडले.

# अवैध रेतीसाठ्यावर ‘कमी दंड’चा डाव? बोरेले यांची सीडीआरसह एसआयटी तपासाची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २७ :** आर्णी तालुक्यातील आयता-जालांद्री आणि झरी तालुक्यातील सतपल्ली परिसरात असल्याचा दावा करण्यात आलेल्या मोठ्या अवैध रेतीसाठ्याच्या प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे.



आरटीआय कार्यकर्ते तथा व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी या प्रकरणात रेतीसाठा कमी दाखवून शासनाचा आर्थिक दंड कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला आहे. बोरेले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव तसेच अमरावती विभागीय आयुक्तांकडे ९, १०, १५ व १६ ऑगस्ट रोजी तक्रारी दाखल केल्याचे सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, सुमारे २५ हजार ब्रास अवैध रेतीसाठ्याचे बाजारमूल्य तब्बल २२ कोटी रुपये असून, त्यावर केवळ सुमारे दोन कोटी रुपयांचा दंड दाखविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संशय आहे. या प्रकरणाची स्वतंत्र एसआयटीमार्फत चौकशी करून संपूर्ण रेतीसाठ्याची प्रत्यक्ष मोजणी करावी, तसेच संबंधितांवर नियमानुसार कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी बोरेले यांनी केली आहे. पुरावे नष्ट होऊ नयेत म्हणून रेतीसाठ्याच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणीही त्यांनी केली. दरम्यान, या प्रकरणात यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील काही राजकीय व्यक्तींचा सहभाग असल्याची चर्चा असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला असून, संबंधितांचे कॉल डिटेल रेकॉर्ड तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. २२ ऑगस्ट रोजी पुन्हा ‘आपले सरकार’ पोर्टलवर तक्रार दाखल करून तातडीने चौकशी व कारवाईची मागणी करण्यात आल्याचे बोरेले यांनी म्हटले आहे.

# मोर्शी शहरात ऑनलाइन जुगाराचा विळखा; तरुण कर्जबाजारी, पालक चिंतेत


**मोर्शी/वार्ताहर**

मोर्शी शहरात ऑनलाइन गेम आणि जुगाराच्या नावाखाली सुरू असलेल्या आर्थिक व्यवहारांमुळे १८ ते ३० वयोगटातील अनेक तरुण आर्थिक संकटात सापडत असल्याचे चित्र समोर येत आहे. स्मार्टफोनच्या वाढत्या वापरासोबत ऑनलाइन जुगाराच्या आहारी जाणाऱ्या काही तरुणांवर मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी होण्याची वेळ आली असून, त्याचा आर्थिक व मानसिक ताण त्यांच्या कुटुंबीयांनाही सहन करावा लागत आहे.

ऑनलाइन जुगारात सुरुवातीला थोडे पैसे लावून नफा मिळाल्यानंतर मोठ्या रकमा लावण्याचा मोह निर्माण होतो. झालेला तोटा भरून काढण्यासाठी पुन्हा पैसे लावले जातात आणि हळूहळू कर्जाचा डोंगर वाढत जातो. त्यामुळे अनेक तरुण या आर्थिक चक्रात अडकत असल्याची चिंता पालकांकडून व्यक्त होत आहे.

**३० टक्के व्याजाने कर्ज दिल्याचा आरोप**

ऑनलाइन जुगार खेळण्यासाठी काही तरुणांना खासगीरीत्या मोठ्या व्याजदराने पैसे उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती समोर येत आहे. काही पालकांच्या म्हणण्यानुसार, शहरात एका ऑनलाइन व्यवहाराशी संबंधित व्यक्तीकडून सुमारे ३० टक्के व्याजदराने कर्ज दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे. या कर्जाची वसुली करताना संबंधित तरुणांना तसेच



त्यांच्या नातेवाईकांना फोन करून पैशांसाठी तगादा लावला जात असल्याचेही पालकांचे म्हणणे आहे.या प्रकारामुळे तरुणांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, कर्ज देणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी पालकांकडून होत आहे. या प्रकरणाची संबंधित यंत्रणांनी सखोल चौकशी करून तथ्य समोर आणण्याची गरज आहे.

**अडीच लाखांच्या कर्जाने तरुण अडचणीत**

अलीकडेच एका तरुणावर सुमारे अडीच लाख रुपयांचे कर्ज झाल्याची माहिती समोर आली आहे. त्याने मोठ्या व्याजदराने पैसे घेतल्याचे कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. अशाच प्रकारे ऑनलाइन जुगाराच्या विळख्यात अडकलेले आणखी अनेक तरुण असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.कर्जदारांकडून पैशांसाठी तगादा सुरू झाल्यानंतर काही तरुण घराबाहेर पडणे टाळतात, कुटुंबीयांपासून आर्थिक व्यवहार लपवतात किंवा कर्ज देणाऱ्यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. मुलांच्या वर्तनात मोठा बदल झाल्यानंतरच अनेक पालकांना या प्रकाराची माहिती मिळत असल्याचे सांगितले जाते. काही कुटुंबांवर तर कर्ज फेडण्यासाठी मालमत्ता किंवा इतर आर्थिक साधने विकण्याची वेळ येत असल्याने पालकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे.

**पालकांनीही मोबाईल वापरावर लक्ष देण्याची गरज**

मुले मोबाईलमध्ये कोणते ऑनलाइन गेम, ॲप किंवा आर्थिक व्यवहार करतात, याकडे पालकांनीही लक्ष देण्याची गरज आहे. झटपट पैसा मिळविण्याच्या आमिषाला बळी न पडता तरुणांनी ऑनलाइन जुगारापासून दूर राहावे, असे आवाहन केले जात आहे.

**ऑनलाइन जुगारावर कठोर नियंत्रणाची मागणी**

ऑनलाइन जुगारामुळे युवा पिढी आर्थिक संकटात सापडत असल्याने संबंधित यंत्रणांनी अशा प्रकारांवर कठोर नजर ठेवून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे. ऑनलाइन जुगाराचे नेटवर्क, त्यासाठी होणारे आर्थिक व्यवहार आणि कर्ज देणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे.'तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त होण्यापूर्वी प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात,' अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त होत आहे.

## सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**



भातकुली तालुक्यातील साऊर येथे वैशाली सुरेंद्र ओलिवकर (वय ३४) यांचा सर्पदंशाने उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे ओलिवकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.मिळालेल्या प्राथमिक अहवालानुसार, वैशाली ओलिवकर या २५ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास शिवारात काम करीत असताना त्यांना सर्पदंश झाला. सर्पदंश झाल्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी अमरावती येथील इर्विन जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असताना २६ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे १ वाजता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद महसूल प्रशासनाकडे करण्यात आली असून, तलाठी/ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी याबाबतचा प्राथमिक अहवाल तहसीलदार कार्यालयाकडे सादर केला आहे.वैशाली ओलिवकर यांच्या पश्चात पती सुरेंद्र हरिचंद्र ओलिवकर (वय ३८), मुलगा आयुष (वय १०) आणि मुलगी वेदिका (वय ८) असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## नगरसेवक नील महेश्वरी यांनी तक्रारी मार्गी लावण्यासाठी सुरू केला व्हॉट्सप ग्रुप दुकानदार ,नागरिकांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

**अचलपूर/का.प्र.**



नगरसेवक नील महेश्वरी यांनी नवनवीन संकल्पनेतून सामान्य नागरिकांचे नगर परिषद प्रशासन संबंधित विविध समस्या तत्काळ मार्गी लावण्यासाठी देवडी लाईन या शीर्षकांचे व्हॉट्सॲप ग्रुप सुरू केले आहे.यांमुळे या ग्रुप वर नागरिक,दुकानदार देवडी,सराफा लाइन परिसरातील घाणीचे साम्राज्य,रस्त्याची दुरावस्था,बंद स्ट्रीट लाईट,पाणीटंचाई आदी समस्या दैनंदिन फोटो सह मांडतात .यानंतर याची तत्काळ दखल घेत अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी हे अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडे याचा पाठपुरावा करून या समस्या मार्गी लावत असल्याचे चित्र आहे. यामध्ये अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांच्या या अभिनव संकल्पनेतून सामान्य नागरिक ,दुकानदाराचे प्रश्न निकाली लागत असून नील महेश्वरी यांचे या संकल्पनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जिल्ह्याचा शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर

### शाळांमध्ये 'फायर सेफ्टी'साठी १० सप्टेंबरची डेडलाईन

**अमरावती/सुधीर केने**

शाळांमधील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा परिषद अमरावती येथील प्राथमिक व माध्यमिकशिक्षण विभागाने एक महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अग्निसुरक्षा उपाययोजना आणि उपकरणे बसवणे तसेच ती अद्ययावत ठेवणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे काटेकोर पालन करून येत्या १० सप्टेंबर २०२६ पूर्वी आपल्या स्तरावरील अहवाल कार्यालयास सादर करण्याचे आदेश मुख्यध्यापकांना देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेतील सूचनेनुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे.



शाळांमध्ये संभाव्य आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.शाळेच्या प्रत्येक मजल्यावर, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक कक्ष आणि माध्यान्ह भोजन स्वयंपाकघरात चालू स्थितीतील अग्निशामक यंत्रे लावणे आवश्यक आहे. सर्व अग्निशामक उपकरणांची मुदत तपासून त्यांची दरमहा देखभाल व रिफिलिंग सुनिश्चित करावी.शाळेतील जिने, मुख्य द्वार आणि आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग नेहमी मोकळे ठेवावेत. तिथे कोणत्याही प्रकारचे साहित्य साठवून ठेवू नये. असेही आदेशात म्हटले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत प्रसंगावधान राखून सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी वर्षातून किमान दोनदा विद्यार्थी व शिक्षकांसाठी मॉक ड्रिल आयोजित करावी.शाळेतील सर्व वायरिंग, मेन स्विचेस व विद्युत उपकरणांची अधिकृत इलेक्ट्रीशियनकडून तपासणी करून घ्यावी, जेणेकरून शॉर्ट सर्किटमुळे होणारा धोका टाळता येईल. असेही आदेश देण्यात आले आहेत.

**माहिती फलक बंधनकारक**

शाळेच्या प्रमुख ठिकाणी अग्निशामक दल (१०१), रुग्णवाहिका (१०२) व स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे फोन नंबर स्पष्ट दिसतील असे फलक लावावेत.सदर आदेशांचे सर्व शाळांवर योग्य पालन होत आहे की नाही, याची शहानिशा करण्याची जबाबदारी स्थानिक गटशिक्षणाधिकारी व शिक्षण अधिकारी (म.न.पा. अमरावती) यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

**प्रिया देशमुख**
शिक्षण अधिकारी माध्यमिक
अमरावती

## प्रगती कल्पेकर ठरली 'कौन बनेगा करोडपती' ची यशस्वी स्पर्धक

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयात लिपिक-नि-टंकलेखक पदावर कार्यरत कु. प्रगती दिनेश कल्पेकर हीने सोनी टिव्हीवरील 'कौन बनेगा करोडपती' या बहुचर्चित, सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धात्मक कार्यक्रमात विविध काठिण्यपातळ्या पार करीत प्रवेशित होऊन बिगबी श्री अमिताभ बच्चन यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत तीन फे-या पूर्ण करून ५ लाखांचे मोठे बक्षिस पटकावले आहे. वाचन, मनन आणि स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाचा छंद जोपासलेल्या प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



प्रारंभी प्राथमिक प्रवेश फेरीत विविध कठीण चाचण्या व संगणकाद्वारे Randomly निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये प्रगती हीने मारलेली धडक अत्यंत कौतुकास्पद व लक्षवेधी ठरली. त्यानंतर केबीसीच्या चमूकडून संपर्क साधून तिला स्पर्धेसाठी बोलावले गेले. मागील आठवड्यात ही स्पर्धा खेळली गेली. प्रथम 'फास्टेस्ट बझर फर्स्ट'या चाळणी पद्धतीमध्ये केवळ काही मिलीसेकंदांचा फरकही कोणाची निवड होणार हे ठरवू शकतो.त्यामुळे अंतिम निकाल हा केवळ ज्ञानावर नव्हे, तर वेळेचे अचूक भान, क्षणातील प्रतिक्रिया आणि काही प्रमाणात नशिबावरही अवलंबून असतो. यातही ती अव्वल ठरली व बिगबीच्या समोरील 'हॉटसीट'ची ती मानकरी ठरली.प्रगतीच्या 'कौन बनेगा करोडपती' या स्पर्धेच्या चित्रीकरणाचे एपिसोड गुरुवार २७ ऑगस्ट आणि शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता सोनी टीव्हीवर दोन भागात प्रसारित होणार आहेत. अमरावतीकर आपण सर्वांनी एपिसोड नक्की पाहावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

## शिक्षणासाठी ३४ हजार कोटींची गुंतवणूक केली असती तर शाळा डिजिटल झाल्या असत्या-प्रा.डॉ.प्रशांत विघे

**अमरावती/का.प्र.**

'नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध यंत्रणांच्या माध्यमातून सुमारे ३४,७३२ कोटी रुपयांचा विकास आराखडा आखला आहे. रस्ते, पूल, सार्वजनिक वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता आदी पायाभूत सुविधांसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. साधुग्रामसाठी जमीन अधिग्रहणाकरिता २,२६७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याच प्रमाणात निधी महाराष्ट्रातील शाळा डिजिटल करण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिला असता, तर राज्यातील शिक्षणव्यवस्थेत मोठा गुणात्मक बदल घडवून आणता आला असता,' असे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी केले.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६च्या अनुषंगाने दर्यापूर शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक



व प्राचार्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.डॉ. विघे यांनी जे. डी. पाटील महाविद्यालय, आदर्श विद्यालय, प्रबोधन विद्यालय, रत्नाबाई राठी विद्यालय, मौलाना अब्दुल कलाम आझाद नगरपरिषद उर्दू हायस्कूल आदी संस्थांना भेटी दिल्या. यावेळी प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतच्या समस्या, डिजिटल सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालये, शिक्षकांच्या रिक्त जागा, शिक्षक प्रशिक्षण, सेवा-संबंधित प्रश्न, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि जुनी पेन्शन योजना यावर चर्चा झाली.

शिक्षकांच्या प्रश्नांना सभागृहात प्रभावीपणे मांडण्यासाठी सक्षम लोकप्रतिनिधित्व आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी प्राचार्य ज्ञानेश्वर यावले, डॉ. दीपक राऊत, डॉ. राहुल सावरकर, मयूर देवहाते, तसेच प्राचार्य गोंडाणे, प्राचार्य मुळे, नवले सर, प्राचार्य मनोज देशमुख, प्राचार्य अतुल बोडखे, अहमद सर आणि विविध शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.'शिक्षणावरील गुंतवणूक हा खर्च नसून भविष्यातील पिढीच्या निर्मितीसाठीची गुंतवणूक आहे. शिक्षणव्यवस्थेला निधी आणि शिक्षकांना सक्षम प्रतिनिधित्व मिळणे ही काळाची गरज आहे,' असे आवाहन डॉ. विघे यांनी केले.

## संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची सभा

**अमरावती/का.प्र.**

संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था अमरावतीची वार्षीक सर्वसाधारण सभा पतसंस्थंचे अध्यक्ष राजेंद्र टेंबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेला संस्थेचे पदाधिकारी व संचालक संजय देशपांडे, राम वाजपे, हेमंत पांडे, रविंद्र खोलकुटे, कार्यलक्षी संचालक शुभदा पणजकर यांची उपस्थिती होती. सभेमध्ये विषय सुचिनुसार चर्चा करण्यात येऊन प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात आला. संचालन शुभदा पणजकर यांनी केले तर आभार प्रदर्शन राम वाजपे यांनी केल्यानंतर सभेची सांगता झाली.

सभेत पतसंस्थेतील कार्यकाळात होणा-या संपुर्ण सभांचा आढावा घेण्यात आला. तसेच विविध प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. यावेळी सभेला रामेश्वर विधळे, संजय देशपांडे, भावना जोशी, अल्का दलाल, विलास पेठकर, सचिन मुळे आदि मान्यवर उपस्थित होते.


### भाजप महाराष्ट्र प्रदेशाकडून

## अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांच्या अध्यक्षतेखाली कोअर कमिटी स्थापन

**अमरावती/का.प्र.**

भारतीय जनता पार्टीमध्ये संघटनेला अनन्यसाधारण महत्त्व असून, पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने व अनेक महत्त्वपूर्ण विषयांच्या अंमलबजावणी च्या अनुषंगाने भाजपा महाराष्ट्र प्रदेशाकडून अमरावती शहर जिल्हा कोअर कमिटीची घोषणा करण्यात आली

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार प्रदेश महामंत्री मा. संजयजी कुटे यांच्या स्वाक्षरीने अमरावती शहर जिल्हा कोअर कमिटीचे गठन करण्यात आले आहे. भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या अध्यक्षतेखाली ही कोअर कमिटी भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक रचना ही पक्षाच्या कार्यपद्धतीचा केंद्रबिंदू असून, बूथपासून जिल्हास्तरापर्यंत संघटना अधिक सक्षम, गतिमान आणि प्रभावी करण्यावर पक्षाचा सातत्याने भर देत आगामी काळात पक्षाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध संघटनात्मक कार्यक्रम, अभियान तसेच जनसंपर्काच्या उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कोअर कमिटीच्या माध्यमातून पार पाडली जाणार आहे.अमरावती शहरातील प्रत्येक भागात भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद अधिक वाढविणे, नवीन कार्यकर्त्यांना पक्षाच्या विचारधारेशी जोडणे, विद्यमान कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि पक्षाची संघटनात्मक यंत्रणा अधिक सक्षम करणे यासाठी कोअर कमिटीच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात येणार आहे.शहरातील प्रत्येक बूथ, शक्तिकेंद्र आणि मंडळ पातळीवर संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि विकासाच्या प्रश्नांवर प्रभावीपणे



काम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

केंद्र सरकार तसेच महाराष्ट्र राज्य सरकारच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती अमरावती शहरातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविणे आणि पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे, यावर विशेष भर दिला जाणार आहे.सरकारच्या योजना केवळ कागदावर न राहता त्याचा प्रत्यक्ष लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने भाजपा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनजागृती व जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार आहे.

भाजपा महाराष्ट्र प्रदेश तसेच केंद्रीय नेतृत्वाकडून आगामी काळात जाहीर करण्यात येणारे सर्व संघटनात्मक कार्यक्रम, अभियान, जनसंपर्क उपक्रम आणि विविध सामाजिक कार्यक्रम अमरावती शहर जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी कोअर कमिटीच्या माध्यमातून नियोजन करण्यात येणार आहे.पक्षाचे विचार, केंद्र व राज्य सरकारची विकासकामे आणि जनकल्याणकारी योजनांची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन व्यापक जनसंपर्क अभियान उभारण्यात यानिमित्ताने अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांनी कोअर कमिटीच्या सर्व नियुक्त पदाधिकाऱ्यांन तर्फे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रवींद्रजी चव्हाण,जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, प्रदेश महामंत्री मा. संजयजी कुटे व पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त केले आहे.

## संक्षिप्त

### टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधन

**अंजनगाव बारी-**स्थानिक विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधन सण शालेय परिपाठादरम्यान उत्साहात व पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला.



विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव, प्रेम, परस्पर आदर आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी आपल्या वर्गमित्रांसह शालेय परिसरातील कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. विद्यार्थ्यांनीही आपल्या बहिणींचे सदैव रक्षण करण्याचे वचन दिले.प्राचार्य अजय चौबे यांनी रक्षाबंधन हा केवळ धागा बांधण्याचा सण नसून परस्परांचा आदर करणे आणि समाजातील प्रत्येकाचे रक्षण करणे हा त्यामागील खरा संदेश असल्याचे सांगितले.उपक्रमात शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र अनिवार्य

**अमरावती-**संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी अर्थात हयात प्रमाणपत्र (डिएलसी) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अमरावती तहसील कार्यालयाने १८ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विशेष शिबिर आयोजित केले आहे. सर्व लाभार्थ्यांना विना विलंब हयात प्रमाणपत्र काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक लाभार्थ्याने बेनिफीशरी सत्यापन ॲपच्या माध्यमातून हयात डिजीटल लाईफ सर्टिफीकेट (डिएलसी) काढून आपण हयात असल्याचे प्रमाणित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र सादर केल्यास संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांचा शासकीय लाभ सुरु राहील. या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी अमरावती शहर संजय गांधी तहसील कार्यालयामार्फत विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सर्व लाभार्थ्यांनी विना विलंब हे प्रमाणपत्र काढावे असे तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### पर्यावरणपूरक राख्यांनी सजले शाळेचे रक्षाबंधन

**चांदूर रेल्वे-**श्री. बेंडोजी बाबा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, एमसीव्हीसी येथे पर्यावरणपूरक रक्षाबंधन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक राख्या तयार केल्या. या राख्यांचे शाळेत प्रदर्शन आयोजित करण्यात आले.राखी प्रदर्शनातून माध्यमिक व प्राथमिक गटातून प्रत्येकी तीन उत्कृष्ट राख्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व सांगत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान शाळेचे मुख्याध्यापक सुमंत अंबुलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पाटील व निमजे यांनी पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांकडून पर्यावरण प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा पर्यावरणपूरक रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



### भारतीय महाविद्यालयातर्फे पर्यावरणपूरक रक्षाबंधन साजर

**मोर्शी-**भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय,मोर्शी येथे अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने नैसर्गिक संसाधनांपासून पर्यावरणपूरक राखी तयार करण्याची कार्यशाळा व राखी प्रदर्शनी, स्पर्धा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष व्ही. आगरकर तर प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप खोडस्कर,महादेव नवघरे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी पर्यावरण पूरक राखी स्टॉप ला भेटी देऊन विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वनस्पतीच्या फुले व पानांपासून बनविलेल्या राखी चे कौतुक केले. कृत्रिम रंग, रसायने व प्लास्टिक याचा मानवासोबतच सृजल सृष्टीवर दुष्परिणाम होत आहे ही अतिशय गंभीर गोष्ट असून ते टाळण्यासाठी व्यक्तिगत व संस्था स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर यांनी सांगितले.कार्यक्रमास डॉ. आर. जी. बांबोळे, डॉ. दीपक काळे, डॉ. एल.आर. टेंभुर्णे, डॉ. संदीप राऊत, डॉ. भगवान साबळे, डॉ. अरविंद पाझारे,प्रा. गोपाल भलावी, प्रा. अक्षय बावणे, प्रा. मृंणाक काळमेघ, प्रा. तट्टे,प्रा. वैशाली पळसापुरे, प्रा. शुभांगी खाटगडे, प्रा. सुरेंद्र पांडे, प्रा. विजय बोरवार, रुपेश मेश्राम तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेपाळच्या महाप्रलयाचा इशारा

हिमालयीन पर्वत रांगेत असलेल्या नेपाळमध्ये बुधवारची पहाट निसर्गाचा मोठा प्रकोप घेऊन उजाडली.मूळ तिबेट मधून उगम पावणाऱ्या व नेपाळ च्या डोंगराळ भागातील रसुवा जिल्ह्यातून प्रवाही असलेल्या भोटे काशी व त्रिशूला नदीला आलेल्या महाप्रलयकारी पुराने मोठा हाहा:कार माजला आहे.कुठलीही नैसर्गिक आपत्ती होण्याची हवामान विभागाचे संकेत नसताना अचानक महाप्रलय झाला. या प्रलयाचा सर्वाधिक फटका नेपाळला बसला आहे.नेपाळची राजधानी काठमांडू शहरापासून, उत्तर-पूर्व डोंगराळ भाग वसलेल्या रसूवा जिल्ह्यात महाप्रलयकारी पुरामुळे रस्ते,पूल, नागरी वस्त्या, सरकारी मालमत्ता,हायड्रो पॉवरप्लांट मोठ्या संख्येने प्रभावीत झाले. या घटनेत जीवित, प्राणहानी तर करोडो रुपयांची मालमत्ता पुरात वाहून गेली.

नेपाळच्या नैसर्गिक आपत्तीचा फटका केवळ, हा नेपाळ पुरता मर्यादित नसून भारतातील बिहार राज्यातून वाहणाऱ्या गंडक नदीला बसण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.मूळ तिबेट मधून उगम पावणारी ही नदी नेपाळच्या भोटे काशी-त्रिशुला-तर बिहार राज्यातील नारायणी- गडंक- गंगा नदीमार्गे भारतात वाहत येते.या पुराच्या



पाण्याचा प्रवाह असामान्य असून त्याचा थेट फटका भारतालाही बसू शकतो. म्हणून बिहारच्या सहा जिल्ह्यांना अति दक्षतेचा इशारा दिला असून,बचाव पथके तैनात ठेवण्यात आली आहे.तर लोकांना स्थलांतरित करण्याची स्थानिक प्रशासनाची तयारी दिसून येत आहे.काही मिनिटातच झालेल्या हा हा:काराचा शोध शोध घेण्याचा प्रयत्न सुरू असून युद्ध पातळीवर सुरू आहे. वृत्तसंस्थेच्या बातमीनुसार, १६० हून अधिक नागरिकांचा विनाशकारी प्रलयात मृत्यू झाला आहे. हजारांहून अधिक संख्येने नागरिक बेपत्ता झाल्याचे सांगितले जाते. अचानक आलेल्या पुरामुळे



पाणी, चिखल नागरी वस्त्यां रस्ते, पूल,वीज उत्पादन केंद्र, बँकिंग,टेलिकॉम नेटवर्किंग उध्वस्त झाले असून ४३१ मेगावॅट वीज उत्पादन निर्मिती करणाऱ्या केंद्राला मोठा फटका बसला आहे. रस्ते उध्वस्त झाल्यामुळे अनेकांशी संपर्क तुटला आहे. या दरम्यान बचाव, मदत कार्य जोमात सुरू असून,भारत सरकारने मानवी दृष्टिकोनातून मदतीचा हात पुढे केलेला दिसतो. नेपाळच्या पर्यटन मंत्रालयानुसार, कैलास मानसरोवर यात्रेवर गेलेल्या भारतीय यात्रेकरूं मोठ्या संख्येने बेपत्ता आहे. अमेरिका, नेदरलँड, ऑस्ट्रेलिया,युके, मलेशिया, पोर्तुगाल, दक्षिण आफ्रिका व दक्षिण कोरिया या देशातील ही पर्यटक या प्रलयात बेपत्ता झाल्याचे सांगितले जाते.

या घटनेची मीमांसा घेत अमेरिकेच्या युएसजीएसच्या माहितीनुसार, बुधवारी पहाटे तिकीटच्या परिसरात ४.४ रिक्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला. भूकंपामुळे ग्लेशियर फुटले. या संपूर्ण परिसरात ग्लेशियर मोठ्या प्रमाणात आहेत. ग्लेशियर फुटल्यामुळे मोठा पाण्याचा प्रवाह डोंगराळ भागातून नदी मार्गे पुढे सरकत गेला. परिणामी महाप्रलय झाल्याचे सांगितले जाते.

अर्थात या महाप्रलयाचे मूळ शोधणे व स्पष्ट कारणे शोधण्यास अवधी लागेल. परंतु या घटनेतून एक चित्र स्पष्ट होते की, हिमालय पर्वतरांगाचे नैसर्गिक संतुलन बिघडत चालले आहे. व त्याचे दुर्दैवी परिणाम मानवाला भोगावे लागत आहे. हल्ली हिमालयीन मैदानी प्रदेश धोरणात्मक विकासाच्या प्रयोगशाळा झाल्या आहे. जिथे प्रशस्त रस्ता मार्ग, शेकडों वर्षे जुनी झाडे तोडून, मोठे डोंगर फोडून पर्यटन हवे आहे. प्रश्न विकासाचा नव्हे; तर प्रश्न आहे की हिमालयाचे नैसर्गिक सौंदर्य आणि क्षमतेचा विचार करून विकास होतो आहे काय?हवामान बदलामुळे ही विकास कामे आव्हानात्मक धोकादायक ठरू पाहत आहे.

सध्या भारतासह संपूर्ण जग तापमानवाढीचे संकट झेलत आहे.त्यात भारतातील हिमालयीन पर्वतरांगा सुरक्षित राहिल्या नाही.तापमान वाढीमुळे ग्लेशियर पिघळल्याच्या घटना नवीन नाहीत.उंच डोंगरावर बर्फ व मलब्याने घडलेली नैसर्गिक सरोवरे पसरत जात आहे. त्यामुळे ही सरोवरे कमजोर होउन फुटण्याचा धोका अधिक असतो.मग नेपाळ सारख्या महाप्रलयाच्या घटना चिंतन करण्यास भाग पाडते.ऐरव्ही शांत व संथ वाहणाऱ्या नद्या अचानक उग्ररूप कधी घेतील त्याची शाश्वती तूर्तास राहीली नाही.नेपाळचा प्रलय हा नैसर्गिक घटना नाहीच, तर हिमालयीन पर्वतरांगाचा क्रोध मानायला हवा.निसर्ग मानवी चुकांचा परिणाम आता दाखवत आहे.जो देश सीमा ओलांडून अमर्याद विनाश घडू शकतो.हेच नेपाळच्या प्रलयातून संकेत मिळतात. हिमालयीन पर्वतरांगाचे संरक्षण केवळ पर्यावरणापुरते मर्यादित नसून, जल, वायू, भूमी, अन्न, ऊर्जा सुरक्षा व करोडो लोकांच्या जीवितांचा प्रश्न ठरतो.आगामी काळात विकासाच्या नावाखाली हिमालयीन पर्वतरांगा कमकुवत झाल्या वर नद्या उग्ररूप घेतील.पठारी भागात प्रलय होईल.जमिनी खरडून जाईलच. नेमका हाच नेपाळ प्रलयाचा सांगावा आहे की, विकास आणि पर्यावरणा दरम्यान संतुलन असायला हवे?याचा विचार कधी होईल.पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश हे पंचतत्व मानवी जीवांचा अर्थात सृष्टीचा मूळाधार आहे.तो अबाधित राहिला, तर भविष्य सुरक्षित राहील.

**शशिकांत तोटे**
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# स्नेह व उत्सवाचे पर्व - रक्षाबंधन

आपल्या भारतीय संस्कृतीत प्रमुख सणांमध्ये रक्षाबंधन हा सण भाऊ-बहिणींच्या स्नेह व उत्सवाचे पर्व म्हणून साजरा केला जातो. पश्चिम भारतात नारळी पौर्णिमा या नावाने हा सण साजरा केला जातो. तो श्रावण पौर्णिमेला साजरा करतात. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख मिळण्यासाठी प्रार्थना करते. पुरातन काळात जेव्हा स्त्रीला स्वतःला असुरक्षित आहे असे वाटायचे तेव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानायची की जी तिची रक्षा करेल. या सणाचे पौराणिक दाखले आहेत. ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमाँयू बादशहाला राखी पाठवली व हुमाँयू बादशहाने पण आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले. रक्षा बंधनाच्या सणातून स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी बंगाल विभाजनानंतर हिंदू व मुस्लिम यांच्यात सलोखा निर्माण करण्यासाठी दोन्ही समुदायांना एकमेकांच्या हातावर रक्षासूत्र बांधण्याची विनंती केली होती. स्त्री कितीही मोठी, मिळवती झाली तरी तिच्या रक्षणाची जबाबदारी ही तिच्या भावावर आहे हेच यातून स्पष्ट होते. यात तिचा दुबळेपणा नसून भावाच्या कर्तव्या वरचा विश्वास दिसून येतो.



रक्ताचे नाते असणारे भाऊ-बहीण किंवा मानलेले असो, पण या नाट्य मागची भावना पवित्र व खरी असते. यात कुठेही फसवणूक नाही. त्या नात्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे राखी राखी पौर्णिमा. भाऊ व बहिणीचे नाते रेशमी धाग्यासारखे नाजूक असते. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधते व भाऊ तिला प्रेमाची भेटवस्तू देतो. स्त्री वयाच्या कुठल्याही उंबरठ्यावर पोहोचलेली असेल रक्षाबंधनाच्या या उत्सवास तिला तिच्या माहेरची आस लागलेली असते. बहीण-भाऊ एकमेकांचे प्रेरणास्त्रोत असतात. आपली बहीण सुखात राहावी अशी प्रत्येक भावाची मनोकामना असते. रक्षाबंधन या दिवशी भावाच्या हाताला राखी बांधण्यामागे भावाचा उत्कर्ष व्हावा व भावाने बहिणीचे संरक्षण करावे ही भूमिका असते. रक्षाबंधन हा मने जुळणारा उत्सव आहे. रक्षाबंधन हा उत्सव साजरा करण्यामागे असा संदेश आहे की, स्त्रीकडे विकृत दृष्टीने न पाहता तिच्या प्रति पवित्र ठेवा आपण या सणाला आपल्या कुटुंबापुरतेच मर्यादित ठेवणे योग्य नाही. रक्षाबंधन म्हणजे बहीण भावाच्या शुद्ध प्रेमाचा प्रेरक, पोषक पूरक आहेत हा संदेश देणारा हा उत्सव म्हणजे भारतीय संस्कृतीची अमूल्य देण आहे.

**प्रा. मधुकर चुटे,**
नागपूर
मो.९४२०५६६४०४



# तेच खरे रक्षाबंधन !

रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. त्रेतायुगापासून सुरु असलेल्या या प्रथेला बंधू भगिनीतील प्रेमाची झालर आहे. काळ बदलला तशी स्त्री अधिकाधिक असुरक्षित होत गेली आहे. आज स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना प्रतिदिन आपल्याला वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. गेल्या दहा वर्षांत स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. कोणत्याही स्त्रीवर प्रतिकूल प्रसंग कधी ओढवेल, ही वेळ सांगून येत नाही. अशा प्रत्येक कठीण प्रसंगी आपला भाऊ आपले रक्षण करण्याकरिता धावून येईलच असे नाही. यासाठी प्रत्येक स्त्रीने प्रतिकूल प्रसंगात आपले रक्षण कसे करावे, याचे सामान्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे. स्व संरक्षण प्रशिक्षणाने केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक बळही वाढते. आजची स्त्री भौतिकदृष्ट्या उत्तुंग शिखरे पादाक्रांत करत आहे; मात्र समाजाची ढासळलेली नीतिमत्ता तिचे खच्चीकरण करू पाहत आहे. अशा समाजाला तोंड देण्यासाठी मन आणि शरीर सामर्थ्यवान करण्याची आज नितांत गरज आहे, रक्षाबंधनाच्या दिवशी जेव्हा प्रत्येक स्त्री आपल्या भावाला अभिमानाने सांगेल, कि माझे रक्षण मी स्वतः करू शकते, ते रक्षाबंधन खरे रक्षाबंधन असेल.

**मोक्षदा घाणेकर**

## निर्भयाचे आवाहन..!

रक्षाबंधनाच्या पवित्र दिनी
अभागी निर्भया करते आहे

भगीनींना विणवणी-
परस्त्री असते मातेसमानची

भावाला द्यावी शिकवणी..
भाऊराया असतो ना

आपला जिव की प्राण
कुविचारांनी होते

जीवनाची धुळधाण
म्हणून प्रबोधन करणे

तुझे कर्तव्य जाण ..!
करू नये विनयभंग

अथवा अपहरण
कुटूंबाला लागते ग्रहण
तुरुंगात जाई व्यर्थ जीवन ..!




**प्रा.अशोक सारडा**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# अमृत वाणी संस्कृत

अमृत वाणी संस्कृत ही केवळ पूजेची भाषा नसून आधुनिक विज्ञानाचा आणि मानवी मुल्याचा पाया असणारी सर्वात प्राचीन भाषा आहे.(ज्ञानं परमं बलम् संस्कृत भाषेला भृगुऋषीनी देववाणी मानले आहे) संस्कृत दिवस दरवर्षी श्रावण पौर्णिमेला( रक्षाबंधनाच्या दिवशी ) साजरा केला जातो. प्राचीन काळी या दिवशी गुरुकुलामध्ये उपाकर्म विधी करून नवीन शैक्षणिक सत्राची, वेदाध्यानाची सुरवात होत असे.संस्कृत भाषेला अनेक भाषांची जननी मानली जाते. उदा. मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली या भाषांच्या उत्पतीचे मूळ संस्कृत भाषा आहे. संस्कृत भाषेत विपुल शब्द संपदा आहे. जल, सूर्य, गृह, हस्त हे शब्द संस्कृत भाषेतूनच आले आहे.

नासा च्या संशोधनानुसार संस्कृत ही व्याकरण दृष्ट्या सर्वात स्पष्ट आणि अचूक भाषा आहे. संगणकाच्या अल्गोरिदमसाठी ही भाषा सर्वोत्तम मानली जाते. वेद, उपनिषदे, भगवद्गीता, रामायण, आणि महाभारता सारखे महाकाव्य संस्कृत मध्ये आहे. याशिवाय आयुर्वेद, अर्थशास्त्र, खगोलशास्त्र आणि गणित, या विषयांचे मूळ ज्ञान संस्कृत मध्येच आहे. संस्कृत श्लोकांच्या स्पष्ट उच्चारा मुळे जिभेला आणि मेंदुला चालना मिळून एकाग्रता वाढते आणि ताणतणाव कमी होण्यास साहाय्य होते. आजच्या अर्वाचीन युगात गैरसमजुती मुळे संस्कृत भाषेकडे पूजा किंवा कर्मकांडाची भाषा म्हणून पाहिले जाते. हा गैरसमज दूर होणं आवश्यक आहे. या समृद्ध परंतु दुर्लक्षित भाषेचा प्रचार प्रसार करण्यासाठी 'संस्कृत भारती' सारख्या संस्था कार्यरत आहे. तरुण पिढी डिजिटल माध्यमाद्वारे भाषा शिकत आहे. संस्कृत भाषा मृत भाषा नसून ती भारतीय संस्कृतीच्या रुपात आजही जिवंत आहे.

श्रावण पौर्णिमा हा दिवस ऋषींच्या पूजनाचा व समर्पणाचा दिवस मानला जातो. संस्कृत साहित्याची निर्मिती ऋषीनी केली आहे.संस्कृत भाषेला पुनज्जिवीत करण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी संस्कृत दिवस साजरा केला जातो. संस्कृत भाषा शिकण्यासाठी व महत्व जाणून घेण्यासाठी या दिवशी सांगितले जाते.उत्तराखंड राज्यात संस्कृत भाषेला दुसरी अधिकृत भाषा घोषित केले आहे.? संस्कृत भाषेत सुमारे १०२ अब्ज ७८ कोटी ५ दशलक्ष एवढा समृद्ध




शब्द साठा आहे. संस्कृत भाषेची मुळे इ.सन. पूर्व २००० पर्यंत जातात. या भाषेचा उगम ३५०० वर्षांपूर्वी झाला, असे सांगितले जाते. अजूनही संस्कृत भाषेतील व्याकरणात कांहीही पालट झालेला नाही,कारण ही भाषा परिपूर्ण आहे. ही भाषा देववाणी समृद्ध अमृत भाषा म्हणून मानली जाते.

**भार्गवी क्षीरसागर**

# 'संस्कृत दिन'

इंग्रजी भाषा मनामध्ये एक प्रकारचा प्रचंड हव्यास निर्माण करते तर संस्कृत भाषा ही देववाणी आहे आणि ती माणसावर संस्कार करते. युगानुयुगे संस्कृत व्याकरण तेच आहे. त्याच्यात कोणीच काहीच बदल केलेला नाही याचे कारण ते पहिले पासूनच परिपूर्ण आहे.याउलट जगातील सर्व भाषांतील व्याकरण बदलत असते.अशा या संस्कृत भाषेला काँग्रेसने 'मृत भाषा' ठरवले तर आत्ताचे सरकार संस्कृतावर जणू अंत्यसंस्कार करायला निघाले आहे.जगातील सर्वात प्राचीन भाषेचे पाईक असल्याचा जराही अभिमान नसलेले आणि 'पिकते तिथे विकत नाही'ही म्हण खरी ठरवणारे सरकार आहे.

राजभाषा म्हणून महाराष्ट्रात मराठीचे संवर्धन आणि गौरव यासाठी अधिकाधिक निधी देणे अपेक्षितच आहे परंतु अन्य भाषांच्या संवर्धनासाठी देण्यात येणारा निधी भाषेच्या दर्जेदारपणावरून दिला जातो का?की मतांच्या बेरजेवरून असा प्रश्न संस्कृत भाषेसाठी दिल्या जाणाऱ्या तुटपुंज्या निधीवरून निर्माण होत आहे.मागील काही वर्षात उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीला कोट्यावधीचा रुपयांचा निधी दिला गेला तर दुसरीकडे संस्कृतच्या पुरस्कारांची मात्र दोन लाखांमध्ये बोलवण करण्यात आल्याचे उघड आले झाले आहे.उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी ला वर्ष २०२३- २४ मध्ये १ कोटी ३१ लाख, तर वर्ष २०२४- २६ या दोन वर्षांच्या कालावधीत प्रत्येक वर्षी २ कोटी इतका निधी दिला गेला.उर्दू भाषेसाठीच्या निधीत प्रतिवर्षी वाढ होत आहे,तर संस्कृत भाषेसाठी वर्ष २०१३ पासून चालू करण्यात आलेल्या पुरस्कारांमध्ये अद्याप एकही रुपयाची वाढ करण्यात आलेली नाही.पुरस्कारासाठी घोषित केलेल्या निधी मिळवण्यासाठी 'कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाला'पाठपुरावा करावा लागत आहे ही खेदाची गोष्ट आहे.संस्कृत पंडित, वेदमूर्ती, संस्कृत शिक्षक, प्राध्यापक, अध्यापक आदी आठ जणांना 'महाकवी संस्कृत साधना पुरस्काराच्या' अंतर्गत प्रत्येकी २५ हजार रुपये दिले जातात.'ज्ञानज्योति सावित्रीबाई पुरस्कारासाठी'राज्यातील सहा महसूल विभागातून प्रत्येकी एका महिलेची निवड करून प्रत्येक पुरस्कारासाठी २५ हजार रुपये दिले जातात. या दोन्ही पुरस्कारांच्या रकमेत प्रत्येकी एक लाख रुपये अशी वाढ करण्यात यावी यासाठी दोन्ही पुरस्कारांचे प्रस्ताव वर्ष २०२५ मध्ये अर्थ विभागाकडे सादर करण्यात आले होते. अर्थ विभागाने 'ज्ञानज्योती सावित्रीबाई'पुरस्काराची रक्कम वाढवली मात्र 'महाकवी कालिदास संस्कृत साधना'पुरस्काराच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव अमान्य केला.हा प्रस्ताव अमान्य करताना संस्कृतच्या पुरस्कारांचा निधी वाढवला तर अन्य भाषेच्या पुरस्कारांसाठी ही निधी वाढवावा लागेल हे कारण सांगण्यात आले. असे जर असेल तर राजभाषा मराठी च्या खालोखाल केवळ उर्दू भाषेसाठी एवढ्या प्रमाणात निधी का दिला जातो?अर्थ खात्याने लाल शेरा मारूनही 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'सारख्या योजनांना मोठ्या प्रमाणात निधी जात दिला जात आहे तर संस्कृत साठी थोडाफार निधी द्यायला सरकार आखडता हात का घेत आहे हा प्रश्न निर्माण होत आहे.

उर्दू आणि संस्कृत भाषांसाठीच्या योजना आणि निधी चा विचार केला तर उर्दूला विविध पुरस्कारांसाठी आणि कार्यक्रमासाठी ८० लाख रुपये दिले जातात त्याच वेळेला संस्कृत भाषा साधना पुरस्कार आणि इतर पारितोषिक देण्यासाठी मात्र २लाख ६हजार रुपये एवढे दिले जातात.उर्दू भाषेसाठीचा निधी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीला दिला जातो. याव्यतिरिक्त राज्यातील चार उर्दू घरांसाठी वेगळा निधी जातो.पारितोषिक प्रदान समारंभाच्या आयोजनासाठी ही आणखीन काही निधी दिला जातो.आपली मूळ भाषा संस्कृत असताना तिचा अवमान करून उर्दू भाषेला अधिक निधी देण्यामागील काय कारण आहे किंवा मानसिकता आहे हे पाहणे गरजेचे आहे.

**प्रतिवर्षी उर्दू आणि संस्कृत**

**भाषांसाठीच्या योजना आणि निधी**

उर्दू भाषा 'इमकान' त्रैमासिकाचे प्रकाशन रुपये ३ लाख,उर्दू मुशायरा आयोजनासाठी २१ लाख, उर्दू कार्यशाळा साठी ८ लाख,उर्दू भाषेच्या कार्यक्रमासाठी शाळा आणि महाविद्यालयांना देण्यात येणारा निधी ४ लाख रुपये, उर्दू ग्रंथालयांना पुस्तके आणि नियतकालिके पुरवणे १६ लाख, उर्दू पुस्तकांना पारितोषिक ६ लाख, उर्दू हस्तलिखितांचे प्रकाशन ६ लाख, उर्दू पत्रकारांसाठी कार्यशाळा २ लाख, उर्दू भाषेसाठी उल्लेखनीय कामगिरी विषयी पारितोषिक १४ लाख.एकूण रुपये ८० लाख.

संस्कृत भाषा

'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार' २ लाख, विद्यापीठांमध्ये पूर्ण संस्कृत विषय घेऊन प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक ६०००/-(प्रति विद्यार्थी १०००/- रुपये प्रमाणे ६/७ विद्यार्थी)एकूण रुपये २ लाख ६ हजार. २८ ऑगस्ट हा दिवस 'संस्कृत दिन' आहे त्यानिमित्ताने संस्कृत भाषेला तिचा योग्य मानसन्मान आणि पुनर्वैभव प्राप्त करून देणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

**लीना गाडगीळ**

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# साखरसाठ्यावर निर्बंध ; तपासणीसाठी नऊ पथके गठित

■ प्रतिनिधी | अकोला ■

जीवनावश्यक वस्तू अधिनियमाअंतर्गत साखर साठ्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. साखर व्यावसायिकांना साखरेची चार हजार क्विंटल इतकी साठा मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. याबाबत संबंधित ठिकाणी तपासण्या सुरू करण्यात आल्या असून, त्यासाठी नऊ पथके गठित करण्यात आली आहेत.



जिल्हयातील सर्व नागरीकांना साखर वेळेत उपलब्ध व्हावी, साखरेच्या किंमती नियंत्रीत राहाव्यात , साखरची साठेबाजी होऊ नये यासाठी या प्रतिबंधात्मक उपाययोजना अंमलात आल्या आहेत. केंद्रशासनाचे अधिसूचनेत नमुद केलेला साठा मर्यादा आणि इतर अटी निर्बंध आदेश संपूर्ण जिल्ह्यामध्ये लागू राहतील.

जिल्ह्यात ३० नोव्हेंबरपर्यंत साखर वर साठा निर्बंध लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार अकोला जिल्ह्यातील साखरेचे विक्रेते व वितरक, व्यावसायीक साखरेचा साठा ४ हजार क्विंटलपर्यंतच साखर साठा निर्बंध मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्याहून अधिक साठा कोणत्याही वेळी, कोणत्याही ठिकाणी ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत धारण करता येणार नाहीत.

उत्पादनासाठी, वापरासाठी किंवा कच्चा माल म्हणून प्रति महिना १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा वापर करणारा कोणताही मोठा ग्राहक १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साखरेचा साठा ठेवणार नाही. सर्व साखर विक्रेते व वितरक यांनी अन्नसाठा देखरेख पोर्टलवर https:// foodstock. dfpd.gov.in/ तात्काळ साखर व्यावसायीकांनी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी केले. पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी न केल्यास अथवा चुकीची, अपूर्ण माहिती भरल्यास, ही बाब गंभीर अनियमितता मानली जाईल आणि दोषीं व्यावसायीक/संस्थावर अत्यावश्यक वस्तू अधिनियम , १९५५ अन्वये कठोर कारवाई करण्यात येईल. या जिल्ह्यामध्ये नागरीकांना वेळेत मागणी केल्यानुसार साखरेचा सुरळीत पुरवठा, वितरण होणे आवश्यक आहे. साखर साठा निर्बंध लागू असल्याने साखर साठा मर्यादेच्या पालनावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी तसेच पडताळणी करण्यासाठी जिल्हयातील सर्व कार्यक्षेत्रात पुरवठा विभाग यंत्रणेद्वारे वेळोवेळी भेटी, पडताळणी, तपासणी करणे, तसेच साखरेचा अवैधरित्या साठवणुक किंवा विक्री रोखण्याकरिता जिल्हा स्तरावर दक्षता, फिरते पथक स्थापन करून आवश्यक त्या तपासण्या व उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी संपूर्ण जिल्हयामध्ये ९ तपासणी पथक गठित करण्यात आलेले आहे. तपासणी पथकामार्फत साखर साठा व्यवसाय, साठवणुक, विक्री, संस्था इ.ठिकाणांवर भेटी/ तपासणी करणे सुरू आहे. केंद्र शासनाच्या पोर्टलवर साखर व्यवसायाची नोंदणी करून साखर साठा स्टॉक नमुद पोर्टलवर अद्ययावत करावा. जे साखर व्यावसायिक शासनाने दिलेल्या निर्देशानुसार साखर साठा स्टॉक ऑनलाईन नोंदणी करणार नाहीत, भेटी दरम्यान असे निदर्शनास आल्यास अधिनियमाअन्वये धडक कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व नागरीकांनी आवश्यकतेनुसारच साखर खरेदी करावी, अनावश्यक साखर साठा खरेदी करून साठवणूक करू नये. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

# मधापुरीत प्रेमसंबंधातून तरुणाचा विहिरीत मृत्यू
## तरुणी बचावली, विषप्राशनाने प्रकरणाला गंभीर वळण

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

माना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मधापुरी येथे प्रेमसंबंधाच्या कथित प्रकरणातून एका तरुणाचा विहिरीत बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना गुरुवारी घडली. अनिश चव्हाण असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याच्यासोबत असलेल्या तरुणीला गावकऱ्यांनी विहिरीतून सुखरूप बाहेर काढले. मात्र, घरी परतल्यानंतर तिने विषप्राशन केल्याची माहिती समोर आल्याने या घटनेला आणखी गंभीर वळण मिळाले आहे. दरम्यान, घटनेनंतर मधापुरी गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

प्राथमिक माहितीनुसार, अनिश चव्हाण याचे गावातीलच एका तरुणीसोबत प्रेमसंबंध असल्याची चर्चा होती. गुरुवारी दोघे गावालगतच्या शेत परिसरात गेले असताना काही ग्रामस्थांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यानंतर दोघांच्या नात्याबाबत गावात चर्चेला उधाण आले. याच दरम्यान दोघांनी जवळील विहिरीत उडी घेतल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. बचावकार्य करून तरुणीला विहिरीबाहेर काढण्यात यश आले; मात्र अनिशचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. त्याचा मृतदेह बाहेर काढून मुर्तिजापूर तालुका शासकीय रुग्णालयात नेण्यात आला. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी सुमारे सहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आल्याची माहिती आहे.



### तणावाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त

घटनेनंतर मधापुरीमध्ये तणाव निर्माण झाल्याने माना पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. माना पोलीस ठाण्याचे ठाणेदार गणेश नावकर यांनी परिस्थिती हाताळली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार महाडिक, मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार धर्मेंद्र जोशी, बोरगाव मंजू पोलीस ठाण्याचे ठाणेदार वानखडे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिस्थिती अधिक चिघळू नये म्हणून अकोल्याहून एसआरपीचे पथकही मधापुरीत दाखल करण्यात आले.

............

### तरुणीच्या विषप्राशनाने खळबळ

विहिरीतून बचावलेल्या तरुणीने घरी परतल्यानंतर विषप्राशन केल्याची माहिती समोर आली आहे. तिच्यावर उपचार सुरू असल्याचे सांगण्यात येत असले तरी तिची प्रकृती आणि विषप्राशनाबाबतची अधिकृत वैद्यकीय माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे पोलिस तपासासोबतच वैद्यकीय अहवालाकडेही लक्ष लागले आहे.

# अकोटमध्ये ईद मिलादुन्नबी उत्साहात; हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

■ प्रतिनिधी | अकोट ■

हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनानिमित्त अकोट शहरात ईद मिलादुन्नबी उत्साहात आणि शांततेत साजरी करण्यात आली. यानिमित्ताने काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत हिंदू-मुस्लिम बांधवांनी सहभागी होत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश दिला.



मुस्लिम धर्मगुरू आमेर रजा चतुर्वेदी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ९ वाजता मिरवणुकीला सुरुवात झाली. शहरातील विविध प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत मिरवणूक दुपारी ३.३० वाजता शौकत अली चौक येथे पोहोचली. यावेळी 'लब्बैक या रसूल अल्लाह'च्या जयघोषाने शहर परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. शहरातील विविध ठिकाणी मिरवणुकीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत सामाजिक ऐक्य, शांतता आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ केली. त्यामुळे ईद मिलादुन्नबीच्या निमित्ताने शहरातील सलोख्याची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

मिरवणुकीच्या सांगता प्रसंगी आमेर रजा चतुर्वेदी यांनी देशाच्या हितासाठी तसेच हिंदू-मुस्लिम समाजात सदैव एकोपा, शांतता व बंधुभाव कायम राहावा, देशाचे कल्याण व्हावे, यासाठी प्रार्थना केली. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. याबद्दल जुलूस कमिटीच्या वतीने अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, अकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, अकोट शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे, अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुट्टे, एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे तसेच शौकत अली पोलिस चौकीचे बीट जमादार हिम्मत दंदि यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. जुलूस कमिटीचे तौहीद खान कादरी, जावेद सिद्दिकी, सैय्यद मजहर अली, गफूर शाह, अजीम इनामदार, अब्दुल वाहिद, सैय्यद अहमद, गुड्डू सिद्दिकी, सैय्यद नासिर अली, सिकंदर भाई, सैय्यद खालिद यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शांतता आणि उत्साहात पार पडलेल्या या मिरवणुकीतून अकोट शहराने हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सकारात्मक संदेश दिला.

# विकासकामे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन

**अकोला :** आगामी पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने पूर्व विदर्भात संघटनात्मक तयारीला वेग दिला आहे.

# पातूर पोलीस स्टेशनला अपर पोलीस अधीक्षकांची भेट
## पत्रकार संघटनेकडून अतिरिक्त पोलीस बंदोबस्ताची मागणी

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर पोलीस स्टेशनला अपर पोलीस अधीक्षक श्री. रेड्डी यांनी भेट देऊन शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी पातूर येथील मराठी पत्रकार परिषद संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन शहरातील विविध सुरक्षा विषयांवर सविस्तर चर्चा केली.



विशेषतः आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तसेच शहरातील चोरीच्या प्रकरणांबाबत अपर पोलीस अधीक्षकांचे लक्ष वेधले. शहरातील संवेदनशील व प्रमुख चेक पॉइंटवर रात्रीच्या वेळी नियमित गस्त वाढविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच पातूर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्राचा वाढता विस्तार आणि शहरातील वाढत्या कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांचा विचार करून पातूर पोलीस स्टेशनला अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. या भेटीदरम्यान पातूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामकृष्ण जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे ज्येष्ठ पत्रकार मोहन जोशी, प्रदीप काळपांडे, उमेश देशमुख, तालुका अध्यक्ष सतीश सरोदे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस
### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४४६/२०२६ प्रोसेस नं.१०८८२/२०२६
चौ.ता. ०५/१०/२०२६ दिनांक : २५/०८/२०२६

**अर्जदार :** १. सविता जयंत राउत २. काजल अमित राउत ३. अथर्व अमित राउत ४. अर्नव अमित राउत सर्व रा. जानकी अपार्टमेंट, पुंडलिक बाबा मंदीराजवळ, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अमित जयंतराव राउत
**पत्ता :-** रा. रा. जानकी अपार्टमेंट, पुंडलिक बाबा मंदीराजवळ, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अमित जयंतराव राउत यांचे दि. १५/०७/२०२१ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस
### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ७६/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव : -** आम्रपाली बुद्धविहार चॅरीटेबल ट्रस्ट आंबोडा ता. अकोट जि. अकोला
**अर्जदार : -** सौ. प्रतिभा गौतम रायबोले रा. मु. आंबोडा ता. अकोट जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ)जंगम मिळकत (वर्णन) : -**९००/- रुपये सौ. प्रतिभा गौतम रायबोले यांचे जवळ जमा.** आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०७/०८/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# राखीसोबत भावाला झाडाची भेट ; जयश्री बहादूरकरांचा अनोखा उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा धागा न राहता पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा ठरावा, या उद्देशाने वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समिती सदस्या जयश्री महेंद्र बहादूरकर यांच्या पुढाकारातून 'एक भाऊ–एक झाड' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणींनी भावाला राखीसोबत एक झाड भेट द्यावे, असे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले आहे. भावासाठी दिलेले झाड ही केवळ भेट नसून पुढील पिढीसाठी हिरवाई, शुद्ध हवा आणि निरोगी पर्यावरणाचा संकल्प आहे, असा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.



'भावाला राखीसोबत एक झाड द्या. हे झाड माझ्याकडून घेऊन जा, लावा आणि जपा. आजचे छोटेसे रोप उद्या आपल्या कुटुंबाला सावली आणि शहराला हिरवाई देईल,' असे आवाहन नगरसेविका जयश्री बहादूरकर यांनी केले आहे. शहरातील प्रत्येक कुटुंबाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, झाडांची संख्या वाढावी आणि नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'एक भाऊ–एक झाडष्ठ प्रत्येक घरातून हिरवाईची नवी सुरुवात' हा संदेश देत नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मलकापूर चौक येथे आज २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'राखी बांधूया, झाड लावूया आणि अकोल्याला हिरवंगार करूया,' असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय सर्वधर्म समभाव डॉ. महाकवी वामनदादा कर्डक यांचा जयंती महोत्सव

**अकोला :** अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समिती, अकोला जिल्हा कलावंत समिती तसेच बौध्द समाज संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय सर्वधर्म समभाव डॉ. वामनदादा कर्डक यांचा १०४ वा. जयंती महोत्सव रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक प्रमिलाताई ओक हॉल येथे सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वाजे पर्यंत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या जयंती महोत्सव कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. संतोष हुशे तसेच उद्घाटक खासदार बळवंत वानखडे, स्वागताध्यक्ष देवश पातोडे हे राहणार आहे. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून महाराष्ट्रातील प्रसिध्द गायक-गायीका मनोजराजा गोसावी, राहुल अन्वीकर, भिमेश भारती, बबन दिपके, प्रा. किशोर वाघ, महेंद्र सावंग, सुषमादेवी, निशाताई धोंगडे, दिपालीताई इंगळे यांच्या भारदार गितगायनाने, प्रबोधन करण्यात येईल. या दरम्यान विविध क्षेत्रांतील उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या महोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यीक आणि कला क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून सर्वधर्म समभाव, सामाजिक एकोपा हा संदेश जनसामान्यपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. जिल्हासह महाराष्ट्रातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष पंकज खंडारे, जिल्हा संघटक राहूल पावनमारे तसेच रिताताई खंडारे, प्रतिज्ञा मी वानखडे यांनी प्रसिध्दी पत्राकाव्दारे कळविले आहे.

## जाहीर नोटीस
### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १३९१/२०२६ प्रोसेस नं.१०५४०/२०२६
चौ.ता. ०३/१०/२०२६ दिनांक : १७/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती पुर्निमा राजेश शाह २. विनित राजेश शांह ३. रोमित राजेश शाह सर्व रा. ३–ए, वर्धमान डुप्लेक्स, रजपुत पुरा, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजेश मनुभाई शाह
**पत्ता :-** रा.३–ए, वर्धमान डुप्लेक्स, रजपुत पुरा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेश मनुभाई शाह यांचे दि. ०९/०४/२०२३ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस
### वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १३५०/२०२६ प्रोसेस नं.१०४६१/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती स्वाती राहुल लापुरकर २. श्रीवेश राहुल लापुरकर ३. स्वरा राहुल लापुरकर ४. सौ. शिला डीगांबर लापुरकर सर्व रा. सितला माता मंदीर जवळ, संत नगरी, खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राहुल डीगांबर लापुरकर
**पत्ता :-** रा. सितला माता मंदीर जवळ, संत नगरी, खडकी बु,अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राहुल डीगांबर लापुरकर यांचे दि. १२/०५/२०२६ रोजी डेसून हॉस्पिटल, कोलकाता येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची हयाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# ईद-ए-मिलादुन्नबीची मिरवणूक उत्साहात



**मुर्तीजापूर :** ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने मुर्तीजापूर शहरात गुरुवारी उत्साहपूर्ण वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. धार्मिक उत्साह आणि जल्लोषात निघालेल्या या मिरवणुकीत मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीदरम्यान समाजसेवक इब्राहिम कासम घाणीवाला आणि अभियंता रजा घाणीवाला यांच्या वतीने शाही इमाम मौलाना जाफर हुसेन खतीब यांच्यासह मिरवणुकीत सहभागी विविध मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी एकमेकांना ईद-ए-मिलादुन्नबीच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, मिरवणूक शांततेत आणि सुरळीत पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपविभागीय अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांनी पोलिसांचा ताफा तैनात केला होता. मिरवणुकीच्या मार्गावर पोलिसांनी विशेष लक्ष ठेवत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी खबरदारी घेतली.

# पार्थिव शिवलिंग रुद्राभिषेकासह बगलामुखी माता हवन उत्साहात

**मुर्तीजापूर :** शहरातील पुंडलिक बाबा गौरक्षण येथे पार्थिव शिवलिंगाचा रुद्राभिषेक आणि बगलामुखी माता हवनाचा धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने पार पडला. यावेळी २१ दांपत्यांच्या हस्ते पार्थिव शिवलिंगाचे विधिवत पूजन व रुद्राभिषेक करण्यात आला.



नलखेड (उज्जैन) येथील बगलामुखी माता मंदिराचे महंत महाराज कुलदीप तसेच त्यांच्या शिष्यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी पार पडले. मंत्रोच्चार, पूजाविधी आणि भक्तिमय वातावरणामुळे गौरक्षण परिसरात दिवसभर आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. रुद्राभिषेकाच्या कार्यक्रमात भजन गायक कुमार योगेश यांनी शिवकीर्तन सादर केले. त्यानंतर २१ दांपत्यांनी भगवान महादेवाची विधिवत पूजा-अर्चा करून रुद्राभिषेक केला. पुढे बगलामुखी माता हवन विधीवत पार पडला. हवनावेळी करण्यात आलेल्या मंत्रोच्चारामुळे परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. या धार्मिक सोहळ्यास शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून भगवान महादेव व बगलामुखी मातेचे दर्शन घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक आणि सेवेकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.या आयोजनाला बाबा पुंडलिक बाबा गौरक्षण संस्थेचे विशेष सहकार्य लाभले. धार्मिक कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने पुंडलिक बाबा गौरक्षण परिसर भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघाला.

# सिमेंटच्या रस्त्यांचा हट्ट कशासाठी ; त्याच पैशात जास्त रस्ते करा, डांबरीकरणाला प्राधान्य द्या

**वर्धा/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी उपलब्ध असलेल्या निधीचा जास्तीत जास्त परिणामकारक वापर करण्याऐवजी महागड्या सिमेंट काँक्रीट रस्त्यांवरच भर का, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील प्रस्तावित रस्त्यांची कामे सिमेंट काँक्रीटऐवजी डांबरी पद्धतीने करण्यात यावीत, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

वर्धा लोकसभा मतदारसंघात अमरावती जिल्ह्यातील पाच आणि वर्धा जिल्ह्यातील आठ अशा एकूण १३ तालुक्यांचा समावेश होतो.



**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत धोरण बदलाची मागणी**

ग्रामीण भागातील गावांना मुख्य मार्गांशी जोडण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना महत्त्वाची आहे. मात्र, उपलब्ध निधी मर्यादित असताना सिमेंट काँक्रीट रस्त्यांवर मोठा खर्च करण्याऐवजी त्याच निधीत अधिक लांबीचे डांबरी रस्ते उभारल्यास अधिक गावांना रस्त्यांचे जाळे उपलब्ध करून देता येईल, असा मुद्दा पुढे आला आहे.

'रस्ता मजबूत की निधीचा कार्यक्षम वापर?' हा प्रश्न या निमित्ताने चर्चेत आला आहे. सिमेंट रस्त्यांसाठी लागणारा खर्च तुलनेने अधिक असल्याने समान निधीत कमी अंतराचे रस्ते पूर्ण होतात. त्याउलट डांबरीकरणाचा पर्याय स्वीकारल्यास अधिक लांबीचे रस्ते बांधून ग्रामीण भागातील दळणवळणाचा विस्तार करता येऊ शकतो. त्यामुळे एखाद्या भागापुरता विकास मर्यादित न ठेवता अधिक गावांना जोडण्याची संधी निर्माण होणार आहे.

वाढते तापमान आणि बदलते हवामान लक्षात घेता रस्त्यांच्या बांधकाम पद्धतीचा पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही विचार करण्याची गरज आहे.

मोठ्या प्रमाणावर सिमेंट काँक्रीटचे पृष्ठभाग वाढल्याने स्थानिक पातळीवरील उष्णता वाढण्यास हातभार लागू शकतो. त्यामुळे पर्यावरणीय समतोलाचा विचार करून डांबरी रस्त्यांना प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामीण रस्त्यांचा प्रश्न हा केवळ बांधकामाचा नसून निधीच्या योग्य विनियोगाचा आणि विकासाची व्याप्ती वाढविण्याचा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने सिमेंट काँक्रीट रस्त्यांच्या धोरणाचा पुनर्विचार करून, तांत्रिक निकष व गुणवत्तेची हमी कायम ठेवत, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत डांबरीकरणाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# समृद्धी महामार्गावर भरधाव टेम्पोची अज्ञात वाहनाला धडक

## विरुळजवळ भीषण अपघात

**विरुळ - आकाजी/ जनमाध्यम**

समृद्धी महामार्गावर भरधाव वेगाने धावणाऱ्या टेम्पोने समोरून जाणाऱ्या अज्ञात वाहनाला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात टेम्पो चालकासह त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला. हा अपघात गुरुवारी २७ ऑगस्ट पहाटे सहा वाजताच्या सुमारास मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेल क्रमांक ८२.२००, विरुळजवळ घडला. अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पो क्रमांक श्प ४८ ॐ १९४९ हा नागपूरहून मुंबईच्या दिशेने जात होता. दरम्यान, चालक चंदन यादव याने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविल्याने समोरून जाणाऱ्या अज्ञात वाहनाला टेम्पोची मागून जोरदार धडक बसली. धडकेची




तीव्रता एवढी होती की टेम्पोचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात चंदन यादव (३०, रा. वसई, मुंबई) याच्या मानेला गंभीर दुखापत झाली असून, त्याच्यासोबत असलेला फैजान अहमद (४०, रा. आजमगड, उत्तर प्रदेश) याच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली आहे.

अपघाताची माहिती सकाळी ६.१० वाजता ऍध संभाजीनगर यांच्याकडून पोलिसांना मिळताच झएघ प्रकाश चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. सकाळी ६.५० वाजता पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आणि श्एइ जवानांनी तत्काळ बचावकार्य सुरू करून दोन्ही जखमींना हायवे ॲम्ब्युलन्सच्या मदतीने पुलगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविले.

दरम्यान, अपघातग्रस्त टेम्पो रस्त्याच्या बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. या घटनेची माहिती पुलगाव पोलिस ठाण्याला देण्यात आली असून, अज्ञात वाहनाचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. सकाळी ८.१० वाजता घटनास्थळावरील प्राथमिक कारवाई पूर्ण करण्यात आली. या कारवाईत सरिता यादव, झएघ प्रभात चौधरी, भारत पिसुड्डे, भोगे, झिले, इंगळे व काकडे यांच्यासह पोलिस व जवानांनी सहभाग घेतला.

# उन्नत भारत अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर

**वर्धा/ जनमाध्यम**

सावंगी मेघे येथील डीएमआयएचईआर डीयूच्या वतीने उन्नत भारत अभियानांतर्गत निमगाव साबणे येथे आरोग्य तपासणी व रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचा शंभरहून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. त्यापैकी २१ रुग्णांना पुढील उपचार व आवश्यक तपासणीसाठी एव्हीबीआरएचमध्ये पाठविण्यात आले.

उन्नत भारत अभियान हा शिक्षण मंत्रालयाचा महत्त्वाचा उपक्रम असून, उच्च शिक्षण संस्थांमधील ज्ञान व संसाधनांचा उपयोग करून ग्रामीण भागात सकारात्मक आणि शाश्वत बदल घडवून आणणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. आयआयटी दिल्ली या अभियानाचे राष्ट्रीय स्तरावर समन्वयन करते. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यापीठांना किमान पाच गावे विकासासाठी दत्तक घ्यावी लागतात. विद्यापीठातील शिक्षक व विद्यार्थी ग्रामस्थांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतात आणि स्थानिक गरजेनुसार दीर्घकालीन उपाययोजना राबवितात.

डीएमआयएचईआर डीयूच्या कुलसचिव डॉ. श्वेता काळे पिसुळकर यांनी सांगितले की, विद्यापीठ या अभियानात सक्रियपणे सहभागी असून पाच गावे दत्तक घेण्यात आली आहेत. विद्यापीठाच्या विविध घटक संस्थांच्या माध्यमातून या गावांमध्ये दर महिन्याला विविध उपक्रम राबविले जातात.

यूबीए प्रकल्प समन्वयक डॉ. अभिषेक जोशी यांनी सांगितले की, दत्तक गावांतील नागरिकांना सहज व परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, तसेच गरजू रुग्णांना विविध आरोग्य योजनांच्या माध्यमातून उपचार मिळवून देणे, हा विद्यापीठाचा प्रमुख उद्देश आहे.

१५ ऑगस्ट रोजी ग्रामसभेदरम्यान झालेल्या आरोग्य तपासणी शिबिरात विद्यापीठातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी डेंग्यू तसेच अतिसारापासून बचाव करण्याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली.

दत्तक घेतलेल्या सर्व गावांमध्ये दर महिन्याला अशाच आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याचे नियोजन करण्यात आले असून, ग्रामस्थांच्या आरोग्यविषयक गरजांना प्राधान्य दिले जाणार आहे.

# इंधन टँकर पलटला अन् हायवेवर उडाली धावपळ

**पेट्रोल-डिझेलने भरलेला टँकर उलटल्याने**

**CAD च्या अग्निशमन दलाची तत्परता**

**दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर क्रेनने टँकर उचलला, दोन्ही बाजूंना दोन-दोन किलोमीटर वाहनांच्या रांगा**

**पुलगाव/ जनमाध्यम**

नागपूर-मुंबई महामार्गावरील पुलगाव-अमरावती मार्गावर पेट्रोल आणि डिझेलने भरलेला नायरा कंपनीचा इंधन टँकर अचानक पलटी झाल्याने गुरुवारी सायंकाळी एकच खळबळ उडाली. हॉटेल जयदेव बारसमोर सायंकाळी साडेसहा ते सातच्या सुमारास झालेल्या या अपघातामुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. ज्वलनशील इंधनाने भरलेला टँकर रस्त्यावरच उलटल्याने ठिणगी किंवा आग लागल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

घटनेची माहिती मिळताच केंद्रीय दारूगोळा डेपो पुलगावच्या अग्निशमन दलाने क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. सुरक्षा अधिकारी आणि सुरक्षा दलाचे जवानही दाखल झाले. स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने संपूर्ण परिसराची पाहणी करून संभाव्य धोका टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना सुरू करण्यात आल्या.

इंधनगळती किंवा आगीचा धोका लक्षात घेऊन अग्निशमन दलाने अत्यंत सावधगिरीने बचावकार्य हाती घेतले.



टँकरजवळ सुरक्षित अंतर राखत आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तब्बल दोन तास अथक प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने टँकर उचलण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. अखेर सुमारे तीन तासांच्या आत टँकर सुरक्षितपणे सरळ करण्यात आला.

टँकर पलटी झाल्याने महामार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली. हायवेच्या दोन्ही बाजूंना तब्बल दोन-दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. त्यामुळे वाहनचालकांना बराच वेळ वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. टँकर सुरक्षितपणे हटवल्यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या.

पेट्रोल आणि डिझेलसारख्या अत्यंत ज्वलनशील पदार्थाने भरलेला टँकर पलटी होऊनही कोणतीही मोठी दुर्घटना घडली नाही. पुलगाव अग्निशमन दल, सुरक्षा अधिकारी आणि पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. बचावकार्यादरम्यान घेण्यात आलेली खबरदारी आणि समन्वय यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापासून रोखण्यात यश आले.

# ईद-ए-मिलादच्या पर्वावर आर्वीत बंधुभावाचा सुगंध



**आर्वी / जनमाध्यम**

ईद-ए-मिलादच्या पवित्र पर्वानिमित्त आर्वी शहरात उत्साहासोबतच बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण पाहायला मिळाले. वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी शहरातील मुस्लिम बांधवांची भेट घेऊन ईद-ए-मिलादच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुस्लिम समाजबांधवांशी संवाद साधताना त्यांनी प्रेम, शांतता, मानवता आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. विविध ठिकाणी मुस्लिम बांधवांनी खासदार काळे यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. नागरिक, युवक आणि समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परस्परांच्या सण-उत्सवात सहभागी होऊन आनंद वाटून घेणे ही आर्वीची सामाजिक परंपरा आहे. या भेटीमुळे या परंपरेला पुन्हा उजाळा मिळाला. एकता आणि बंधुभाव हाच समाजाच्या प्रगतीचा मजबूत पाया आहे, असे सांगत खासदार काळे यांनी सर्वांना सुख, शांती आणि समृद्धीच्या शुभेच्छा दिल्या.

# संशोधकामुळे नव्या पतंगाच्या प्रजातीचा शोध

## स्त्यूनिंगेरिया नागपूर एन्सिसचे शास्त्रीय वर्णन; वर्धा जिल्ह्यातील जैवविविधतेच्या अभ्यासाला नवी दिशा

**वर्धा/ जनमाध्यम**

मध्य भारताच्या जैवविविधतेच्या अभ्यासात वर्ध्याच्या संशोधकाच्या सहभागा तून महत्त्वपूर्ण भर पडली आहे. वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात आढळलेल्या पतंगाच्या नव्या प्रजातीची शास्त्रीय ओळख पटविण्यात आली असून, 'स्त्यूनिंगेरिया नागपूरएन्सिस' असे या नव्या प्रजातीचे नामकरण करण्यात आले आहे. राहुल भेंडे, डॉ. आशिष टिपले आणि डॉ. जतिश्वरसिंह इरुंगबाम या संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचे शास्त्रीय वर्णन २३ ऑगस्ट २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित झाले आहे.

या संशोधनात वर्ध्याचे राहुल भेंडे यांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाशी संबंधित असून, नव्या पतंगाच्या ओळखीसह त्याच्या वर्गीकरणात्मक अभ्यासात त्यांनी योगदान दिले आहे. विशेष म्हणजे, या प्रजातीचे एकूण सहा नमुने संशोधकांनी संकलित केले. त्यापैकी प्रकार नमुना नागपूर विद्यापीठ परिसरातून मिळाला, तर अन्य पाच नमुने वर्धा



जिल्ह्यातील विविध भागांतून संकलित करण्यात आले. त्यामुळे या नव्या प्रजातीच्या शोधात वर्धा जिल्ह्याचे स्थान विशेष ठरले आहे.

स्त्यूनिंगेरिया नागपूरएन्सिस ही मेटार्बेलीडे कुळातील प्रजाती आहे. संशोधकांनी केवळ तिची ओळख आणि वर्गीकरणच केले नाही, तर तिच्या जैवशास्त्राचाही अभ्यास केला. या पतंगाच्या अळ्या विशेषतः संत्र्यासह इतर लिंबूवर्गीय वनस्पतींवर आढळून आल्या. रात्रीच्या वेळी या अळ्या झाडांच्या ताज्या सालीवर खाद्य घेताना दिसल्या. दिवसाच्या वेळी मात्र त्या लपून राहत असल्याचे निरीक्षण संशोधनादरम्यान नोंदविण्यात आले.

या नव्या प्रजातीच्या समावेशामुळे स्त्यूनिंगेरिया या वंशातील जगभरात ज्ञात प्रजातींची संख्या आता १२ झाली आहे. त्यापैकी पाच प्रजाती भारतात नोंदविण्यात आल्या आहेत.

नव्या शोधामुळे या वंशाचे ज्ञात भौगोलिक वितरण मध्य भारतापर्यंत विस्तारले आहे. त्यामुळे मध्य भारतातील पतंगांच्या जैवविविधतेच्या अभ्यासासाठी या संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### पीएचडी संशोधनातील आनंददायी टप्पा

हा शोध माझ्या पीएचडी संशोधनातील अत्यंत आनंददायी आणि महत्त्वाचा टप्पा आहे. पीएचडीच्या अवघ्या दोन वर्षांत विज्ञानासाठी नवीन प्रजाती शोधणे ही अभिमानाची बाब आहे. वर्धा जिल्ह्यातून शास्त्रीयदृष्ट्या वर्णन झालेली ही बहुधा पहिली प्राणी प्रजाती असावी. या शोधामुळे नागपूर, वर्धा आणि परिसरातील पतंगांच्या जैवविविधतेचा सखोल अभ्यास करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. मध्य भारतातील तुलनेने कमी अभ्यासलेल्या कीटक जैवविविधतेच्या संशोधनाला यामुळे नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**राहुल भेंडे,** संशोधक, वर्धा




## घरफोडी हजारांचा ऐवज लंपास

**आष्टी -** कुटुंबीय देवदर्शनासाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून २४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना साहूर येथे घडली. रमेश बिजवे हे कुटुंबीयांसह देवदर्शनासाठी बाहेर गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घराचे कुलूप तोडले. त्यानंतर घरात प्रवेश करून कपाटाची पाहणी केली. चोरट्यांनी कपाटातून २० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत आणि चार हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. कुटुंबीय घरी परतल्यानंतर घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. घरातील ऐवजाची पाहणी केली असता चोरी झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत आष्टी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## भरधाव ट्रॅक्टरच्या धडकेत वृद्ध जखमी

**गिरड -** भरधाव ट्रॅक्टरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ७८ वर्षीय वृद्ध गंभीर जखमी झाले. हा अपघात खुर्सापार शिवारात घडला. हरीदास चुटे हे मुलगा रोशन चुटे याच्यासोबत शेतातून दुचाकीने गिरड येथील घराकडे जात होते. दरम्यान, विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रॅक्टरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील हरीदास चुटे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी वृद्धाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. अपघातामुळे काही काळ परिसरात वाहतुकीची कोंडी झाली होती. या प्रकरणी रोशन चुटे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गिरड पोलिसांनी ट्रॅक्टर चालक योगेश टिपले याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू केला आहे.

## वर्धा नदीतून वाळू तस्करी

**पुलगाव -** वर्धा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांनी कारवाई करून पाच लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई गुंजखेडा शिवारात करण्यात आली. पोलिसांचे पथक परिसरात गस्त घालत असताना एमएच ३२ पी १७४२ क्रमांकाचा ट्रॅक्टर संशयास्पदरीत्या जाताना आढळला. पोलिसांनी ट्रॅक्टरची पाहणी केली असता त्यामध्ये वाळूसाठा आढळून आला. ट्रॅक्टरचालक भारत तलमले रा. घुबडटोली, पुलगाव याच्याकडे वाळू वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे चौकशीत समोर आले. त्यामुळे पोलिसांनी ट्रॅक्टरसह वाळूसाठा जप्त केला. या कारवाईत एकूण पाच लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. याप्रकरणी भारत तलमले आणि अकील खान रा. जोशी प्लॉट यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## कुलूपबंद घर फोडले; ७४ हजारांचा ऐवज चोरी

**वर्धा :** कुटुंबीय बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी कुलूपबंद घर फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा ७४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना स्वावलंबी स्कूलजवळील धंतोली परिसरात घडली. प्रकाश मलकान हे कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडले. त्यानंतर घरात प्रवेश करून कपाटाची झडती घेतली. कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केली. बाहेरगावाहून परतल्यानंतर घराचे कुलूप तुटलेले आणि घरातील साहित्य अस्ताव्यस्त असल्याचे मलकान यांच्या निदर्शनास आले. तपासणी केली असता ऐवज चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. याबाबत त्यांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासह पुढील तपास सुरू केला आहे.

## बसस्थानकातून वृद्ध महिलेच्या गळ्यातून माळ लांबविली

**वडनेर -** बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी ७४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची माळ लंपास केली. ही घटना वडनेर बसस्थानक परिसरात घडली. तानी भालेराव रा. पिपरी या आजनसरा येथे जाण्यासाठी बसस्थानकावर आल्या होत्या. बसमध्ये चढत असताना प्रवाशांची मोठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची माळ अलगद लांबविली. बसमध्ये बसल्यानंतर काही वेळाने गळ्यातील माळ गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी आजूबाजूला शोध घेतला; मात्र माळ मिळून आली नाही. चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी वडनेर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून चोरट्याचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २७१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# डफरिन रुग्णालयातील आगीत मृत नवजात बालिकेच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

## भाजपा खासदार, आमदारांची उपस्थिती

**अचलपूर/ प्रतिनिधी:-** अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास भीषण आग लागून तीन नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेत चिखलदरा तालुक्यातील बोराळा येथील किरण बेठेकर यांच्या नवजात मुलीचा मृत्यू झाला.

या पार्श्वभूमीवर काल २७ ऑगस्ट रोजी बोराळा येथे बेठेकर कुटुंबीयांची सांत्वनपर भेट भाजपा चे राज्यसभा खासदार अनिल बोंडे,विधानपरिषद आमदार प्रवीण पोटे,आ. केवलराम काळे ,माजी आमदार प्रभुदास भिलावेकर,भाजपा चे सुधीर रसे यांची उपस्थितीती होती.त्यांच्या या दुःखात सहभागी होत आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी



कुटुंबीयांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन सुद्धा राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिष्टमंडळाकडून देण्यात आले.तसेच बोराळा येथील उपकेंद्राला भेट देऊन तेथील आरोग्य सुविधांची पाहणी सुद्धा करण्यात आली.

या दवाखान्यातील आवश्यक समस्या व सुविधांबाबत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना ही राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे आणि विधानपरिषद आमदार प्रवीण पोटे यांच्याकडून देण्यात आल्या. यावेळी गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या ही त्यांनी जाणून घेतल्या .या भेटीदरम्यान राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार केवलराम काळे, विधान परिषद आमदार प्रवीण पोटे पाटील, माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, जयंत डेहनकर, शिवराय कुलकर्णी, सुधीर रसे, तालुकाध्यक्ष दिनेश चव्हाण, समीर हावरे, चेतन पवार, प्रसन्न काठोळे, विलास कविटकर, अमोल जाधव यांच्यासह कर्मचारी, सरपंच, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'अक्षय ऊर्जा दिन' उत्साहात साजरा

## -विविध स्पर्धा, जनजागृती रॅली व ऊर्जा संवर्धनाची शपथ

**अमरावती/ प्रतिनिधी:-** विद्यार्थ्यांमध्ये अक्षय ऊर्जेचे महत्त्व, ऊर्जा संवर्धन, पर्यावरणपूरक ऊर्जास्रोत, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत विकासाबाबत जागृती निर्माणकरण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि विद्युत अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहपूर्ण वातावरणात 'अक्षय ऊर्जा दिन' साजरा झाला.

विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, लघुचित्रफीत निर्मिती स्पर्धा आणि पोस्टर निर्मिती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अक्षय ऊर्जा, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर आपले ज्ञान, कल्पकता व सर्जनशीलता सादर केली. अक्षय ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रवीण कुमार




वानखेडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाढती ऊर्जेची गरज, पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील वाढता ताण, अक्षय ऊर्जेची भविष्यातील भूमिका तसेच या क्षेत्रातील रोजगार, संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकतेच्या विविध संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एम. महल्ले, विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. एम. व्ही. जपे, प्राध्यापक समन्वयक डॉ. पी. पी. बेडेकर आदी यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सहभागातून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेट देत अक्षय ऊर्जेचा अधिकाधिक वापर, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा संवर्धनाची शपथ घेतली तसेच विविध विभागांमध्ये जनजागृतीपर पोस्टर्स लावून ऊर्जा बचतीचा आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापराचा संदेश दिला.

### पाहिजेत (उर्दु माध्यम)

**अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त**
**सनाउल्ला खान एज्युकेशन सोसायटी, अंजनगांव सुर्जी**
**द्वारा संचालित**
**सनाउल्ला खॉं उर्दू ग.हा.स्कूल अंजनगांव सुर्जी, डॉ.सुफी उर्दु ज्यू.कॉलेज व उर्दू हायस्कूल, पथ्रोट, ता.अचलपूर,**
**खालीलप्रमाणे रिक्त पदे भरावयाची आहेत.**

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वर्ग | संवर्ग | शाळेचे नांव | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण सेवक | ०१ | उर्दू/पर्शियन M.A.B.Ed. | ११, १२ वी | खुला | डॉ.सुफी उर्दू ज्यू. कॉलेज, अंजनगांव सुर्जी | १०० टक्के |
| २. | सा.प्राध्यापक | ०१ | इंग्रजी M.A.B.Ed. | ११, १२ वी | खुला | डॉ.सुफी उर्दू ज्यू. कॉलेज, अंजनगांव सुर्जी | ६० टक्के |
| ३. | सा.प्राध्यापक | ०१ | अर्थशास्त्र M.A.B.Ed. | ११, १२ वी | खुला | डॉ.सुफी उर्दू ज्यू. कॉलेज, अंजनगांव सुर्जी | ६० टक्के |
| ४. | शिक्षण सेवक | ०१ | B.A.D.Ed./ B.Ed TET/CTET | ६ ते ८ | खुला | सना.उ.खॉं.उर्दू गर्ल्स हायस्कूल अंजनगांव सुर्जी | १०० टक्के |
| ५. | शिक्षण सेवक | ०१ | B.A..B.Ed. Eng.(Lit.) (TET/CTET) | ८ वा | खुला | उर्दु हायस्कूल पथ्रोट ता.अचलपूर | १०० टक्के |
| ६. | शिक्षण सेवक | ०१ | B.Sc.B.Ed. Math (TET/CTET) | ८ वा | खुला | उर्दू हायस्कूल पथ्रोट ता.अचलपूर | १०० टक्के |

इच्छुक उमेदवार मुलाखतीकरीता स्वखर्चाने दिनांक ०७.०९.२०२६ सोमवार रोजी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत मूळ कागदपत्रासह सनाउल्लाखान उर्दू गर्ल्स हायस्कूल व डॉ. सुफी उर्दू ज्यू. कॉलेज, अंजनगांव सुर्जी जि.अमरावती येथे हजर रहावे.

**अध्यक्ष,**
**अब्दुल अकील सुफी**
**सनाउल्ला खान एज्युकेशन सोसायटी, अंजनगांव सुर्जी**
**मो.नं.९१५८३५५५१२**

**प्राचार्या/मुख्याध्यापिका**
**नसीम फिरदौस**
**सनाउल्लाा खान उर्दू गर्ल्स हायस्कूल व डॉ.सुफी उर्दु ज्यू.कॉलेज, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती**

**मुख्याध्यापक,**
**सलीम खान**
**उर्दू हायस्कूल पथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती**

# 'अक्षरवैदर्भी' मासिकाच्या दिवाळी विशेषांकासाठी दर्जेदार साहित्य पाठवा!

**अमरावती/ प्रतिनिधी:-** गत त्रेचाळीस वर्षांपासून सुरू असलेल्या 'अक्षरवैदर्भी' या वाङ्मयीन मासिकाचा दिवाळी अंक (ऑक्टोबर/नाव्हेंबर / डिसेंबर-२०२६) यावर्षी १ नोव्हेंबर रोजी प्रकशित होत आहे. या अंकात नामांकित व नवोदित लेखकांचे उत्कृष्ट साहित्य समाविष्ट असेल.

या अंकाच्या निमित्ताने आयोजिलेल्या साहित्य स्पर्धेकरिता दर्जेदार ललित तथा समीक्षणात्मक वैचारिक लेखन 'अक्षरवैदर्भी'च्या संपादक मंडळाकडून मागविण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी पाठवावयाच्या कविता-कथा-एकांकिका अनुभवकथन आणि ललित चिंतन या साहित्यकृती भारतीय जनजीवन संघर्षाशी निगडीत अशा कोणत्याही विषयांवर चालतील. तसेच वैचारिक लेख/ शोधनिबंध हे भारतीय जनजीवनसंबद्ध साहित्य, समीक्षा व साहित्यशास्त्र या विषयांवरील असावे. लेखन साहित्य हे कथा (कमाल २ हजार शब्द), कविता (कमाल-१५० शब्द), एकांकिका (प्रयोग कालावधी-३० मिनिटे), अनुभवकथन (कमाल-१ हजार शब्द), ललित चिंतन (कमाल ७०० शब्द), परीक्षण/समीक्षण (कमाल-१ हजार ५०० शब्द), लेख / शोधनिबंध (कमाल-२ हजार ४०० शब्द) आदी लेखन साहित्य उपरोक्त प्रमाणे शब्द संख्यांमध्ये असावेत.

उपरोक्त साहित्य स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवी-लेखकांनी आपले लेखन ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत यासोबत दिलेल्या पत्त्यावर पोहोचेल या बेताने पाठवावे.

सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या पाच कविता, तीन कथा, दोन एकांकिका, दोन अनुभवकथने व दोन ललित चिंतने या ललितकृती तसेच निवडक लेख / शोधनिबंध / समीक्षालेख या वैचारिक कृती दिवाळी-२०२६ विशेषांकात प्रसिद्ध करण्यात येतील.

ललित साहित्याच्या पुरस्कृत लेखक-कवींना पुरस्कारादाखल 'अक्षरवैदर्भी' मासिकाचे दीपावली २०२६ पासून दीपावली २०२७ पर्यंतचे अंक सन्मानपूर्वक पाठविण्यात येतील.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयाचे बंधन नाही तसेच कोणतेही शुल्क अपेक्षित नाही; मात्र पुस्तक परीक्षणासोबत संबंधित पुस्तकाची प्रत पाठविणे आवश्यक आहे.

लेखन साहित्य पाठविण्याचा पत्ता - संपादक मंडळ, अक्षरवैदर्भी ' जनसाहित्य', प्लॉट नं. ५३, शिल्पकला कॉलनी, शेगाव-रहाटगाव मार्ग, वि.म.वि. उप डाकघर, अमरावती-४ दूरध्वनी क्रमांक -०७२१-२९९०१४७, भ्रमणभाष क्र. - ९८६०४५१०७५, ९४२२११२५९८, ९४२१७३९६४४, ९८८११४६८३० व ९७६५७४८४५७ यावर तसेच www. aksharvaidaRhi. org या संकेतस्थळावर तसेच subhashsudam@gmail.com या ई-मेल वर तथा Whats app नंबर वर लेखन साहित्य पाठविता येईल.

# १ सप्टेंबर रोजी 'डाक अदालत'

## -समस्येचे निराकरण न झालेल्या तक्रारी मांडता येणार

**अमरावती :** अमरावती विभागातील स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, डाक वस्तु रजिस्टर पार्सल,बचत बँक व मनीऑर्डर आदी सहा आठवडयात निराकरण न झालेल्या तक्रांरींच्या समाधानासाठी येत्या १ सप्टेंबर रोजी प्रवर अधीक्षक डाकघर अमरावती यांच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सहा आठवडयात निराकरण न झालेल्या व समाधानकारक उत्तर न मिळालेल्या तक्रारींची डाक अदालतीत दखल घेण्यात येणार आहे. या अदालतीत अर्ज सादर करताना तक्रारीचा सर्व तपशील, तक्रारीची तारिख, ज्या अधिकाऱ्यांना तक्रार पाठविली त्यांचे नाव व हुद्दा आदींचा उल्लेख असावा. प्रवर अधीक्षक डाकघर अमरावती-४४४६०२ या पत्त्यावर ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज पाठविण्यात यावे. वेळेत प्राप्त अर्जांचा विचार डाक अदालतील केला जाईल, असे प्रवर अधीक्ष डाकघर यांनी कळविले आहे.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

## प्लॉट विकणे आहे

**न्यू कॉलनी, दस्तुर नगर, अमरावती येथील रहिवासी प्लॉट क्षेत्र ३०००.०० चौ.फुट त्यावरील जुन्या बांधकामासह विकणे आहे.**
**- संपर्क -**
**७५०७६२२५८४**


### शुध्दी पत्रक

दिनांक १४.०८.२०२६ रोजी अमरावती जिल्हा सहकारी बोर्ड लि., अमरावती या सभेची वार्षिक साधारण सभेची नोटीस छापण्यात आली होती. बोर्डाची वार्षिक सर्वसाधारण सभा अमरावती येथे मंगळवार ऐवजी सोमवार दिनांक ३१.०८.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता असे वाचावे.

**दुरुस्तीत येणारी शब्दरचना-**

| अ.क्र. | संस्था प्रकार | प्रतिनिधी संख्या |
|---|---|---|
| २. | जिल्हास्तरीय, ईतर वैयक्तिक (प्रत्येकी एक) | ३ |
| | **याचे ऐवजी** | |
| २. | **जिल्हास्तरीय, ईतर सभासदांमधून अ) वैयक्तिक सभासदांमधून** | १ २ |

**असे वाचावे**

### विश्वस्त नेमण्यासंबंधी जाहीर सूचना

सर्व नागरिकांना या जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, १) श्रीराम मंदिर संस्थान र.नं. अे. ५७६,२) श्री मारोती संस्थान र.नं. अे.५७७, ३) श्री रामनाथ स्वामी संस्थान र.नं. अे.५७८, ४) श्री ओंकारेश्वर संस्थान र.नं. अे.५७९,५) श्री शंकर संस्थान र.नं. अे.५९५ हे पाचही संस्थान वाढोणा रामनाथ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती या संस्थानच्या प्रकरणात मा.धर्मादाय सह आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी चौकशी क्र. ०७/२०१६ मध्ये पारित केलेल्या दि. ०५/०८/२०२६ रोजीच्या आदेशात दिलेल्या निर्देशानुसार व योजनेतील तरतुदी नुसार विश्वस्त मंडळात विश्वस्तांचा रिक्त जागा नेमण्याकरिता /भरण्याकरिता वाढोणा रामनाथ गावातील, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील व अमरावती जिल्हयातील श्री राम मंदिर, श्री मारोती संस्थान, श्री रामनाथ स्वामी संस्थान, श्री ओंकारेश्वर संस्थान, श्री शंकर संस्थान या सर्व देवावर श्रध्दा असणारे व निर्व्यसनी, भक्त, सर्व ईच्छुक व पात्र प्रतिष्ठीत नागरिक यांनी आपले **विश्वस्त पदाकरिता** चे अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि.१५/०९/२०२६ पर्यत खालील पत्त्यावर स्वहस्ते, डाक पोस्टव्दारे पाठवावे.

**वाढोणा रामनाथ**
**दिनांक २८/०८/२०२६**

**पत्रव्यवहाराचा पत्ताः-**
**श्री बाबाराव नामदेवराव माटोडे**
**वाढोणा रामनाथ,**
**ता.नांदगाव खंडेश्वर,**
**जि.अमरावती- ४४४ ७०१**

**विश्वस्त**
**१) श्रीराम मंदिर संस्थान र.नं. अे. ५७६**
**२) श्री मारोती संस्थान र.नं. अे.५७७**
**३) श्री रामनाथ स्वामी संस्थान र.नं. अे.५७८**
**४) श्री ओंकारेश्वर संस्थान र.नं. अे.५७९,**
**५) श्री शंकर संस्थान र.नं. अे.५९५**
**वाढोणा रामनाथ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

### जाहीर नोटीस

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारानुसार सर्व जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार नागेश्वर बन्सीराम तेलमोरे, रा. अंतोरा, ता. आष्टी, जि. वर्धा यांनी इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखा अमरावती मधून गृह लोन मिळावे या करिता अर्ज केलेला असून खालीलप्रमाणे नमूद मालमत्ता रजिस्टर खरेदी क्र. १८१७ दिनांक ०६/०६/२०१२ व १८५२ दिनांक १६/१२/२०१९ अन्वये नावे उर्मिला अरुणपंत टेंभारे व गजानन किसनरावजी मांडवकर तसेच खरेदी क्र. ७९ दिनांक १७/०१/२०२० अन्वये नावे राजेश मधुकर निंभोकर.

मौजा येरला, ता. मोर्शी, जि. अमरावती, शेत सर्व्हे नं. ४, प्लॉट नं. १अ, क्षेत्रफळ १५२९ चौ.फुट.

यातील नमूद मालमत्ता खरेदी खत कोणाला सापडल्यास अथवा खरेदी नुसार मालमत्ता बाबत कोणाही कर्ज/गहाण/बोजा आढळल्यास अथवा कुठलाही या मालमत्ताबाबत पैशाचा व्यवहार झाल्यास ०३ दिवसात खालील पत्त्यावर कागदपत्रांसहित संपर्क करावा.

दिनांक : २७/०८/२०२६

**ॲड. अनिकेत देशमुख**
इंडिया शेल्टर फायनान्स कॉ. लि. अमरावती,
मो. ९५६१२४८२१५

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३५०**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६८०/२०२६
**माधवी अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१६.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Madhavi Laxman Karandikar, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Near Dr.Ranade Hospital, Civil Line, Yavatmal
2. Avinash Yashwantrao Katre, Age 65 Yrs. Occu.: Retired R/o Near MSEB Office, Jalaram Nagar, Prabha Colony, Rukhmini Nagar, SO Amravati
3. Hemant Yashwantrao Katre, Age 61 Yrs. Occu.: Nil R/o Near MSEB Office, Jalaram Nagar, Prabha Colony, Rukhmini Nagar, SO Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Yashwant Gopal Katre हे दिनांक 19.04.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Madhavi Laxman Karandikar+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Madhavi Laxman Karandikar+2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४४३/२०२६
**श्रीमती मंजू -वि- निरंक**
पुढील ता.२९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Manju Wd/o Pramod Chopade, Age 41 Yrs. Occu.: Household
2. Prajwal S/o Pramod Chopade, Age 20 Yrs. Occu.: Retired
3. Shailesh S/o Pramod Chopade, Age 18 Yrs. Occu.: Nil
4. Smt.Rajkanya Wd/o Santosh Chopade, Age 52 Yrs. Occu.: Household
All applicants are R/o Rahul Nagar, Old Town, Badnera Tq.Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Pramod Santosh Chopade हे दिनांक 29.09.2025 रोजी **पुसदा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Manju Wd/o Pramod Chopade+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Manju Wd/o Pramod Chopade+3 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७२४/२०२६
**रमेश अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ramesh Sarbaji Masram, Age 52 Yrs. Occu.: Pvt.Service R/o Samadhan Nagar, Amravati.
2. Sau.Nanda Ramu Shriram, Age 47 Yrs. Occu.: Housewife R/o Hanuman Ward, Arvi, Dist.Wardha
3. Sau.Rashika Ramesh Watti, Age 47 Yrs. Occu.: Housewife R/o Khalsi Lane, Mohan Nagar, Tq. Dist.Nagpur
4. Sau.Laxmi Rajesh Parteki, Age 52 Yrs. Occu.: Housewife R/o Chaprasipura, Amravati. Tq. Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sarbaji Barkaji Masram हे दिनांक 19.09.1998 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. **व** मयत Ambika Sarbaji Masram हे दिनांक 19.09.1998 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Ramesh Sarbaji Masram+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Ramesh Sarbaji Masram+3 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१३९९/२०२६
**श्रीमती कलावती अधिक तीन -वि- धनराज अधिक दोन**
पुढील ता.२९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. कलावती ओंकारराव तायडे, वय ८० वर्षे, व्यवसाय - निरंक रा.धामणगांव काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. मोहन अण्णा कांबळे, वय ५० वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. अर्चना अण्णा कांबळे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. ईशांत दिनेश कांबळे, वय १४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
२ ते ४ रा.वडगांव माहोरे, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :**
१. धनराज भाऊराव इंगळे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. मालता हरिदास खंडारे, वय ६० वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोन्ही रा.पुसदा, ता.जि.अमरावती
३. बेबी राजेश थोरात, वय ४० वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.तळेगांव ठाकूर, ता.तिवसा, जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कोंबाजी बाजीराव इंगळे** यांचे दिनांक **०८.०८.२००१** रोजी **पुसदा, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार कलावती अधिक तीन विरुध्द गैरअर्जदार धनराज आकि दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कलावती अधिक तीन विरुध्द गैरअर्जदार धनराज आकि दोन** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१४२७/२०२६**
**श्रीमती इंदुबाई अधिक तीन विरुध्द निरंक**
**पुढील ता.२८.०८.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. **Indubai Ganpatrao Hatwar** Age 83 years. Occu.: Household
2. **Bhimrao Ganpat Hatwar,** Age 50 years. Occu.: Labour
1 & 2 both R/o. Telipura, Nandgaon Peth, Tq. & Dist. Amravati
3. **Dipraj Ganpatrao Hatwar,** Age 40 years. Occu.: Labour R/o. INT Company, Milind Nagar, J.V. Link Road, Powai Sakinaka, Mumbai - 400072.
4. **Sharda Ganeshrao Gathe,** Age 44 years. Occu.: Household R/o. Near Ikbal Swa Mill, Sai Nagar, Arvi Tq. Arvi, Dist. Wardha 442201

विरुध्द

**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गणपत महादेवराव हटवार** हे दिनांक ११.०६.१९९८ रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **इंदुबाई अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती इंदुबाई अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१६९३/२०२६**
**वैशाली +२ वि.निरंक**
**पुढील ता.१७.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **वैशाली मनोज भुगुल,** वय ४० वर्षे, व्यवसाय-शेती
२. **अनुष्का मनोज भुगुल,** वय १८ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
३. **तन्मय मनोज भुगुल,** वय १५ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
अर्जदार क्र.२ व ३ साठी अ.पा.क.आई अर्जदार क्र.१
सर्व रा.वलगांव, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मनोज साहेबराव भुगुल** हे दिनांक **२१.०६.२०२६** रोजी **वलगांव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार वैशाली मनोज भुगुल +२** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वैशाली मनोज भुगुल + २** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे २४.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

### मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर (CJJD) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२१६/२०२६** **ने.ता.१५.०९.२०२६**

**रेखा व ईतर - विरुध्द - निरंक**

**१. रेखा पुंडलिक राठोड,**
**२. युवराज पुंडलिक राठोड,** दोघेही रा.टाकळी गिलबा, पो.पिंप्री निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
**३. निता किशोर आडे**
**४. ज्योत्स्ना अतुल आडे,** अर्जदार क्र.३ व ४ रा.मंगरुळ, पो. मांगलादेवी, ता.नेर, जि.यवतमाळ

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, पुंडलिक हरीसिंग राठोड यांचा **मृत्यू दि.१६.०५.२०२३ रोजी टाकळी गिलबा, पो.प्रिपी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे.**. ते तेथीलच मुळ रहिवासी होते. मयत **पुंडलिक हरिसिंग राठोड** यांची आई नामे **सुंदराबाई हरिसिंग राठोड** यांचा देखील मृत्यू दि.२६.११.२०२१ रोजी टाकळी गिलबा, पो.प्रिपी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ व ४ हया त्यांच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ३० जुलै, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### पोटे कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स आयुर्वेद येथे महर्षी चरक जयंती

**अमरावती-** येथील पी. आर. पोटे कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स आयुर्वेद येथे महर्षी चरक जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम संहिता-सिद्धांत विभागांतर्गत आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांनी अध्यक्षस्थान भूषवत कार्यक्रमाचे उद्घाटन केले. डॉ. नवले सर आणि डॉ. टप्पे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संहिता-सिद्धांत विभागाच्या सदस्या डॉ. कमलेश सतीजा, डॉ. अश्विनी वाणी, डॉ. रुपाली अंजनकर, नीलिमा जैन, तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी वृंद उपस्थित होते. आयुर्वेद आणि आयुर्वेद संहितांचे संस्थापक व तत्त्वज्ञ महर्षी चरक यांच्या सन्मानार्थ ही जयंती साजरी केली जाते. यात धन्वंतरी पूजा आणि संहिता पूजा, चरक संहितेतील श्लोकांचे पठण आणि इतर कार्यक्रमांचा समावेश होता.

### नितीन देशमुख आकाशवाणीवरून उलगडणार 'काव्यप्रवास'



**अमरावती-** 'जळणाऱ्याला विस्तव कळतो बघणाऱ्याला नाही' सारखी रसिकप्रिय गज़ल लिहिणारे चांदुरबाजार तालुक्यातील बेलोरा येथील लोकप्रिय कवी आणि गज़लकार नितीन देशमुख आपला काव्यप्रवास अमरावती आकाशवाणीच्या 'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमातून मांडणार आहेत. सोमवार ३१ ऑगस्ट आणि मंगळवार १ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अशी दोन भागात त्यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. लोकप्रिय निवेदक आणि गज़लकार नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे. गदिमा पुरस्कार, नारायण सुर्वे काव्य पुरस्कार, सुरेश भट पुरस्कार, गिरीश गांधी प्रतिष्ठानचा कवी देवानंद गोरडे पुरस्कार आणि यशवंतराव चव्हाण पुरस्कार असे मोठे सन्मान त्यांच्या वाट्याला आले आहेत. देश- विदेशात नितीन देशमुख यांच्या कविता आणि गजल सादरीकरणाचे कार्यक्रम यशस्वीपणे होत असतात. 'टिम्ब टिम्ब' आणि 'प्रेमरंग' या मराठी चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखनही केले आहे. 'नमस्कार अमरावती' कार्यक्रमाचे सादरकर्ते भैय्यालाल टेकाम आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावती केंद्राबरोबरच 'न्यूज ऑन एअर' या मोबाईल? पवर देखील ऐकता येईल. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम आणि कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी केले आहे.

### प्रशांत डाखोडे यांचा मृत्यू



**अचलपूर-** शहरातील चावलमंडी येथील स्टेट बँक शाखेमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेले प्रशांत डाखोडे यांचे मुंबई येथे हार्ट अटॅक आल्याने निधन झाले आहे. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे अचलपूर शहरात शोककळा पसरली आहे. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ते सर्वांना परिचित होते. अचलपूर शहरातील स्टेट बँक शाखेमध्ये अडचणी, तक्रारी घेऊन येणाऱ्या ग्राहकांचे तक्रारीचे समाधान ते तत्काळ करीत असल्याने त्यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीमुळे त्यांनी कमी कालावधीत वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे अचलपूर शहरात शोककळा पसरली आहे.

# राज्य महोत्सव गणेशोत्सव स्पर्धेत मंडळांनी सहभाग घ्यावा

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. अमरावती विभागातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshostav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने, चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षे राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यावर्षीच्या पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. (सदरची अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव मंडळांनाही लागू राहील). या स्पर्धेसाठी मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

विविध स्तरांवरील विजेत्या मंडळांना खालीलप्रमाणे भरघोस रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुका स्तर: प्रथम क्रमांक - २५ हजार रुपये, जिल्हा स्तर: प्रथम क्रमांक -५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक -४० हजार रुपये,



तृतीय क्रमांक - ३० हजार रुपये, राज्य स्तर: प्रथम क्रमांक - ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक - ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये राष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक - ७ लाख ५० हजार रुपये द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक-२ लाख ५० हजार रुपये आंतरराष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक- ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये याव्यतिरिक्त, राज्यस्तरीय निवड समितीकडे आलेल्या ३६ जिल्हास्तरीय प्रथम विजेत्या मंडळांपैकी, राज्यस्तरावरील पहिले ३ विजेते वगळून उर्वरित ३३ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० हजार रुपये चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

उत्कृष्ट मंडळांची निवड करताना कलांचे जतन व संवर्धन, संस्कृतीचे जतन, निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता (उदा. पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग इत्यादी) या १०० गुणांच्या निकषांवर परीक्षण केले जाईल.

स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाच्या प्रक्रियेबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचे सविस्तर अवलोकन करावे तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळाला ganeshostav.pldmka.co.in आवर्जून भेट द्यावी. अधिक माहितीसाठी शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

तरी समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करणाऱ्या अमरावती विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, नयना गुंडे, यांनी केले आहे.

# श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालयात 'सर्पदंश व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राणीशास्त्र विभागातर्फे 'विषारी साप व सर्पदंश व्यवस्थापन' या विषयावर महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सापांची ओळख, सर्पदंश, विषबाधा आणि आपत्कालीन परिस्थितीत व त्यावर करावयाच्या योग्य उपाययोजनांबाबत वैज्ञानिक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम डीबीटी स्टार प्रकल्प अंतर्गत आयोजित करण्यात आला होता. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित सर्पदंश व्यवस्थापन क्षेत्रातील मार्गदर्शक आणि वन्यजीव संवर्धक अनिल एम. गोरे तथा राजा गोरे आकोट, IQAC समन्वयक डॉ. एस. पी. इंगोले, प्राणीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. जे. डी. धोटे आणि विभागीय ॐ समन्वयक डॉ.



जी. ए. वाघ हे होते. मान्यवरांच्या हस्ते आपल्या परिसरातील आढळणारे 'विषारी साप व सर्पदंश व्यवस्थापन' या विषयावर दोन पोस्टर चे प्रकाशन करण्यात आले. डॉ. अनुराधा राजोरिया, सहाय्यक प्राध्यापक, प्राणीशास्त्र विभाग, यांनी उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन केले. या कार्यशाळेत, Wildlife-Reptile Rescue & Snake Bite Management Society चे अध्यक्ष तसेच सर्पदंश व्यवस्थापन क्षेत्रातील कार्यकर्ते, संशोधक, शिक्षक आणि वन्यजीव संवर्धक अनिल एम. गोरे तथा राजा गोरे आकोट व त्यांच्या इतर सर्पमित्र सहकार्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गोरे यांनी विषारी आणि बिनविषारी सापांमधील फरक स्पष्ट केला तसेच सामान्य विषारी सापांची ओळख कशी करावी, याबाबत माहिती दिली. तसेच त्यांनी प्रतिविष (Anti-Snake Venom—ASV), त्याची भूमिका आणि सर्पदंशामुळे झालेल्या विषबाधेच्या उपचारातील उपयोग याबाबत सविस्तर माहिती दिली. वेळेवर वैद्यकीय उपचार घेण्याचे महत्त्व अधोरेखित करताना, योग्य उपचारास विलंब होईल अशा अयोग्य पारंपरिक पद्धती टाळण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमाच्या दरम्यान राजा गोरे यांनी विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक सर्पदंश जनजागृतीचे दूत बनून आपल्या कुटुंबीयांमध्ये आणि समाजात अचूक माहिती प्रसारित करावी, असे आवाहन केले. या कार्यशाळेला १०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सापांची ओळख, सर्पदंश प्रतिबंध, विषबाधेची प्रारंभिक लक्षणे, प्रतिविषाचा उपयोग आणि योग्य सर्पदंश व्यवस्थापन याबाबत विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी जनजागृती झाली. या कार्यक्रमास महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, प्राणीशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ. जे. डी. धोटे आणि विभागीय DBT समन्वयक डॉ. जी. ए. वाघ यांच्यासह प्राणीशास्त्र विभागातील शिक्षक व शिक्षकेतर यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले..डॉ. अनुराधा राजोरिया, सहाय्यक प्राध्यापक, प्राणीशास्त्र विभाग, या कार्यशाळेच्या प्रभारी म्हणून काम पाहिले.

# शेतीतून समृद्धीकडे; कृषी चर्चा सत्रातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावतीच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत यावली शहीद येथे 'शेतीतून समृद्धीकडे' या विषयावर कृषी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती अधिक उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्याच्या उद्देशाने या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या कृषी चर्चा सत्रामध्ये शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीशी संबंधित दोन महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. 'सोयाबीन पिकावरील रोग व त्यांचे व्यवस्थापन' या विषयावर वनस्पती रोगशास्त्र विषयाचे विषय तज्ज्ञ प्रा. राहुल कळसकर यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. राहुल कळसकर यांनी रोगांचे योग्य वेळी निदान करून प्रभावी व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. एकात्मिक रोग व्यवस्थापनामध्ये प्रतिबंधात्मक उपाय, योग्य पीक व्यवस्थापन, शेताची स्वच्छता,



निरोगी बियाण्यांचा वापर तसेच आवश्यकतेनुसार योग्य बुरशीनाशकांचा वापर याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकातील रोगांशी संबंधित विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून त्यांचे समाधान करून घेतले. याप्रसंगी पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील वनस्पती रोगशास्त्र विभागातर्फे शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या सोयाबीन मधील रोग व्यवस्थापनासाठी बुरशीनाशकांचा वापर या विशेष माहितीपत्रकाचे प्रकाशन सरपंच व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच या माहितीपत्रकाचे वाटप देखील करण्यात आले. यानंतर 'फळबागायती पिकांमध्ये मूल्यवर्धित उत्पादन व प्रक्रिया' या विषयावर उद्यानविद्या विषय तज्ज्ञ डॉ. स्वप्नील देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. नितेश चौधरी, कार्यक्रम प्रभारी प्रा. श्वेता देशमुख व कार्यक्रम अधिकारी प्रा. अदिती राजणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच यावली शहीदच्या सरपंच शिल्पा खवले आणि शेतकरी प्रतिनिधी विजयराव घाटोळ हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या वेळी उपस्थित शेतकऱ्यांनी दोन्ही विषयांमध्ये विशेष रुची दाखवत तज्ज्ञांशी संवाद साधला. सोयाबीन पिकातील रोग व्यवस्थापन तसेच फळबागायती पिकांपासून मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याबाबत शेतकऱ्यांना उपयुक्त व व्यावहारिक माहिती मिळाली. आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रीय पद्धती आणि शेतमालाचे मूल्यवर्धन यांचा योग्य वापर करून शेती अधिक शाश्वत व लाभदायक करण्याच्या दृष्टीने हे कृषी चर्चा सत्र उपयुक्त ठरले.



### रंगीबेरंगी राख्यांनी सजली दुकाने

**अमरावती-गोपाल नगर परिसरात रक्षाबंधनाची लगबग ठिकठिकाणी रंगीबेरंगी राख्यांनी सजली दुकाने, आकर्षक डिझाईनच्या राख्यांसह कार्टून, चांदीच्या व मोत्यांच्या राख्यांना मागणी- बहिणींकडून भावासाठी राखीची निवड, बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण.**



### विद्यार्थ्यांनी साकारल्या आकर्षक राख्या, राखी प्रदर्शन व विक्री स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अंजनगाव बारी-** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या आकर्षक व कलात्मक राख्या स्वतः तयार करून त्यांचे प्रदर्शन व विक्री स्टॉल आयोजित केला. या उपक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी कल्पकता, कलागुण व सर्जनशीलतेचा वापर करून रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्या तयार केल्या. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनीच स्टॉलची मांडणी व व्यवस्थापन करून तयार केलेल्या राख्यांची विक्री केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वावलंबन, व्यवहारज्ञान, संघभावना आणि उद्योजकतेचे प्रत्यक्ष धडे मिळाले. या उपक्रमाचे आयोजन उपक्रमशील शिक्षक प्रवीण सोळंके तसेच शिक्षिका जयश्री पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंत देव तसेच संस्थेच्या सर्व कार्यकारी मंडळाने या अभिनव उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व व्यावहारिक कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे असे उपक्रम सातत्याने राबविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य गजेंद्र अवघड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, आत्मविश्वासाला आणि व्यावहारिक कौशल्यांना चालना देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिक त्रस्त

**अंजनगाव बारी-** परिसरात मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांसाठी ती गंभीर डोकेदुखी ठरत आहे. गावातील बहुतांश वॉर्डांमध्ये १५ ते २० मोकाट कुत्रे वावरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः वार्ड क्रमांक ६ मध्ये ही समस्या अधिक तीव्र असल्याचे दिसून येत आहे. गावातील अनेक रस्ते अरुंद असल्याने मोकाट कुत्रे रस्त्याच्या मध्यभागी झोपलेले आढळतात. त्यामुळे वाहनचालकांना वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागते. गावाबाहेरील मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या मार्गांवरही कुत्रे अचानक रस्त्यावर धावत आल्याने दुचाकीस्वारांचे किरकोळ अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. नागरिकांच्या मते, ही समस्या दिवसेंदिवस



गंभीर होत असून सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनेही ती चिंतेची बाब बनली आहे. परिस्थिती लक्षात घेता अनेक कुटुंबांनी आणि शेतकरी वर्गानेही भटक्या कुत्र्यांच्या त्रासामुळे कुत्रे पाळण्याचे प्रमाण कमी केल्याचे बोलले जात आहे. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून निर्बिजीकरण, लसीकरण आणि योग्य व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### इब्राहिम खान यांची नियुक्ती



**अमरावती -** अमरावती क्षेत्रात पहिल्यांदा अल्पसंख्यांक समाजातील नवीन चेहरा इब्राहिम खान यांची जिल्हा कॉंग्रेस कमेटी अमरावती ग्रामीण पदी नियुक्ती करण्यात आल्याने कॉंग्रेसच्या कार्यकर्ते, समर्थक व अल्पसंख्याक समाजामध्ये खुशीचा माहोल आहे. जिल्हा कॉंग्रेसच्या वरिष्ठ पदाधिकारी यांनी इब्राहिम खान यांच्यावर विश्वास दाखवून महत्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे आणि संघटन मजबूत करण्यासाठी कामगिरी सोपवली आहे. राजनितीक क्षेत्रात आशा व्यक्त केली जात आहे. खान यांनी नियुक्ती संदर्भात बोलले कि या जबाबदारी चे श्रेय वरिष्ठ नेता अनिरुद्ध उर्फ बबलुभाऊ देशमुख अध्यक्ष जिल्हा कॉंग्रेस कमेटी अमरावती ग्रामीण, सहयोगी, मित्र आणि शुभचिंतक यांना दिले आहे

# एनसीसी महाराष्ट्र संचालनालयाच्या अतिरिक्त महासंचालकांची विद्यापीठाला सदिच्छा भेट

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी मंगळवारी २५ ऑगस्ट रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. कुलगुरू कार्यालयात झालेल्या या भेटीदरम्यान मेजर जनरल त्यागी यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेशी विविध मुद्यांवर सांगोपांग चर्चा केली. अमरावती विभागातील महाविद्यालयीन युवकांपर्यंत एनसीसीचा विस्तार वाढवून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी



जोडण्यावर विशेष भर देण्यात आला. युवकांना ड्रोन तंत्रज्ञान, ड्रोन पायलट प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, एनसीसीमधील विद्यार्थीनी तसेच महिला कॅडेट्सचा सहभाग वाढवून त्यांच्यात नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसीत करणे, प्रधानमंत्री व केंद्र शासनाच्या विविध इंटर्नशिप योजनांशी कॅडेट्सना जोडून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, मेळघाटासारख्या वैशिष्टयपूर्ण भौगोलिक परिसराचा व कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार करून ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांपर्यंत एनसीसीचे जाळे विस्तारणे अशा विविध मुद्यांवर चर्चेदरम्यान भर देण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातर्फे एनसीसीच्या प्रत्येक उपक्रम व विस्ताराला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने ज्ञान, प्रयोगशाळा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एनसीसी कॅडेट्सपर्यंत पोहोचवण्याचा मानस कुलगुरूंनी व्यक्त केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. मेहंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, एनसीसीचे मेजर संदीप गवळी आदी उपस्थित होते.

**प्लॉट विकणे आहे**

न्यू कॉलनी दस्तुर नगर अमरावती येथील रहिवासी प्लॉट क्षेत्र ३००० चौ. फूट त्यावरील जुन्या बांधकामासकट विकणे आहे.

-: संपर्क :-
७५०७६२२५८४

# अकोट भूमी अभिलेखचा 'डबल गेम'; आदेश नसताना तत्परता, थेट पत्राला ठेंगा!

## उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रात मोजणीचा आदेश नसतानाही शुल्क वसुली

### मुख्याधिकाऱ्यांच्या स्पष्ट पत्रावर महिनाभरापासून कार्यवाही ठप्प

**अॅड. समीर ठाकूर**

**अकोला** : शासकीय कामकाजात नियम एकच असतात; मात्र अकोटच्या भूमी अभिलेख विभागात नियमांना वेगवेगळे मापदंड आहेत का, असा संतप्त सवाल




आता उपस्थित होत आहे. कारण एका पत्रात स्पष्ट आदेश नसतानाही मोजणी शुल्क स्वीकारून कार्यवाहीची तत्परता दाखविण्यात आली आहे, तर दुसऱ्या पत्रात थेट मोजणीची मागणी, खर्चाची हमी आणि जनहिताचा विषय असतानाही महिनाभरापासून कार्यवाहीला 'खो' बसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, ७ जुलै २०२६ रोजी उपजिल्हाधिकारी महसूल यांनी उपविभागीय अधिकारी, अकोट यांना गाजीपूर येथील सर्व्हे क्रमांक ३५ संदर्भात चौकशी, पंचनामा, स्थळ पाहणी व अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या पत्राची प्रत प्रतिलिपी म्हणून उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांना माहितीस्तव देण्यात आली आहे.महत्त्वाची बाब म्हणजे, उपलब्ध पत्रात भूमी अभिलेख विभागाने मोजणी करावी किंवा तक्रारदाराकडून मोजणी शुल्क वसूल करावे, असा कोणताही स्पष्ट आदेश दिसत नाही. तरीही या पत्राच्या आधारे मोजणी शुल्क स्वीकारून प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. मग आदेश नसताना शुल्क स्वीकारण्याची 'तत्परता' नेमकी कोणत्या नियमावर? प्रतिलिपी म्हणजे आदेश नसताना त्याला आदेशाचा दर्जा कोणी दिला, याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, अकोट नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी २ जुलै २०२६ रोजी उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांनाच थेट पत्र देत नझूल शीट क्र. १८ व नझूल प्लॉट क्र. १४ मधील मंजूर अभिन्यासाच्या ६ मीटर सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणाची मोजणी व सीमांकन करण्याची मागणी केली.

या पत्रात मोजणीचा खर्च नगरपरिषद देणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, प्रकरणाला प्राधान्य देऊन तातडीने मोजणी करण्याची विनंतीही करण्यात आली आहे. तरीही महिन्यापेक्षा अधिक काळ लोटल्यानंतर मोजणी झालेली नसल्याचे सांगितले जात आहे. परिणामी अतिक्रमण हटविण्याची नगरपरिषदेची पुढील कार्यवाहीच रखडली आहे.

#### जिल्हाधिकाऱ्यांनी 'फाईल' नव्हे, तर सत्य तपासावे!

या दोन्ही पत्रांचा तुलनात्मक अभ्यास करून प्रत्यक्षात कोणत्या आदेशावर कोणती कार्यवाही झाली, मोजणी शुल्क कोणी आणि कोणत्या आधारावर स्वीकारले, तसेच नगरपरिषदेच्या थेट पत्रावर अद्याप कार्यवाही का झाली नाही, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. आदेश नसताना काम आणि आदेश असताना दिरंगाई हा प्रशासनाचा कारभार असेल, तर 'समान नियम' कुठे आहेत? असा संतप्त सवाल सुज्ञ नागरिक विचारत आहेत. अकोट भूमी अभिलेख विभागाच्या या कथित दुहेरी कार्यपद्धतीचा पर्दाफाश करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे. कारण हा केवळ दोन पत्रांचा विषय नाही; हा प्रशासनातील पारदर्शकता आणि जनतेच्या विश्वासाचा प्रश्न आहे!

#### आदेश नसताना वेग; आदेश असताना ब्रेक!

एका बाजूला स्पष्ट आदेश नसलेले पत्र आणि कथित शुल्कवसुलीची तत्परता, तर दुसऱ्या बाजूला थेट शासकीय मागणी, खर्चाची हमी आणि जनहिताचा विषय असूनही दिरंगाई. या विरोधाभासामुळे भूमी अभिलेख विभागाच्या कार्यपद्धतीवर संशयाची सुई रोखली जात आहे.

शासकीय पत्रांना वजन आदेशाचे असते की व्यक्तीचे? प्रतिलिपीवरून कार्यवाही होते, तर थेट पत्रावर फाईल का थांबते? सार्वजनिक रस्त्याच्या मोजणीला महिनाभर वेळ लागतो, मग प्राधान्यक्रम ठरतो तरी कसा? असे गंभीर प्रश्न या दुहेरी मापदंडावरून उपस्थित झाले आहे. परिणामी, अकोट भूमि अभिलेख विभागाचे उपअधीक्षक यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे.

#### प्रश्न विचारताच उपअधीक्षक पालवेंचा पारा चढला!

दोन्ही शासकीय पत्रांच्या अनुषंगाने प्रतिलिपीच्या आधारे तक्रारदाराकडून मोजणी शुल्क नेमक्या कोणत्या नियमाखाली स्वीकारण्यात आले, याबाबत उपअधीक्षक भूमी अभिलेख, अकोट श्री. पालवे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, या प्रश्नावर समाधानकारक स्पष्टीकरण देण्याऐवजी त्यांचा पारा चांगलाच चढला. त्यांनी संतप्त स्वरात 'तुम्हाला जे करायचे ते करा, जे छापायचे ते छापा,' अशी उर्मट प्रतिक्रिया दिली. शुल्कवसुलीचा नियमाधारित आधार काय ? या सरळ प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारची प्रतिक्रिया मिळाल्याने भूमी अभिलेख विभागाच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित झालेले प्रश्न आणखी गंभीर झाले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी नियम स्पष्ट करण्याऐवजी माध्यमांनाच आव्हान देण्याची भूमिका का घेतली, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

# वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

**भांबोरा येथील घटनेमुळे परिसरात प्रचंड दहशत**

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथून जवळच असलेल्या भांबोरा येथील एका



५२ वर्षीय इसमावर वाघाने हल्ला करून ठार मारल्याची घटना आज दि.२७ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजताचे सुमारास उघडकीस आली.या हृदयद्रावक घटनेमुळे मोर्शी तालुक्यात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. मृतक इसमाचे नाव चरणदास वासुदेवराव इखे वय ५२ वर्ष रा.भांबोरा (पान २ वर)

#### थोडक्यात बचावला २० वर्षीय युवक

आज दि.२७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता भांबोरा येथील प्रज्वल कुरवाळे हा वीस वर्षीय युवक आपल्या स्वतःच्या शेतात असलेल्या फवारणीसाठी पाणी आणायला बाजूला असलेल्या नदीपात्रात गेला होता.त्यावेळी त्याची नजर मागे पडली असता त्याला वाघ त्याच्याकडे येतांना दिसला.त्याने क्षणाचाही विलंब न करता नदी पात्रातील पाण्यात उडी घेऊन दुसऱ्या तीरावर निघून पलायन केले सुदैवाने मात्र त्याचा जीव वाचला. मोर्शी तालुक्यात वाघ दिसण्याच्या व प्राणीमात्रांवर हमला करणाऱ्या घटना घडत असतांना सुद्धा वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहे.जर या पाणी आणणाऱ्या मुलाचे लक्ष मागे गेले नसते तर या वाघाने दोन बळी घेतले असते.

## भाऊरायासाठी कोणती घेऊ राखी...!



**तिवसा** : बहीण-भावाच्या पवित्र नात्याला जपणारा उत्सव म्हणजे रक्षाबंधन.यानिमित्त तिवसा येथील बाजारपेठ विविध प्रकारच्या स्वदेशी राख्यांनी सजली असतांना भाऊराया साठी कोणती राखी घेऊ,याची प्रसन्नतेने पाहणी व निवड करतांना शालेय मुली..(छाया:--हेमंत निखाडे)

# विद्यार्थ्यांच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाउंट !

## बदनामी करणारा आरोपी गुजरातमधून अटकेत

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून त्यांचे फोटो व नावाचा गैरवापर करत अश्लील फोटो आणि मजकूर सार्वजनिक करणाऱ्या आरोपीला यवतमाळ शहर पोलिसांनी गुजरातमधून अटक केली. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली असून सोशल मीडियावरील गैरवापराचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, यवतमाळ शहरातील एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १९ जुलै २०२६ रोजी तक्रार दाखल केली होती. 'red_zone_47_', 'gau.ri.591' आणि 'Miss_deveil' या इन्स्टाग्राम आयडींच्या माध्यमातून तक्रारदार विद्यार्थी तसेच त्यांच्या मित्र-मैत्रिणींचे फोटो मॉर्फ करून त्यांच्या नावाचा वापर करण्यात आला. त्यानंतर अश्लील फोटो व मजकूर इन्स्टाग्राम सारख्या सार्वजनिक माध्यमावर प्रसारित करून विद्यार्थ्यांची बदनामी करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात BNS तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान इन्स्टाग्राम कडून मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचे (पान २ वर)

# भगव्या दुपट्ट्यावरील आक्षेपार्ह विधानावरून दर्यापूर बाजार समितीत शिवसेनेचे आंदोलन



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील एका संचालकाने भगव्या दुपट्टयावरून केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा निषेध म्हणून आज (वय २७) शिवसेना शिंदे गटाने तीव्र आंदोलन केले.

शिवसेना शिंदे गटाचे नेते गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शिवसैनिकांनी बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर धडक देत घोषणाबाजी केली. 'भगव्याचा अपमान सहन करणार नाही' अशा घोषणा देत आंदोलकांनी संबंधित संचालकाच्या माफीची मागणी केली.

आंदोलनाची माहिती मिळताच बाजार समिती परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून दर्यापूर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. (पान २ वर)

**राजकमल चौकातील अनधिकृत**

# लोंबकळणाऱ्या केबल्सवर मनपाची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती महानगर पालिका हद्दीतील पथदिव्यांच्या खांबांवर तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्समुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण होत असून, लोंबकळणाऱ्या केबल्स मुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांना लेखी पत्र देऊन अमरावती-बडनेरा मुख्य मार्गासह शहरातील अनधिकृत व (पान २ वर)



# हिवरखेड नगर परिषदेच्या सभेत भाजप - शिंदे सेना नगरसेवकांमध्ये हाणामारी !

**व्हिडिओ शूटिंगच्या कारणावरून वाद**

## नगरपरिषदेसमोरच राडा, नगरसेवकांसह काही जण जखमी

**हिवरखेड/प्रतिनिधीः-** राज्यात भाजप आणि शिंदे सेना सत्तेत एकत्र असताना हिवरखेड नगर परिषदेत मात्र दोन्ही पक्षांच्या स्थानिक गटांमध्ये चांगलीच 'जुंपल्याचे' चित्र गुरुवारी पाहायला मिळाले. नगरपरिषदेच्या मासिक सभेत व्हिडिओ शूटिंग करण्याच्या कारणावरून सुरू झालेल्या वादाचे पर्यावसान नगरपरिषदेसमोर कथित





हाणामारीत झाले. या प्रकारात शिंदे सेनेचे नगरसेवक ऋषिकेश पंचबुद्धे यांच्यासह दोन्ही गटांतील काही जण जखमी झाल्याची माहिती आहे.

मासिक सभेदरम्यान व्हिडिओ शूटिंग करण्याच्या मुद्द्यावरून वादाची ठिणगी पडली. यावेळी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक खडाजंगी झाली. काही वेळाने सभा सुरळीत सुरू झाली; मात्र सभागृहातील हा वाद बाहेरपर्यंत पोहोचला. नगरपरिषदे समोर दोन्ही (पान २ वर)

# अटीशर्तींशिवाय २ लाखांची सरसकट कर्जमाफी द्या

## तिवसा तालुक्यात सर्वपक्षीय नेत्यांचे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



**तिवसा/प्रतिनिधीः-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ अंतर्गत राज्य सरकारने जाहीर केल्याप्रमाणे शेतकरीविरोधी अटी-शर्ती न लावता थेट सरकारी तिजोरीतूनच २ लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या मागणीसाठी आज तिवसा तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी तहसीलदार कार्यालयावर धडक देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचे निवेदन तहसीलदारांना सादर केले. याशिवाय (पान २ वर)

# दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणार

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रूग्णालयात अतिदक्षता विभागात आग लागल्याची दुर्घटना घडली आहे. यात तीन नवजात बालके मृत्यूमुखी पडली. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. भविष्यात राज्यामध्ये अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात (पान २ वर)

**डफरीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर**

# आ.संजय खोडके यांची आरोग्य प्रशासनासमवेत आढावा बैठक

## अतिरिक्त दोन एनआयसीयू तातडीने सुरु करण्याचे नियोजन करा

**अमरावती/प्रतिनिधी :-** जिल्हा स्त्री रुग्णालय,अमरावतीमधील नवजात बालकांच्या अतिदक्षता कक्षात नुकतीच २४ ऑगस्ट रोजी आग लागल्याच्या दुर्दैवी घटनेमध्ये तीन बालकांचा करूण अंत झाला. या हृदयद्रावक घटनेनंतर (पान २ वर)



